म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १००८

...ारी शाळांतून वाचण्या-
करितां मंजूर झालेला ग्रंथ

# पद्यरत्नसमुच्चय

## भाग दुसरा

( अँग्लो मराठी साहावी व सातवी या इयत्तांकरितां )

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

प्रकाशक ... जर, नवीन किताबखाना, पुणें.

...त्ति तिसरी.

REFBK-0001326
REFBK-0001326

किंमत १० आणे.

संख्या नं.
अ. क्र. 932९

# पद्यरत्नसमुच्चय

अथवा

## मराठी काव्यांतील उत्कृष्ट वेंचे

## भाग दुसरा.

(अर्थबोध व अवांतर टीपा यांसह)

**लक्ष्मण गणेशशास्त्री लेले**

अलंकारप्रकाश, पद्यमंजरी, महाराष्ट्र-भामिनी-विलास, महाराष्ट्र-सौंदर्यलहरी, मेघदूताचें समवृत्त मराठी भाषांतर, संस्कृत-वाचनपाठमाला, गद्यरत्नसमुच्चय, काव्यसौंदर्य, सन्मार्गप्रदीप इत्यादि पुस्तकांचे कर्ते,

यांनीं तयार केला.

REFBK-0001326

REFBK-0001326

आवृत्ति तिसरी.

पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकानें राखून ठेविले आहेत.

इ. स. १९१६.

किंमत १० आणे.

हें पुस्तक पुणें येथें 'यशवंत' छापखान्यांत अच्युत चिंतामण भट
यांनी छापिलें व विद्याधर हरि दामले यांनीं
पुणें येथें शनवार पेठेंत घ. नं. ३४६
येथें प्रसिद्ध केलें.

९३२५ ... क्रमांक ५५८

# प्रस्तावना.

अलीकडे मुंबई युनिव्हर्सिटीनें म्याट्रिक्युलेशन परीक्षेला मराठी भाषा हा विषय आवश्यक केल्यामुळें हायस्कुलांतील विद्यार्थ्यांना इतर विषयांबरोबर मराठी भाषेचेंही अध्ययन करावें लागत आहे. अशा मराठी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा म्हणून पद्यरत्नसमुच्चय या नांवाच्या पद्यात्मक पुस्तकाचे दोन भाग व काव्यसौन्दर्य हें पद्यात्मक पुस्तक अशीं तीन पुस्तकें आम्हीं गतवर्षी तयार केलीं व तीं शाळाधिकाऱ्यांकडे मंजुरीकरितां पाठविलीं. त्यांपैकीं गद्यरत्नसमुच्चयाचे दोन भाग हायस्कुलांतील विद्यार्थ्यांना वाचण्याकरितां डायरेक्टरसाहेबांनीं नुकतेच मंजूर केले आहेत.

टेक्स्टबुककमिटीच्या दोन तीन विद्वान् सभासदांनीं काव्यसौन्दर्य पुस्तकांतील दोन तीन उताऱ्यांवर, ते विशिष्ट धर्मसंप्रदायाचे ( Sectarian ) आहेत, असा आक्षेप घेऊन कांहीं सूचना केल्या. सदर आक्षेप व सूचना यांचा विचार करून त्याप्रमाणें काव्यसौन्दर्य पुस्तक लवकर शुद्ध करणें शक्य नव्हतें. म्हणून त्या सूचनांच्या अनुरोधानें पद्यरत्नसमुच्चय या नांवाचें अगदीं नवीनच पुस्तक आम्हीं तयार केलें आहे. त्याचा हा दुसरा भाग आहे. हा इंग्रेजी सहावी व सातवी इयत्ता यांतील मुलांकरितां रचिला आहे.

हा भाग तयार करतांना खालीं दिलेल्या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविलें आहे.

१ यांत जुनी कविता सुमारें तीनचतुर्थांश घेतली असून बाकीची नवीन घेतली आहे.

२ सरकारी क्रमिक पुस्तकांत ज्यांच्या काव्यांतून वेंचे घेतले आहेत, दक्षिणा प्राईज कमिटीनें कवि म्हणून ज्यांची संभावना केली आहे, किंवा न्या. मू. रानडे, विष्णुशास्त्री चिपळुणकर, डॉ. भांडारकर यांच्यासारख्या बहुश्रुत, रसिक व विद्वान् गृहस्थांनीं ज्यांच्या कवित्वाची प्रशंसा केली आहे, अशा कित्येक आधुनिक कवींच्या काव्यांतून कांहीं निवडक उतारे घेतले आहेत.

३ पहिल्या भागांत ज्या जुन्या कवींचे उतारे घेतले आहेत त्यांचे आणखी कांहीं उतारे या भागांत घेतले आहेत, पण त्यांशिवाय एकनाथ, मुक्तेश्वर व श्रीधर यांच्या ग्रंथांतील वेंचेही या पुस्तकांत घातले आहेत.

४ उताऱ्यांच्या संख्येचें योग्य प्रमाण ठरविण्याविषयीं शक्य तितकी काळजी घेतली आहे.

५ काव्यसौन्दर्य–पुस्तकांतील ' शिवस्तवन, ' ' मोह आणि जातिलता, ' ' शारदानमन ' अशांसारखे, टेक्स्टबुककमिटींतील कांहीं विद्वान् सभासदांस आक्षेपार्ह वाटणारे, उतारे प्रस्तुत पुस्तकांत घेतले नाहींत.

६ पहिल्याप्रथम सोपे व पुढें क्रमाक्रमानें कठिण अशी उताऱ्यांची व्यवस्था केली आहे.

७ उताऱ्यांतील आशय, आवश्यक वाटला तेथें, त्याच्या आरंभीं थोडक्यांत दिला आहे. त्यावरून उताऱ्यांत काय आहे हें वाचणारांच्या चटकन् लक्षांत येईल.

८ मुलांना उपयोगी पडतील अशा शब्दार्थबोधक टीपा या पुस्तकाला शेवटीं जोडल्या आहेत. पद्यांचीं वृत्तें, कथासंदर्भ, कविसंप्रदाय, व्याकरण-विशेष इत्यादि उपयुक्त माहितीही सदर टीपांत संक्षेपानें दिली आहे.

९ उताऱ्यांच्या सोईकरितां कवितेंत कोठें कोठें शब्द बदलले आहेत. पण अशा स्थळीं मूळ श्लोकांतील अर्थाची हानि होऊं दिली नाहीं.

यावरून प्रस्तुत पुस्तकाचें धोरण लक्षांत येईल व मुलांचें वाचनपुस्तक या दृष्टीनें यांत आक्षेप घेण्यासारखें कांहीं नाहीं असें वाचणारांस दिसून येईल, असा भरंवसा आहे.

कै० रसिकवर्य परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या नवनीतांत नसणारीं अनेक प्रकरणें या पुस्तकांत आहेत यांतील एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, आनंदतनय व विठ्ठल यांचे सगळे, व तुकाराम, वामन, रामदास व मोरोपंत यांचे कांहीं उतारे, नवनीतांत नसणारे असे आहेत. अशा प्रकारें नवनीताच्या पुरवणीदाखल हें पुस्तक तयार केलें आहे. शिवाय आधुनिक मराठी कवितेचे कांहीं निवडक वेंचे यांत दिले आहेत, हाही या पुस्तकाचा एक विशेष आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, मुक्तेश्वर इत्यादिकांच्या प्रासादिक व लोकोत्तर कृतींशीं अर्वाचीन मराठी कविता तोलूं शकत नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. तथापि प्रचलित भाषेंत नवीन विषय व नवीन कल्पना ज्यांत सुंदर रीतीनें

प्रतिबिंबित झाल्या आहेत अशी कांहीं मराठी काव्यें अलीकडे निर्माण झालीं आहेत. अशा कृतींचा आस्वाद विद्यार्थ्यांस थोडाबहुत घेतां यावा या हेतूनें अर्वाचीन कवितेचा थोडासा संग्रह या पुस्तकांत केला आहे. प्रस्तुत पुस्तकांत एकंदर एकुणपन्नास उतारे आहेत. त्यांपैकीं चाळीस उतारे जुन्या कवींच्या काव्यांतील असून नऊ नवीन कवींच्या कवितेंतून घेतले आहेत. यावरून नवीन मराठी कवितेला वाजवीपेक्षां अधिक महत्त्व या पुस्तकांत दिलें नाहीं हें दिसून येईल. असो. हें पुस्तक नवनीताचें चिमुकलें नवीन भावंड आहे. नवनीतावर प्रेम करणाऱ्या सहृदयांनीं याच्यावरही कृपादृष्टि ठेवावी, अशी त्यांस प्रेमपूर्वक विनंती आहे.

जरी हें पुस्तक मुख्यत्वेंकरून विद्यार्थ्यांकरितां रचिलें आहे, तरी इतर प्रौढ वाचकांसही हें प्रिय होईल अशी आशा आहे.

रुचिवैचित्र्यामुळें व अधिकारभेदामुळें विद्वान् व रसिक वाचकांस या पुस्तकाच्या दोन्ही भागांत कोठें कोठें न्यूनाधिक्य दिसून येईल. त्यांनीं तें कृपा करून आम्हांस अवश्य कळवावें. म्हणजे दुसऱ्या आवृत्तीचा कदाचित् सुदैवानें प्रसंग आला तर त्याप्रमाणें योग्य ते फेरफार आम्ही मोठ्या आनंदानें करूं.

पुणें,<br>मार्च १९०९ इ.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

मुंबईच्या शाळाखात्याच्या डायरेक्टरसाहेबांनीं हें पुस्तक शाळांतून वाचण्याकरितां मंजूर केलें, यामुळें याच्या दुसऱ्या आवृत्तीचा योग आला ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. मेहेरबान डायरेक्टरसाहेबांनीं दिलेल्या आश्रयाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे. असो. या आवृत्तींत मजकुराच्या संबंधानें कोठेंही फेरफार केला नाहीं. टेक्स्ट-बुक-कमिटीनें या पुस्तकाला मोठा टाईप घालावा अशी महत्त्वाची सूचना केली होती, ती या आवृत्तींत अंमलांत आणिली आहे. पण अशा योजनेनें पुस्तकांचीं पानें बरींच वाढलीं, व त्यामुळें पुस्तकाची किंमत थोडीशी वाढविणें प्राप्त झालें.

पुणें, ५।१०।१९१२ इ. } लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

# तिसरी आवृत्ति.

या आवृत्तींत मजकुराच्या संबंधानें कोठेंही फेरफार केला नाहीं. परंतु कागदाच्या अतिशय महर्गतेमुळें किंमत जरा जास्त ठेविली आहे.

**प्रकाशक.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | कवि. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ भक्तिपर अभंग. | तुकाराम ... ... | १ |
| २ सह्याद्रि. | गं. रा. मोगरे ... | २ |
| ३ कविवंदन. | रामदास ... ... | ३ |
| ४ अद्भुत किमयागार. | मा. ह. मोडक ... | ५ |
| ५ देवावर निष्ठा. | रामदास ... ... | ८ |
| ६ मैत्रेयमुनीचा कौरवांस शाप. | श्रीधर ... ... | ९ |
| ७ जमदग्नीचा कोप व परशुरामाची मातापितरांवरील भक्ति. | एकनाथ ... ... | ११ |
| ८ वासंती आणि रामचंद्र. | प. पं. गोडबोले ... | १४ |
| ९ संतांना दंडवत. | तुकाराम ... ... | १८ |
| १० तुफान. | कृ. ना. आठल्ये ... | १९ |
| ११ अन्योक्तिकलाप. | कृ. शा. चिपळूणकर ... | २२ |
| १२ काय हा संसार! | रामदास ... ... | २६ |
| १३ अंगदशिष्टाई. | मोरोपंत ... ... | २७ |
| १४ हिमालयपर्वतावरील सृष्टिशोभा. | पां. त्र्यं. चिंतामणिपेटकर | २९ |
| १५ कीचकवध. | मुक्तेश्वर ... ... | ३३ |
| १६ द्वारकावर्णन. | विठ्ठल ... ... | ३५ |
| १७ अंतरिक्षप्रवास. | ग. शा. लेले ... | ३७ |
| १८ रुक्मिणी आपल्या लग्नाची गोष्ट सांगते. | मोरोपंत ... ... | ४४ |
| १९ वर्षाकाल. | मुक्तेश्वर ... ... | ४७ |
| २० श्रीरामराज्याभिषेक. | वामन ... ... | ४८ |
| २१ हंस नलाकडून दमयंतीकडे जातो. | रघुनाथपंडित ... | ५१ |
| २२ प्रपंचांतील वागणूक. | रामदास ... ... | ५१ |
| २३ वैराग्यपर अभंग. | तुकाराम ... ... | ५४ |
| २४ उज्जयिनी. | वा. शा खरे ... | |
| २५ सत्यभामेचा रुसवा. | वामन ... .. | ५८ |

अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| २६ गृहिणीविरह. | कृ. शा. चिपळुणकर ... | ५९ |
| २७ अंतीं एकटाच! | रामदास ... ... | ६१ |
| २८ रजनी व उषःकाल | मुक्तेश्वर ... ... | ६२ |
| २९ सुभद्राहरण. | मोरोपंत ... ... | ६४ |
| ३० शिवधनुर्भंग व सीताविवाह. | आनंदतनय ... | ६७ |
| ३१ वयाच्या तीन अवस्था. | तुकाराम ... ... | ६९ |
| ३२ सीताशुद्धि. | श्रीधर ... ... | ७० |
| ३३ उत्तमगुणसंकीर्तन. | रामदास ... ... | ७२ |
| ३४ ताटकावध. | एकनाथ ... ... | ७३ |
| ३५ देवाजवळ मागणें. | तुकाराम ... ... | ७४ |
| ३६ स्फुट पद्यें. | मोरोपंत ... ... | ७५ |
| ३७ दुष्यन्त व शकुन्तला यांची भेट. | मुक्तेश्वर ... ... | ७९ |
| ३८ जनकाच्या घरीं परशुरामाचा सत्कार. | एकनाथ ... ... | ८१ |
| ३९ भरत आणि कुशलव. | मोरोपंत ... ... | ८२ |
| ४० श्रीकृष्णाची अग्रपूजा. | मुक्तेश्वर ... ... | ८६ |
| ४१ भरताची बंधुप्रीति. | वामन ... ... | ८८ |
| ४२ सीता शिवधनुष्याचा घोडा करिते. | एकनाथ ... ... | ९२ |
| ४३ सुदामनगरी. | मोरोपंत ... ... | ९४ |
| ४४ वैराग्यवचनें. | वामन ... ... | ९७ |
| ४५ पूर्वग्रंथकारांस प्रणामांजलि. | श्रीधर ... ... | १०० |
| ४६ दुर्योधनाचा मानीपणा. | मोरोपंत ... ... | १०१ |
| ४७ सज्जनप्रशंसा. | रामदास ... ... | १०७ |
| ४८ संकीर्ण अभंग. | तुकाराम ... ... | १०७ |
| ४९ भक्ताचा टाहो. | मोरोपंत ... ... | १०८ |

# पद्यरत्नसमुच्चय.

## भाग दुसरा.

### १. भक्तिपर अभंग.

कां रे नाठवीसी कृपाळू देवासी, पोसी तो जगासी एकलाची १
फुटे तरुवर उष्णकाळमासीं, जीवन तयासी कोण घाली ? २
बाळा दुग्ध कोणीं केलेंसे उत्पत्ति, वाढवी श्रीपती सवें दोन्ही ३
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता, राहें त्या अनंता आठवोनी ४
तुका म्हणे त्याचें नांव विश्वंभर, करा निरंतर ध्यान त्याचें ५
आलीया भोगासी असावें सादर, देवावरी भार घालोनीयां १
तोचि कृपानिधी वारील सांकडें, येर ते बापुडे काय रंक ? २
भवाचीया पोटीं दुःखाचीया राशी, शरण देवासी जातां भलें ३
तुका म्हणे जया भार घातलीया, उपेक्षीना तया दीनबंधु ४
त्रैलोक्य पाळीतां उबगला नाहीं, आमचें त्या काई असे ओझें १
पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर, तया मुखीं चारा कोण घाली ! २
पक्षी अजगर न करी संचित, तयासी अनंत प्रतिपाळी ३
तुका म्हणे तया भार घातलीया, उपेक्षीना दयासिंधू माझा ४
सर्वभावें आलों तुजसी शरण, कायावाचामनांसहित देवा १
आणीक दुसरें न ये माझ्या मना, राहिली वासना तुझे ठायीं २
माझीयेवरीचें कांहीं जडभारी, तुजवीण वारी कोण देवा ? ३
तुझे आम्ही दास आमुचा तूं धनी, चालत दुरोनी आलों मागें ४
तुका म्हणे आतां घेतलें धरणें, हिशोबाकारणें भेटी देई ५
भेटीलागीं जीवा लागलीसे आस, पाहें रात्रदिवस वाट तुझी १
पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन, तैसें माझें मन वाट पाहे २

भुकेलिया बाळ अति शोक करी, वाट पाहे परी माउलीची ३
तुका म्हणे मज लागलीसे भूक, धांवूनी श्रीमूख दावी देवा ४

तुकाराम-गाथा.

---

## २. सह्याद्रि.

श्लोक.

कोठें दुर्गम उंच उंच शिखरीं भेदोनि तारापथा
विंध्याद्रिव्रत आचरोनि अडवूं पाहे रवीच्या रथा;
कोठें भार्गवराममार्गणभयें जो भीरु मागें पळे
त्याचा मारहि साहुनी पुरवितो प्रेमें मुलींचे लळे! १
कोठें खोल महा भयानक दरी पाहूनियां ज्यांकडे
सूर्याचे करही भयें दचकुनी माघारती बापडे;
कोठें घोष करीत पुण्य तटिनी जातां समुद्राकडे
खालीं आदळती धडाधड जणूं पापाचलाचे कडे! २
कोठें शीतळ वाहती झुळझुळां अच्छोदकाचे झरे,
ज्यांच्या केवळ दर्शनेंचि सगळी तृष्णा जनांची हरे;
कोठें रम्य सरोवरें, स्फटिकभा शुद्धोदकें ज्यांचिया
केली लज्जित शारदेन्दुकिरणां देओनियां आश्रया ३
कोठें व्योमपथें महीरुह शिरें उंचावुनी आपलीं
घालाया बघती जणूं निजगळां निःसार मेघावली;
कोठें पालवतां लता रुचिरता साऱ्या प्रदेशास ये
वाटे पांघुरली सुरम्य हिरवा शेला वनश्री स्वयें. ४
कोठें त्र्यंबकराजपुण्यमहिमा वर्णीत गोदावरी
जातां पंचवटीवरून नमन श्रीरामचंद्रा करी,
भीमाशंकर सोडुनी निजसखी घेऊनि नीरा सवें
कोठें नेउनि पंढरीस बसवी भीमा जनांचे थवे. ५

कोठें धौममहाबळेश्वरपदा सोडोनि जातां पथीं,
कृष्णेला बहु कोयनादिक सख्या येओनियां भेटती;
कोठें जी म्हणती प्रयागमहिमा सारा हिरावोनि घे,
हाराया करवीरतापमलही ती पंचगंगा निघे.
ताराया भजका सदाशिव कुठें ज्योतिःस्वरूपें वसे,
कोठें येउनि ही हिमालयसुता या सप्तशृंगीं वसे;
कोठें या विवरीं लपोनि बसती बौद्धादिकांच्या कृती,
होते कुंठित ज्यांकडे निरखितां कारागिरांची मती. ७
नाहीं घोरपडीशिवाय शिवली भिंतीस ज्याच्या शिडी,
फेंकाया शकले न दृष्टि रिपुही ज्याच्याकडे वांकडी;
तान्हाजीसम वीरसिंह पडला ज्याकारणें संगरीं,
त्या ह्या सिंहगडीं निरंतर शिवा साम्राज्य आतां करी! ८

गं. रा. मोगरे—मोगऱ्याचीं फुलें.

## ३. कविवंदन.

### ओंव्या.

आतां वंदूं कवीश्वर, जे शब्दसृष्टीचे ईश्वर,
ना तरी हे परमेश्वर, वंदावे ते १
कीं हें सरस्वतीचें स्थान, कीं हें नानाकलांचें जीवन,
नाना साहित्यांचें भुवन, यथार्थ होय २
कीं हें पुरुषार्थाचें वैभव, कीं हें जगदीश्वराचें महत्त्व,
नाना लाघवें सत्कीर्तीस्तव, निर्माण कवी ३
कीं हे शब्दरत्नांचे सागर, कीं हें मुक्तसरोवर,
नाना निर्धांचे वैरागर, निर्माण झाले ४
कवी मुमुक्षूचें अंजन, कवी साधकाचें साधन,
कवी सिद्धाचें समाधान, निश्चयात्मक ५

कवी स्वधर्माचा आश्रयो, कवी मनाचा मनोजयो,
कवी धार्मिकाचा विजयो, विजयकर्ते ६
कवी वैराग्याचें संरक्षण, कवी भक्ताचें भक्तिलक्षण,
नाना स्वधर्मसंरक्षण, ते हे कवी ७
कवी प्रेमळांची प्रेमळ स्थिती, कवी ध्यानस्थांची ध्यानमूर्ती,
कवी उपासकांची वाढ कीर्ती, विस्तारली ८
नाना साधनांचें मूळ, कवी नाना प्रयत्नांचें फळ,
नाना कार्यसिद्धि केवळ, कवींचेनि प्रसादें ९
आधीं कवींचा वाग्विलास, तरी मग श्रवणीं तुंबळे रस,
कवींचेनि मतिप्रकाश, कवित्वासी होय १०
कवी व्युत्पन्नाची योग्यता, कवी सामर्थ्यवंताची सत्ता,
कवी विचक्षणाची कुशळता, नाना प्रकारीं ११
कवी कवित्वाचा प्रबंध, कवी नाना धाटी मुद्रा व छंद,
कवी गद्यपद्य भेदाभेद, पदप्रकारकर्ते १२
कवी सृष्टीचा अळंकार, कवी लक्ष्मीचा शृंगार,
सकळ सिद्धींचा निर्धार, ते हे कवी १३
कवी सभेचें मंडण, कवी भाग्याचें भूषण,
नाना सुखांचें संरक्षण, ते हे कवी १४
कवी देवांचे रूपकर्ते, कवी ऋषींचे महत्त्ववर्णिते,
नाना शास्त्रांचें सामर्थ्य ते, कवी वाखाणिती १५
नसता कवींचा व्यापार, तरी कैंचा जगदुद्धार,
म्हणोनि कवी हे आधार, सकळ सृष्टीसी १६
नाना विद्या दातृत्व कांहीं, कवीश्वरांवीण तों नाहीं,
कवींपासून सर्व कांहीं, सर्वज्ञता १७
मागें वाल्मीकिव्यासादिक, झाले कवीश्वर अनेक,
तयांपासूनि विवेक, सकळ जनासी १८

पूर्वी काव्यें होतीं केलीं, तरीच व्युत्पत्ती प्राप्त झाली,
तेणें पंडितता अंगीं बाणली, परम योग्यता १९
ऐसे पूर्वी थोर थोर, झाले कवीश्वर अपार,
आतां आहेति, पुढें होणार, नमन माझें त्यांसि पैं २०
नाना चातुर्यांच्या मूर्ती, कीं हे साक्षात् बृहस्पती,
वेदश्रुती बोलों म्हणती, ज्यांच्या मुखें २१
परोपकाराकारणें, नाना निश्चय अनुवादणें,
शेखीं बोलिजे पूर्णपणें, संशयातीत २२
कीं हे अमृताचे मेघ वोळले, कीं हे रसाचे वोघ लोटले,
नाना सुखाचें उचंबळलें, सरोवर २३
कीं हे विवेकनिधीचीं भांडारें, प्रगट झालीं मनुष्याकारें,
नाना वस्तूंचेनि विचारें, कोंदाटले हे २४
कीं हें आदिशक्तीचें ठेवणें, नाना शक्तींशीं आणी उणें,
लाधलें पूर्णसंचिताच्या गुणें, विश्वजनासी २५
कीं हीं सुखाचीं तारुवें लोटलीं, अक्षयीं आनंदें उतटलीं,
विश्वजनासी उपेगा आलीं, नाना प्रयोगांकारणें २६
कीं हे ईश्वराचा पवाड, पहातां गगनाहूनि वाड,
ब्रह्मांडरचनेहूनि जाड, कविप्रबंधरचना २७
आतां असो हा विस्तार, जगासि आधार कवीश्वर,
तयासि माझा नमस्कार, साष्टांग भावें २८

रामदास—दासबोध.

---

## ४. अद्भुत किमयागार.

सृष्टिरचनेमध्यें परमेश्वराचें अत्यंत विस्मयकारक व अगाध असें ज्ञान व चातुर्य दिसून येतें, हें एकच तत्त्व अनेक उदाहरणांनीं कवीनें खालीं दिलेल्या पद्यांत व्यक्त करून दाखविलें आहे.

## श्लोक.

उद्यानीं नवमल्लिका दलभरें झांकोनि गेली जरी,
नाहीं येत सुगंध अल्पहि तया मर्दोनि पाहों तरी;
होतां तत्कलिका विकस्वर परी आमोद कोंदे वनीं,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? १
नाना वन्य वनस्पती तृणविधा ओल्या सुक्याही तशा,
खाती गोमहिषी अजादिक वनीं तोंडासि येती जशा;
साऱ्या एकचि पावती परि पुढें त्या दुग्धरूपा स्तनीं,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? २
नेत्रीं पुत्तलिका मसूरदलसी अत्यल्प जी नांदते,
वर्णूं शक्ति तिची अचाट किति मी, ब्रह्मांडही ग्रासिते;
जातां सूचिमधून वारण, कमी आश्चर्य तें याहुनी,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? ३
कोणी कीटक तुच्छ तुच्छ वसतो अल्पायु सिंधूदरीं,
तो निर्मी स्वमुखें प्रवाललतिका जी गण्य रत्नांतरीं;
हो मुक्ताफल शुक्तिकीटकरसें जें अर्घ्य सद्भूषणीं,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? ४
स्पर्शीं शीतल सौख्यदायक जरी विद्युत् स्वगर्भीं धरी,
तेजें लोभवि लोचनें, मृदुपणा ज्याच्या न कोठें सरी;
तें कौशेयहि तंतुरूप निपजे पर्णाशनापासुनी,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? ५
टाकी जाळुनि वाटतें खरकरीं चंडांशु सारी मही,
झाले क्लान्त समस्त सत्त्व, न पिण्या पाणी मिळे अल्पही;
त्या कालीं फुलुनी लता-तरु सुमें जाती फळें दाटुनी,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? ६
सिंधूचें जळ खारटें, कडु, असो गर्तेतलें घाणलें,
होवो पंकिल थिल्लरांतिल, असो कूपस्थ शेवाळलें;

सारें होउनि गोड निर्मल करीं भूमीस ये खांतुनी,
देवा ! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं ? ७
ये बीजांतुनि वृक्ष सिद्ध जरि हें, कंदांतुनीही किती;
शाखेपासुनि अन्य, कोणि लतिकापर्णांतुनी वाढती;
स्थाणूपासुनि अन्य, अन्य रुजती अंशांकुरापासुनी;
देवा ! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं ? ८
कोठें ती वटधानिका अणुसमा; कोठें महावृक्ष तो;
तुंबी क्षुद्र लता कुठें, फल तिचें कोठें, पहा भेद तो;
कोठें पिप्पल तो विशाल परि तीं क्षुद्रें फलें त्याहुनी;
देवा ! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं ? ९
आधीं कोमल, लाल पाटल पुढें, हारीत त्यानंतर
मागोनी गहिरें सुपक्क पिंवळें; अंतीं पुरें पांडुर;
ऐसें एकचि पर्ण षड्विध धरी रंगासि पाहों वनीं;
देवा ! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं ? १०
पर्णी तूवरता; सुमीं मधुरता; वृंतीं क्वचित् तिक्तता;
गर्भी अमृतता; त्वचेसि कटुता; कोशांत काषायता;
आम्रीं षड्विध ही रुचि प्रकटते एक्याच त्या जीवनीं,
देवा ! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं ? ११
भूमी हे उदकीं स्थिरा, परि जला आधार ही मेदिनी,
'अग्नेराप' म्हणे श्रुती, परि उठे मेघांत सौदामिनी;
वायूपासुनि अग्निही, गति परी बाष्पासि अग्नींतुनी,
देवा ! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं ? १२
पृथ्वी ही उदकीं विरे, अनिल हा शोषूनि टाकी जला,
वायू चेतवि मालवीत अनला, आकाश घे वायुला;
नांदे पंचक हें विरोधि शरिरीं अन्योन्यसंमिश्रणीं,
देवा ! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं ? १३

घेओनी घट, त्यांत गोमय नवें घालोनि मार्जी दधी,
जातां वासर अल्प वृश्चिक नवा निर्माण हो त्यामधीं;
होई चेतनकार्य अद्भुत कसें हेतू जडापासुनी,
देवा! कौतुक हें तुझेंचि तुजला साधे, न अन्या, जनीं! १४
'कार्या कारण' हें 'सजातिय' जरी सिद्धांतिलें पंडितीं,
'होती चेतन विंचु त्या जड घटीं' आचार्य हे लेखिती;
देहीं तद्विपरीत केश नख हे सचेतनापासुनी,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं! १५
जाग्रत् स्वप्न सुषुप्ति तीन, चवथी तुर्या, पुढें उन्मनी,
ऐशा या स्थिति पांच भिन्न असती प्रत्यक्ष योगीजनीं;
सर्वां एकचि साक्षिरूप फिरतो हा जीव पांचांतुनी.
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? १६
वक्ता एक अनेक श्रोतृगण ते एकस्थळीं बैसती,
येई एकचि शब्द वक्तृवदनीं सारे पृथक् ऐकती;
होई एकचि नैकरूप रव तो एकत्व ना टाकुनी,
देवा! ही किमया तुझ्याविण दुज्या कोणास साधे जनीं? १७
ऐसा राहसि तूं चराचर जगा व्यापूनियां एकला,
मूढां गूढ न हें कळोनि कलहो मोठा जनीं माजला;
कोणी बोलति भिन्न जीवशिव हे, अंशांशि ऐसें कुणी,
देवा! कौतुक हें तुझेंचि तुजला, अन्या न ठावें, जनीं १८

मा. ह. मोडक—मासिक मनोरंजन.

---

## ५. देवावर निष्ठा.

### ओंव्या.

भक्तिभाव आणि भजन, निरूपण आणि कथाकीर्तन,
प्रेमळ भक्ताचें गायन, आवडे देवा १

आपण तैसेंचि वर्तावें, आपणासि तेंचि आवडावें,
मनासारिखें होतांचि स्वभावें, सख्य घडे नेमस्त २
देवाच्या सख्यत्वाकारणें, आपुलें सौख्य सोडोनि देणें,
अनन्यभावें जीवें प्राणें, शरीर तेंहि वेंचावें ३
देवाच्या सख्यत्वासाठीं, पडाव्या जिवलगांसि तुटी,
सर्व अर्पावें शेवटीं, प्राण तोहि वेंचावा ४
आपुलें अवघेंचि जावें, परी देवासि सख्य रहावें,
ऐसी प्रीती जीवेंभावें, भगवंतीं लागावी ५
सखा मानावा भगवंत, माता पिता गण गोत,
विद्या लक्ष्मी धन वित्त, सकळहि परमात्मा ६
देवाचें जें मनोगत, तेंचि आपुलें हित निश्चित,
इच्छेसाठीं भगवंत, अंतरूं नये कीं ७
देवाच्या इच्छेनें वर्तावें, देव करील तें मानावें,
मग सहजचि भावें, कृपाळू देव ८
पाहतां देवाचे कृपेसी, मातेची कृपा कायसी,
माता वधी बाळकासी, विपत्तिकाळीं ९
देवें भक्त कोण वधिला, कधीं देखिला ना ऐकिला,
शरणागतासि देव झाला, वज्रपंजरू १०
देव भक्तांचा कैवारी, देव पतितासि तारी,
देव होय सहाकारी, अनाथांचा ११

रामदास–दासबोध.

---

## ६. मैत्रेय मुनीचा कौरवांस शाप.

एके समयीं मैत्रेय नांवाचा ऋषि तीर्थयात्रा करीत काम्यक वनांत प्राप्त झाला. तेथें त्यानें जटा धारण केलेले व वल्कलें नेसलेले असे पांडव पाहिले. दुर्योधनादिकांच्या दुष्टपणामुळें पांडवांस वनवास करावा लागला हें पाहून मैत्रेयास अतिशय वाईट वाटलें. तो लागलाच धृतराष्ट्राकडे गेला. तेथें त्यानें

धृतराष्ट्राची व दुर्योधनप्रभृति धृतराष्ट्रपुत्रांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला; एवढेंच नव्हे तर दुर्योधनानें मुनीचा उपहास व तिरस्कार केला. यामुळें त्या मुनीस पराकाष्ठेचा कोप येऊन त्यानें, दुर्योधनास तत्काळ, कुरुकुलाचा विध्वंस होईल, अशा अर्थाचा शाप दिला. हा कथाभाग खालच्या उताऱ्यांत आला आहे.

**ओंव्या.**

मैत्रेय भानु मूर्तिमंत, तैसा देखिला अकस्मात,
सुतांसहित अंबिकासुत, सम्मानीत तयासी १
सुयोधन पुसे वर्तमान, कोठोनि जाहलें आगमन?
मैत्रेय म्हणे, "तीर्थें संपूर्ण, करीत आलों काम्यकवना २
तों पांडव देखिले अकस्मात, जटाधर वल्कलवेष्टित,
तृणशेजेवरी निजत, उष्ण वात बहु तेथें ३
परम सुकुमार पांचाली, चंपककलिका लावण्यशाली,
वातोष्णें कोमाइली, आपाद देखिली समग्र म्यां ४
कपटद्यूत खेळोन, बाहेर घातले पांडुनंदन,
अद्यापि तरी ऐक वचन, आण बोलावूनि जाऊनि तूं ५
महासाधु विदुर भक्त, विख्यात वीर बलवंत,
हिडिंब किर्मीर अद्भुत, राक्षस मारिले भीमसेनें ६
खांडववन देऊनि वैश्वानरा, जर्जर केलें निर्जरेश्वरा,
अरे त्या कपिवरध्वजमहावीरा, समरीं कोण जिंकील? ७
सोमवंश विजयध्वज, सर्वलक्षणयुक्त धर्मराज,
तरी त्यासी देई राज्य, यथाविभाग समत्वें ८
द्रोह सांडी सुयोधना, वांचविणें आहे आपुल्या प्राणा,
तरी तूं जाऊनि काम्यकवना, पृथानंदना आण वेगीं" ९
ऐसें ऐकतां दुर्योधन, परम क्षोभला जैसा कृशान,
श्मश्रु हातें पिळोन, अंक हातें थापटित १०

शं.आटप ३.५



सव्य पद घांसी मेदिनी, गर्वें न बोलेचि पापखाणी,
सक्रोधें हुंकार देउनी, अधर दशनें रगडित 11
ऐसें देखतांचि जाण, प्रलयीं क्षोभे मृडानीरमण,
तैसा शाप वदे मैत्रेय दारुण, जो कां अलोट हरिहरां १२
म्हणे, "चांडाल तूं दुर्योधन, द्वेषी, हिंसक, कुटिल पूर्ण,
करिसी तपस्वियांचा अपमान, गर्वें करून बोलसी १३
न धरिसी ब्रह्मज्ञांची मर्यादा, दुष्टा मलिना मतिमंदा,
तुझे अंकीं भीमाची गदा, विद्युल्लतेऐसी पडेल १४
तेणेंचि अंक चूर्ण होऊन, तळमळून सोडिशील प्राण,
माझें असत्य शापवचन, जलजासनाचेनि पैं नोहे १५
मदें माजला जेवीं वस्त, कीं पिसाळलें श्वान यथार्थ,
कीं डुकर माजलें वनांत, हाणी दांत भलत्यासी १६
तैसा तूं माजलासी पूर्ण, पक्क फणस जेवीं होय चूर्ण,
तेवीं भीमगदें करून, छिन्नभिन्न अंक हो कां" १७
ऐसें मैत्रेय बोलोन, सर्वांचि पावला अंतर्धान,
जैसा कायेंतून जाय प्राण, तो नेणवे कोणासी १८

श्रीधर—पांडवप्रताप.

---

## ७. जमदग्नीचा कोप व परशुरामाची मातापितरांवरील भक्ति.

सहस्रार्जुनाचा वध करण्याकरितां इंद्र हा कपटवेषानें एकदां जमदग्नीच्या आश्रमांत आला आणि आपणाला अतिशय तहान लागली आहे असें सांगून उदकाची याचना करूं लागला. जमदग्नि ब्रह्मकर्मांत गुंतले होते. त्यांनीं आपली पत्नी रेणुका हिला अतिथीला पाणी देण्याविषयीं सूचना केली. परंतु कपटवेषधारी इंद्राविषयीं तिच्या मनांत शंका आली. तिला वाटलें हा कोणी राक्षस असावा व आपण जर याला पाणी दिलें, तर हा त्याचें विष बनवील व तें पिऊन मेल्याचें सोंग आणील! आणि असें झालें म्हणजे विनाकारण

अतिथिहत्येचें पातक लागेल; शिवाय पतीच्या कोपालाही पात्र व्हावें लागेल. असें मनांत येऊन ती इंद्राला पाणी देईना. तेव्हां रेणुका पाणी देत नाहीं असें पाहून ऋषीनें आपला कमंडलु पुढें केला व त्यांतील उदक प्राशन करून अतिथि निघून गेला. इकडे रेणुकेनें आपला आज्ञाभंग केल्यामुळें जमदग्नीला अनावर क्रोध उत्पन्न झाला; व त्याच्या भरांत त्यानें आपल्या मुलांस मातेचा तत्काल वध करण्याविषयीं आज्ञा केली. पण असलें घोर कर्म करण्याला त्यांपैकीं कोणीही प्रवृत्त होईना. तेव्हां त्यांनाही जमदग्नीनें शाप देऊन गतप्राण करून सोडिलें! इतक्यांत जमदग्नीचा मुलगा परशुराम कांहीं कामाला बाहेर गेला होता, तो आश्रमाला परत आला. त्यालाही ऋषीनें मातेचा शिरच्छेद करण्याविषयीं आज्ञा केली. ती त्यानें तत्काल मान्य केली आणि अंमलांतही आणली! मुलाची आज्ञाधारकता पाहून जमदग्नीस पराकाष्ठेचा संतोष झाला. तो आपल्या मुलाला म्हणाला, 'बाळा परशुरामा! मी फार प्रसन्न झालों आहें, तुला वाटेल तो वर माग.' परशुरामानें अतिशय चातुर्यानें वर मागितला. तो म्हणालाः—'बाबा, माझ्या परमप्रिय आईला व भावांना पुनः जिवंत करा, माझ्या आईला मीं तिचा वध केल्याची आठवण होऊं देऊं नका आणि आपण आपला कोप सोडून द्या.' जमदग्नीनें या सगळ्या गोष्टी एकदम कबूल केल्या; व त्याप्रमाणें मृतपुत्रांसह रेणुकेस उठविलें व राग सोडून दिला! ही बोधप्रद गोष्ट खालच्या उताऱ्यांत आहे.

### ओंव्या.

वध करावया सहस्रार्जुनासी, इंद्र आला जमदग्नीपासीं, धरोनियां दीनवेषासी, अतितृषेसी तृषित १. पाहोनियां विहित काळ, साधूनि अतिथीची वेळ, मागों आला जी तत्काळ, केवळ जळ ऋषीपाशीं २. तोंड कोरडें पैं जालें, दोनीं वोठ वाळून गेले, कांहीं न बोलवे बोलें, कराग्रीं दाविलें उदकासी ३. ऋषि म्हणे रेणुकेसी, 'शीघ्र उदक देईं अतिथीसी', येरी जाणोनि कपटवेषासी, निजमानसीं शंकली ४. मज यासि देतां उदक, हा करील कडू विख, ऋषि कोपेल आत्यंतिक, जीवीं धुकधुक लागली ५. अतिथि छळील उदक देतां, जमदग्नि कोपेल न देतां, थोर ओढवली संकोचता, कांहीं कर्तव्यता स्मरेना ६. जमदग्नि अतिसमर्थ सर्वज्ञ, जाणे

आश्रमधर्मरक्षण, हातींचें अग्रोदक जीवन, करवी प्राशन अतिथीसी ७. जमदग्नीनें आपण, करविलें अतिथीसी उदकपान, रेणुका म्हणे मीं छाळिलें पूर्ण, विघ्न दारुण मज आलें ८. कोपें ऋषि म्हणे रेणुकेसी, 'तूं केवळ कृत्या कर्कशी, उदक न देओनि अतिथीसी, पतिवचनासी पराङ्मुख ९. केवळ निमोलें उदक, नेदूनि झालीस विन्मुख, जळो तुझें काळें मुख, तुझें सुख मज नाहीं. १०. गृहिणीस्तव गृहस्थाश्रम, ते जैं पाळीना आश्रमधर्म, तिचा मग कोण संभ्रम,' अति दुर्गम कोपला ११. कोप नावरे ऋषीसी, पाचारोनियां पुत्रांसी, 'वेगीं तुम्ही वधा इसी, ममाज्ञेसी अति शीघ्र' १२. पुत्र म्हणती 'स्वामिनाथा, जैसा पिता तैसीच माता, आम्हांसि वध्य नव्हे सर्वथा, हें तत्त्वतां विचारीं' १३. 'प्रेत न मानी पित्याचें वचन, तैसेच तुम्ही पांचही जण, आतांचि जाओनि प्राण, प्रेतत्व पूर्ण पावाल' १४. ऐसें ऐकतां ऋषिभाषण, तत्काळ ते पांचही जण, प्रेतत्व पावले पूर्ण, ऋषिभयें प्राण पळाले १५. प्राण म्हणे आयुष्य असतां, मज जाऊं नये म्हणोनि रहातां, तैं ऋषिशाप बैसेल माथां, तेणें धाकें तत्त्वतां पळाले प्राण ! १६. ऋषिभयें पळाले प्राण, प्रेतत्व पावले पांचही जण, तरी ऋषीचा कोप दारुण, क्षोभलेपण सांडीना १७. तेचि समयीं फरशधर, सुमनें घेऊनि आला शीघ्र, ऋषीस केला नमस्कार, त्यासही दुर्धर आज्ञापी १८. 'करीं रेणुकेच्या घाता,' येरें तात्काळ छेदिला माथा ! तेणें आल्हाद ऋषीचिया चित्ता, प्रसन्नता संतुष्ट १९. ऋषि गर्जे प्रसन्नता, 'मागसी तें देईन आतां,' रामें चरणीं ठेविला माथा, 'विनंति स्वामिनाथा अवधारीं २०. माझी उठवावी हे माता, बंधूंची दवडावी प्रेतता, हेंचि मागतों गुरुमाथा,' 'दिल्हें तत्त्वतां' ऋषि म्हणे २१. 'तुझा लागतांचि हात, बंधु प्रेतत्वा होती निर्मुक्त, चेतनासुखें सावचित्त, यथास्थित वर्तती २२. रेणुकेचीं दुखंडें, तुझे हातें होती अखंडें, शांति सुखाचेनि सुरवाडें, वाडें कोडें उठेल' २३. 'म्यां छेदिली निजमाता, हें नाठवो मातेच्या निजचित्ता, ऐसी मज द्यावी वरदता,' चरणीं माथा ठेविला २४. 'तुझें नाठवे छेदिलेंपण, अंगीं घायाचे न दिसती वण, निद्रेपासोन उठली आपण, तैसें लक्षण पावेल' २५. ऐकोनि वरदभाषण

हृदयीं संतुष्ट ऋषिनंदन, तांतडी परशुराम आपण, केलें सावधान मातेसी २६. परशुरामें लावितां हात, बंधु झाले सावचित्त, ते नेणती मातेचा घात, तिसीही निजघात नाठवे २७. पुत्रें सोडविलें शापापासून, रेणुकेसी आल्हाद पूर्ण, परशुरामातें आलिंगून, वदे वरदान रणविजयी २८. स्त्रीपुत्र जालिया सावधान, जमदग्नि जाला अति उद्विग्न, केवढें क्रोधाचें विंदान, अधःपतनदायक! २९. स्त्रीपुत्रांचा करितां घात, मज होतें अधःपतन येथ, धन्य परशुराम सुत, अति अनर्थ चुकविला ३०.

एकनाथ—भावार्थरामायण.

---

## वासंती आणि रामचंद्र.

शंबूक नांवाच्या शूद्राला धर्मबाह्य आचरणाबद्दल शासन करण्याकरितां रामचंद्र दंडकारण्यांत प्राप्त झाला. शंबूकाचा वध केल्यानंतर रामानें पूर्वपरिचित पंचवटीप्रदेशांत प्रवेश केला. तेथें वासंतीनामक वनदेवतेची व त्याची गांठ पडली. वनवासप्रसंगीं तिची व सीतारामचंद्रांची दाट ओळख झाली होती. सीतेवर वासंतीचें अत्यंत प्रेम होतें व रामचंद्राविषयीं तिच्या मनांत पराकाष्ठेचा आदर वसत होता. रामानें सीतेचा त्याग केला हें अतिशय अनिष्ट वर्तमान तिला कळलें होतें. रामाची भेट होतांच तिनें त्याचें प्रेमपूर्वक स्वागत केलें; पण पुढें सीतात्यागाबद्दल तिनें त्याशीं मर्मभेदक भाषण केलें. हा हृदयद्रावक प्रसंग खालीं संवादरूपानें वर्णिला आहे.

**वासंतीः**—रामदेवा! आतां येथें आसन टाकून क्षणभर बसावें. हें स्थल तुझ्या परिचयाचें असेल!

**श्लोक.**

रंभावनांतिल शिलातल हेंच रामा, आलें तुझ्या सतत हें शयनास कामा,
सीता इथेंच तृण देत बसे मृगांतें, सोडोनि जात नव्हते मृग या स्थलातें १

**रामचंद्रः**—हें स्थळ माझ्यानें पाहवत नाहीं (असें म्हणून रुदन करीत दुसरीकडे जाऊन बसतो).

**वासंतीः**—अहो वनदेवतांनो! हा रामभद्र आपल्या घरीं आला आहे, या समयीं याचा उत्तम सत्कार व्हावा हें योग्य आहे.

श्लोक.

फलमधुकुसुमांनीं वृक्ष पूजोत सारे,
स्फुटकमलसुगंधी मंद वाहोत वारे;
मधुरतर करावा शब्द येथें शकुंतीं,
फिरुनि सहज आला राम कीं या वनांतीं. २

**रामः**––सखि वासंति, ये आपण इथें बसूं.

**वासंतीः**––( डोळ्यांस पाणी आणून म्हणते ) महाराज, कुमार लक्ष्मण खुशाल आहे का?

**रामः**––( न ऐकलेंसें करून बोलतो. )

श्लोक.

तृण जल वनधान्यें देउनी अंजलीनें
मृग तरु शकुनी जे पोसिले मैथिलीनें,
निरखुनिच तयांतें होय कांहीं विकार
द्रवसम हृदयाला स्पष्ट हा भेदणार. ३

**वासंतीः**—महाराज, मी विचारतें हें अगोदर सांगा. कुमार लक्ष्मण खुशाल आहे ना?

**रामः**—( आपल्या मनांत म्हणतो ) हिनें मला महाराज असें उपरोधिक संबोधन दिलें आणि लक्ष्मणाचा कुशलप्रश्न करतांना हिचा कंठ दाटून आला व नेत्रांस अश्रु आले. ह्यावरून मला वाटतें सीतेचा वृत्तांत हिला समजला आहे. ( उघडपणें ) हो हो, कुमार लक्ष्मण खुशाल आहे. ( रडूं लागतो. )

**वासंतीः**—बा रामा! तूं असा कठोरहृदयाचा कसा रे झालास?

पद.

किति रे असशी तूं निष्ठुर रामा, नवमेघश्यामा! ॥ ध्रुव०॥
कुसुमाहुनिही जी अतिसुकुमारी, मिथिलेशकुमारी,
उदरीं गर्भाचें ओझें भारी, ती स्त्री कांतारीं
विजनीं नेऊनि त्यजिली कैशी, एकाएकीं निजविश्रामा! किति० १

प्राणांहुनियाही जी प्रिय तुजला, मोकलिलें तिजला,
प्रेमा तिजविषयीं कोठें गेला, उर नाहीं भिजला,
वचनीं राहुनि कामें मनांतील, पुरवी ऐसी त्यजिली रामा, किति० २
अबलेची त्या गति होइल कैसी, स्मृति नाहीं ऐसी,
व्याघ्राच्या वदनीं गाई जैसी, त्यजिली त्वां तैसी,
प्रभु तूं! तुजला काय म्हणावें? इच्छिसि तैशा करिसी कामा. कि० ३
(मनांत खेद करून) हर हर! काय दैवगति ही!

श्लोक.

तूं जीव तूं हृदय तूं मजला विसांवा, तूं चंद्रिकाच नयना शरिरा सुधा वा;
मोहीं जिला वदुनि यापरि गुंतवावें, तीतेंचि–हाय! तुज काय पुढें वदावें!

(इतकें बोलून मूर्च्छा पावते.)

**रामः**—(मनांत म्हणतो.) पुढें न बोलणें आणि मोह पावणें या दोन्ही गोष्टी स्नेहास योग्यच आहेत. (उघडपणें) सखे! सावध हो, सावध हो.

**वासंतीः**—(सावध होऊन) तर मग अशी अयोग्य गोष्ट आपण कां बरें केली?

**रामः**—लोकांस सोसेना म्हणून.

**वासंतीः**—कोणत्या कारणामुळें?

**रामः**—कोणतें कारण तें लोकच जाणत असतील!

**वासंतीः**—लोकांची समजूत कशीही असली म्हणून त्वां असें करावें काय? यांत काय मिळविलें?

श्लोक.

कठिणहृदय रामा आवडे कीर्ति तूतें
तरि वद अपकीर्ती याहुनी काय मातें?
वनिं गति अबलेची काय झाली असेल
तव हृदयिं नरेन्द्रा! वाटतें काय बोल. ५

**रामः**—दुसरें काय वाटावयाचें आहे?

श्लोक.

भ्याल्या मृगापरि जिची सुविलोल दृष्टी,
जी पूर्ण गर्भ धारितां बहु होय कष्टी;

ह. क. 932

जीची शरीरलतिका कुसुमीं स्रवावी
रानांत हिंसकजनीं गिळिली असावी.

( विरहाकुल होऊन ) हे प्राणप्रिये जानकि ! आतां तूं कोठें आहेस ?

श्लोक.

हृदय उलतें शोकें माझें, नव्हे द्विविधा तरी,
विकल करिते मूर्च्छा काया, न जीवित संहरी;
अंतुनि तनुसी भाजी ज्वाला न भस्म करीतसे,
विधि जरि करी मर्मोच्छेदा न जीव हरीतसे. ७

अहो अयोध्यापुरवासी देशवासी जनहो !

स्थिति निजगृहीं त्या देवीची तुम्हां नच रूचली
म्हणुनि तृणवत् ती म्यां रानीं त्यजूनि न शोचली;
परि परिचिता त्या त्या वस्तू न राहविती थिरा
म्हणुनि रडतों हा मी येथें क्षमा जनहो करा ! ८

**वासंती:**—रामा, जी गोष्ट होऊन गेली, तिजविषयीं आतां धैर्यच धरलें पाहिजे.

**राम:**—सखे, धैर्य धरावें म्हणून सांगावयास नको. धैर्यच आहे. पहा.

श्लोक.

त्या देवीनें शून्य हा लोक झाला, बारा वर्षें लोटलीं कीं तयाला;
प्राया तीचें जाहलें नष्ट नाम, आहे अद्यापीहि जीवंत राम ! ९

अगे वासंती ! पहा वरें, म्यां—

श्लोक.

वेगें उरीं बाणाचि लागतो तसा, किंवा अहीच्या विषयुक्त दंतसा,
जो शोकशंकू हृदयास लागला, तो मर्मभेदी तरि कां न साहिला. १०

शोकक्षोभप्रसरशमनीं यत्न जो जो करावा,
मोठ्या कष्टेंकरुनि हृदयीं सावधानें धरावा;
त्यातें त्यातें मथुनि पसरे अंतरीं हृद्विकार,
क्षेत्रीं जैसा मथुनि सिकतासेतुतें तोयपूर. ११

**वासंतीः**–( मनांत म्हणते ) हा रामदेव तर फारच शोकसंकटांत पडला. याचें चित्त दुसरीकडे लाविलें पाहिजे. ( उघडपणें ) महाराज ! हे पंचवटीचे देश आपल्या फार दिवसांचे ओळखीचे आहेत. ह्यांकडे पाहून या समयीं अंतकरणास कांहीं आनंद द्यावा.

**रामः**—बरें आहे. तसेंच करतों. ( असें म्हणून उठतो व इकडे तिकडे फिरतो. )

**वासंतीः**—( करुणायुक्त होऊन ) रामदेवा ! हें लतागृह पाहिलें काय ?

**श्लोक.**

या कुंजांतचि वाट पाहत तिची होतास, ती गोमटी
होती हंसविलास देखत उभी गोदावरीच्या तटीं;
येतां खिन्न तुला विलोकुनि, तिच्या शंका मनीं वाटली,
भीतीनें तुज हात जोडुनि तिनें केला प्रणामांजली ! १२

**रामः**—अगे निर्दये जानकि ! मज मंमभाग्याची तुला दया येत नाहीं काय ?

**श्लोक.**

हा हा देवी ! हृदय फुटतें देह माझा गळाला,
वाटे शून्य त्रिभुवन मला अंतरात्मा जळाला;
या आत्म्यानें किति तरि सदा दुःखभारा धरावें
मोह व्यापी फिरफिरुनि ! म्यां काय आतां करावें ? १३

प. पं. गोडबोले–उत्तररामचरित्र.

---

## ९. संतांना दंडवत.

**अभंग.**

तुम्ही संत मायबाप कृपावंत, काय मी पतित कीर्ती वानूं १
अवतार तुम्हां धराया कारण, उद्धरावे जन जड जीव २
वाढावया सुख भक्ति भाव धर्म, कुळाचार नाम देवाजींचें ३
तुका म्हणे गुण चंदनाचे अंगीं, तैसे तुम्ही जगीं संतजन ४

तुम्ही साधुसंत कैवल्यसागर, मोक्षाचें आगर तुम्हां घरीं १
तेथें मतिमंद काय बोलों वाणी, अमृताचे धणी पाणी कां घ्या २
कोटिभानुतेजीं खद्योत बापुडें, तैसा तुम्हांपुढें काय बोलों ३
तुम्ही अवघे चिंतामणि कल्पतरुचीं वनें, त्यापुढें धांवणें मशकांनीं ४
वाराणसी क्षेत्र गंगा वाहे कोड, काय तेथें पाड कोंकणाचे ५
पल्लवाचा वारा हिमकरीं काय, गगनावरी छाय कोण करी ६
समुद्राची तृषा हारी ऐसा कोण, जगाची जी तान्ह नीववी तो ७
मेरूचा पाठार अवघी ते क्षिती, मशकाचे हातीं मुष्टी फावे ८
सिंहापुढें काय जंबुकआरोळी, मोतीयांचे वोळी कांच काय ९
कापुरासी काय लावूनी उटावें, काय ओंवाळावें दीपकासी १०
तसे तुम्ही निरे ज्ञानाचे भरींव, तेथें म्यां बोलावें पाड काय ११
कृपानिधी तुम्हीं बोलविलें बोलां, सुखें न्याय केला तुमचा मीं १२
अज्ञान मी वेडें म्हणवीतों बाळ, माझा प्रतिपाळ करणें तुम्हां १३
बोबडें बोलणें न धरावा कोप, क्षमा करा बाप कृपासिंधु १४
तुका म्हणे तुम्ही संत बापमाय, भयें धारिले पाय कृपानिधि १५

तुकाराम–गाथा.

---

## १०. तुफान.

वादळांत सांपडलेल्या एका नावेचें वर्णन प्रस्तुत काव्यांत केलें आहे.

श्लोक.

जवन पवन धांवे सायकाच्या गतीनें,
जलनिधि खवळे हा त्याचिया संगतीनें;
अहह ! कहर केला आजि या फार वातें;
बसति कितिक झोके आमुच्या तारवातें १
पुरुषभर उडोनी मागुती येत खालीं,
खळ खळ जळ येतें आंत जैशा पखालीं !

भरुनि भरुनि त्यातें श्रांत झाले खलाशी,
सुजन सदुपदेशा जेविं देतां खलाशी. २
उसळति लहरी या पर्वतप्राय तुंग!
बघुनि मति भयानें होतसे सर्व गुंग;
क्षणहि भरंवसा या येइना तारवाचा,
विकलवदनिं चाले घोष चिंतारवाचा. ३
बघुनि मन थरारे सिंधुची उग्र मुद्रा,
व्यसनसमयिं धांवें तूं दयेच्या समुद्रा!
फिरफिरुनि उठे हा घोर कल्लोळ लाटीं,
विधिलिखित कळेना काय आहे ललाटीं! ४
बहुत कठिण घो घो वाहतो काय वारा!
क्षणभरि गवसेना प्राणिमात्रा निवारा;
अटपुनि अवजारें फाटकीं छिन्न भिन्न,
दिसति मनिं खलाशी जाहले फार खिन्न. ५
म्हणति शरण आम्ही तारिं रे वायुदेवा!
विसरुन चुकलीसे कोणती सांग सेवा?
नवस करुनि भावें फोडिती श्रीफलांतें,
घडि घडि अठवीती बायकांतें मुलांतें. ६
डुलत डुलत तारूं आपटे एक बाजू,
धरणि पडत जेवीं एक भारें तराजू,
प्रतिसमयिं तडाका अब्धिची लाट हाणी,
हिकडुनि तिकडे हें खेळतें सर्व पाणी. ७
किति तरि लहरींची होय मोठी कमान,
वळणसुद दिसे ती पर्वताच्या समान;
गगनिं जळ चढोनी होतसे छत्र काळें,
वदन पसरलें हें खावया काय काळें? ८

चढुनि चढुनि लाटा झांकिती सूर्यबिंब,
  स्थळ वसन भिजोनी जाहलें सर्व चिंब;
हुडहुडि भरुनीयां अंग झालें बधीर,
  अह्मांनि मनिं धरावा कोठपर्यंत धीर! ९
अवजड परी जोरें डोलकाठीहि हाले,
  कर कर कर ऐसा सारखा शब्द चाले!
तट तट तट जाती दोरखंडें तुटोनी
  शिव शिव! हृदयींचा धीर गेला सुटोनी! १०
कवळुनि तुळयांतें बैसलों एक ठायां
  गर गर फिरतें कीं शक्ती नाहीं उठाया;
फिरुनि फिरुनि डोकें पित्त आलें कपाळा,
  अतडिं तुटुनि गेलीं ओकतां विश्वपाळा! ११
वराति दिसत सारें शून्य आकाशमात्र
  जलमय भय वाटे खालतें सिंधुपात्र,
गगनिं दिसत नाहीं एकही आज पक्षी
  कठिण समय आला ह्यांतुनी कोण रक्षी! १२
तरु नगहि दिसेना! येथ कैंची जमीन?
  सभय पळत जाती मोठमोठेहि मीन!
इतर जलचरेंही धांवती सैरवैरा!
  व्यसनसमयिं, हा हा! टाकुनी लोभवैरा १३
गलबत खुटवीलें टाकुनी नांगरासी
  तरिहि जलधिसंगें ना टिके संगराशी;
अधिक अधिक वारा होतसे फार जोर
  अहहह! तुटला कीं नांगराचाहि दोर. १४
भडकुनि पवनानें स्वैर तारूं निघालें
  किति तरि न कळे हें दैव घालील घाले!

जलद हल खलाशी टाकिती दूसरा हो,
अजुनि तरि दमानें यापुढें स्थीर राहो. १५
फिरुनि जरि हलाचा दोर तोडील वायू,
तरि मग सकळांचें संपलें खास आयू!
गमत मम मना हा दोर नोहे हलाचा,
प्रगट निवळ तंतू जीविताच्या बलाचा ! १६
घडि घडि जइं होतो वायुचा फार जोर
दचकुनि तुटला कीं पाहतों काय दोर,
निशिदिनिं सकलांना लागला तोचि घोर,
व्यसनसमयिं होतो नीच हो फार थोर. १७
रडुनि रडुनि झालों काय हो दीनवाणी
नयन सुकुनि गेले आटलें सर्व पाणी;
उगिच करुनि होतों स्वस्थ ऐसा विवेक,
नविन नविन तों तों संकटें एक एक. १८
निविड गगनिं आल्या मेघपंक्ती भरून
सळ सळ जळधारा ओतती कीं वरून,
गड गड गड अंगा गर्जना कांपवीते,
जलद जलद आला साह्य व्हाया पवींतें. १९
चम चम चम नाचे काय विद्युल्लता ही
कड कड कड शब्दें नाद कोंदून राही,
घसरुनि पडते ही वाटते मस्तकांत
खचित खचित आलों मृत्युच्या मी मुखांत ! २०

कृ. ना. आठल्ये–केरळकोकिळ.

---

## ११. अन्योक्तिकलाप.

अन्योक्ति हा सामासिक शब्द आहे. यांत अन्य आणि उक्ति असे दोन शब्द आहेत. अन्य म्हणजे दुसरा, अप्रस्तुत; आणि उक्ति म्हणजे वचन;

तेव्हां अन्योक्ति म्हणजे अप्रस्तुताविषयीं वचन. अप्रस्तुताविषयीं बोलावें व त्याचें तात्पर्य प्रस्तुताकडे लागू पडावें अशी जी भाषणाची रीति, तिला अलंकारशास्त्रांत अन्योक्ति असें नांव आहे. प्रत्यक्ष जी गोष्ट उघडपणें सांगतां येत नाहीं, ती अन्योक्तीनें मोठ्या खुबीनें सुचवितां येते. पहा, पुढच्या कोकिलान्योक्तींत कोकिल या अप्रस्तुत पदार्थाचें वर्णन आहे, परंतु त्याचें तात्पर्य प्रथम संपन्न असणाऱ्या व पुढें दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या अशा थोर माणसाकडे लागू पडतें.

श्लोक.

## कोकिलान्योक्ति.

ज्याचे पूर्वी वसंतीं परिमलबहलीं आम्रवृक्षीं सुखाचे
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्तभृंगांगनांचे,
कैसे त्या कोकिलातें करिति अधम हे कावळे चंचुघाता!
कोठें थारा मिळेना! गरिब पळतसे वांकडा काळ येतां. १

## मयूरान्योक्ति.

झाडें पेटुनि वाजती कडकडां त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाला राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे;
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा दवानल असे, मोरा! पळें रे घरा. २

## शुकान्योक्ति.

तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे,
मला वाटे मोठा तुजजवळि हा दोषचि वसे;
शुका! तीच्या योगें सतत पिंजऱ्यामाजिं पडशी,
गड्या स्वातंत्र्याचीं अनुपम सुखें सर्व मुकशी! ३

## सिंहान्योक्ति.

भृंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्तीहि जीतें
डोळां देखोनि होते पळत भयभरें सोडुनीयां धृतीतें;
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला, त्या गुहेमाजिं आतां
सिंहाच्या, क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां! ४

मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरतीं सिंह पाही स्वभावें,
काका ! त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरीं मांसखंडासि खावें:
जो उन्मत्तां गजांच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकांतें
घाला रक्ता पिऊनी, नच मृत पशुच्या इच्छितो तो कणांतें. ५

## गजान्योक्ति.

कंठीं मोठा बळकट असे पाश, पायांत बेडी,
बैसोनीयां शिरिं नर तुझ्या अंकुशें गंड फोडी;
जीपेक्षां कीं मरण बरवें भासतें त्या दशेतें
पावोनीयां अजुनिहि गजा ! दाविशी कां मदातें ? ६

## वृक्षान्योक्ति.

दावाग्नी खवळोनियां तरुवरा जाळीतसे जैं बळें,
जाती सर्व पळोनि कोकिल शिखी रावे तसे कावळे;
भक्षायास फळें चहोंकडुनियां एकत्र जे जाहले,
येतां संकटकाळ होय जवळी ऐसा न कोणी मिळे. ७

## चंदनान्योक्ति.

वनीं विलसती बहू विविध वृक्ष चोहींकडे
तयांत मज चंदनासम न एकही सांपडे,
जयास न दिलीं फळें न कुसुमेंहि देवें जरी
शरीर झिजवूनि जो तरि परोपकारा करी. ८

## आम्रान्योक्ति.

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी,
गंधें युक्त फुलें फळेंहि असती ज्याचीं सुधेच्या परी;
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचे मुखींचें, भला
आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला. ९

## सूर्यान्योक्ति.

कोकां शोकास त्यांच्या शमवुनि दयितासंगमें हर्षवी जो,
कारागारें करांहीं उघडुनि कमलें भृंगही सोडवी जो,

जेणें अंधार सारा पळवुनि हरिलें सृष्टिच्या दृष्टिदोषा,
त्या मित्राचा बघोनी उदय कवण तो चित्तिं मानी न तोषा ? १०
देखोनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यन्तरीं जाउनी,
देशी ताप परी जसा वरिवरी येशी नभीं, भास्करा,
अत्युच्चीं पदिं थोरही बिघडतो हा बोल आहे खरा. ११

## चंद्रान्योक्ति.

ज्या कांहीं तेज नाहीं, परम कृशहि जो त्या बिजेच्या शशीला
मोठ्या यत्नें पहाया झटति, बघुनियां वंदिती लोक त्याला;
वाढे तेजें कलांहीं पुढति बहु जरी, मान तो त्या न राहे
वस्तू वाटे नवी जों अवड बहु तिची, लोकरीती अशी हे. १२

## मेघान्योक्ति.

गर्वे पर्वतमस्तकीं जलधरा धारा वृथा वर्षसी
पीडा कष्ट करूनि नाविकजनां दुष्टापरी हर्षसी;
पाण्यावीण लता तरू सुकति हे, वृष्टी जरी यांवरी
रे मेघा करितास, कीर्ति भुवनीं होती तुझी बा तरी १३

## हंसान्योक्ति.

ज्याच्या तीरीं समन्तान्मधुरफलभरें वांकले वृक्ष भारी,
ज्यामाजीं पद्मखंडें फुलुनि विखरती गंध चित्तापहारी,
त्या जेणें मानसातें त्यजुनि वरियलें पंकिला पल्वलातें,
त्या हंसाच्या बकांनीं जरि पद दिधलें मस्तकीं, योग्य त्यातें. १४
पुष्पांहीं पल्लवांहीं विविध तरुवरां सर्वदा भूषवी जो,
नाना धान्यें फळेंही पिकवुनि सुखवी प्राणिमात्रा सदा जो;
हर्षे पाहोनि ज्यातें जग, धरिसि मनीं त्रास त्या अंबुदाचा,
हंसा, वर्णे जरी तूं धवल, तरि गुणें कृष्ण आहेस साचा. १५

कृ. शा. चिपळुणकर—पद्यरत्नावलि.

## १२. काय हा संसार !

### अभंग.

प्रपंचाचें ध्यान लागलें मानसीं, चिंता अहर्निशीं दुश्चंचल १
चंचल मानस संसार उद्वेग, क्षणक्षणीं भंगे चित्तवृत्ति २
वृत्ति गेह धन पाहे जगमान, इच्छेचें बंधन दृढावलें ३
आवरेना क्रोध तेणें होय खेद, वृत्तीचा उच्छेद करूं पाहे ४
अंतरलों भक्ति ठाकेना विरक्ति, देवा तुझी प्राप्ति केविं घडे ? ५
केविं घडे प्राप्ति मज पतितासी, झाल्या पापराशी सांगू किती ६
सांगू किती दोष झाले लक्ष कोटी, पुण्य माझे गांठीं आढळेना ७
आढळेना पुण्य पापाचे डोंगर, करितां संसार माझें माझें ८
माझी माता पिता माझे बंधुजन, कन्या पुत्र धन सर्व माझें ९
सर्व माझें ऐसा मानिला भरंवसा, तुज जगदीशा विसरलों १०
अहंभावें मनीं दुःख आच्छादोनी, वर्ततसें जनीं अभिमानें ११
अभिमान माथां वाहे कुटुंबाचा, अंतरीं सुखाचा लेश नाहीं १२
प्रारब्धाचा ठेवा प्रपंचीं रंगला, देहांतीं खंगला वृद्धपणीं १३
वृद्धपणीं माझें चळलें शरीर, श्रवण बधीर नेत्र गेले १४
नेत्र गेले मज पाहतां दिसेना, स्वयें उठवेना पाय गेले १५
पाय गेले तेणें दुःख होय भारी, तेथेंचि बाहेरी जाववेना १६
नेदी कोणी कांहीं क्षीण झालों देही, जीवलग तेही वोसंडिले १७
वोसांडिलें मज वैभव गेलिया, देह खंगलीया दुःख झालें १८
दांत गेले तेणें जिव्हेसी बोबडी, कंठ घडघडी बोलवेना १९
बोलवेना अंतकाळींच्या विपत्ती, सर्वही म्हणती मरेना कां २०
आला थोर त्रास जिवलग बोलती, देवा ! याची माती उचलावी २१
उचलावी माती सर्वांचे अंतरीं, सुखाचीं सोयरीं दुरीं ठेलीं २२
दुरीं ठेलीं सर्व दुःखाचीं चोरटीं, कोणीच संकटीं सोडवीना २३

रामदास—वैराग्यशतक.

## १३. अंगदशिष्टाई.

वालीचा मुलगा अंगद यानें रामचंद्राच्या आज्ञेवरून रावणाकडे जाऊन त्याला जानकी सोडून देऊन रामाला शरण जाण्याविषयीं बोध केला. तो पुढील पद्यांचा विषय आहे.

गीतिच्छंद.

"हे रात्रिंचरराजा! रामाचा दूत अंगदाभिध मी,
कोणी मला पुसाना, 'कोण असे?' काय बैसलों अधर्मी? १
वैदेहीच्या रमणें वीरें करुणाकरें जगद्रीतें
पाठविलें मज, त्याच्या ऐकें कल्याणहेतुसद्गीतें. २
'चतुरानन जगदीश्वर, त्याचा तूं पौत्र भूतपतिदास,
श्रुतसंपन्न, नयज्ञ, ब्राह्मणसुत, पावलासि सुपदास. ३
सुरभूसुर यत्नानें पूजावे, धर्मसेतु रक्षावे,
निर्मल यश जोडावें, व्यसनानाचार ते उपेक्षावे. ४
या विहिताचारातें, सोडुनि धरिलीस वृत्ति जननीचा,
अनुसरलासि दशास्या! पक्षाला तूं स्वकीय जननीचा. ५
विधिवरसामर्थ्यानें, होउनि मदमत्त वन्यकुंजरसा,
धर्मद्रु मोडिले हे केली ध्वस्तासि वेदकुंजरसा. ६
विप्रामर भजनीय स्तुत्य, तयांसींच लाविलें वैर,
कैरवपतिनिभपूर्वजयश मळवायासि वर्तसी स्वैर. ७
शमदमनयभयलज्जा सोडुनि हारिशी परांगनावित्त,
वित्तम होउनि निरयप्रद मार्गीं काय ठेविलें चित्त! ८
स्वकुलाला अंजन जो लावी, तो पुत्र न प्रसूविष्ठा,
शिष्टाचरणीं यास्तव नित्य असावी यशःप्रदा निष्ठा. ९
करिशी अन्याय बळें, हितोपदेष्टा तुला गमे द्वेष्टा,
स्वेष्टाशि मंतुवांचुनि धिक्कारिशी, हे बरी नव्हे चेष्टा. १०
जनकमहाराजसुता रविकुलतिलकाजसूनुची सून,
तूं न कळत नेली, तरि दे, हो सद्वृत्त आजपासून. ११

अपराध हा महाजननिंद्य तशी हे जनाधमा! केली,
अद्यापि मी पुलस्त्यद्विजाकडे पाहुनि क्षमा केली. १२
रघुकुलज श्रीमंत प्राज्ञ प्रबल क्षमादयानिलय,
शरणागतवत्सल हे ख्यात जनीं, शत्रुचा करूनि लय. १३
रविवंशज राजांची बहुसरला भ्रूलताहि चापलता,
ते वक्रा झाल्यावर, चालेना जिष्णुचीहि चापलता. १४
नाहीं तुजसीं मजसीं वैर, तथापि प्रियावियोग मला,
दिधला, यावरुनि तुझा स्वभाव विपरीत सर्वथा गमला. १५
वैदेहीला तूं जरि आणुनि देशील आझुनी मजला,
मीही लंकाजीवन अभय समर्पीन तत्क्षणीं तुजला. १६
नाहीं तरि सायक हे, हे भुज, हा खड्ग, हें धनूरत्न,
मी सज्ज जयधनातें, तूं निधनातें स्वयें करीं यत्न.' १७
यापरि तुज राजेंद्रें कथिलें, आतां करूं नको उशिर,
सीतोपायन घेउनि, ठेवीं, ये तत्पदांबुजीं स्वशिर. १८
तूं करुनि समर, न मर; भ्रमरसम रघूत्तमांघ्रिनवपद्मीं
रम; रस घे; अमरचि हो; भ्रमरहित स्वस्थ नांद निजसद्मीं! १९
दे उत्तर, निजलासा, बहिरासा, मूकसा, नको राहूं,
याहुनि हित काय वदों; न वदसि कां आझुनीहि चोरा! 'हूं' २०
अनल अनिल यम यक्षप वरुण विधु ब्रध्न सर्प गंधर्व,
सर्व पराजित केले, परि रामाशीं करूं नको गर्व. २१
राम प्रणतजनांचा त्राता, रिपुलोककाल यापाशीं
चेष्टा करितां दुष्टा! भ्रष्टा! पडशील मृत्युच्या पाशीं. २२
राम धनंजय तूंही कापुर तृण तूल काष्ठ घृत तैल,
शैलहि पिचविल, हें तुज नुमजे, तूं मातला जसा बैल. २३
यतिवेषें चोरानें बाटवुनी रामचंद्रदलकुटिला,
कुटिलानें रत्नातें नेलें, तो शत्रु पाहिजे कुटिला. २४

गिरिदलन मस्तकानें, स्वशिरोभंगार्थ दुर्मते कारिशी,
कारिशील तूं मदांधा ! नरकपुरी इच्छितोऽसि लोकारिशी" २५

मोरोपंत–मंत्ररामायण.

---

## १४. हिमालपर्वतावरील सृष्टिशोभा.

श्लोक.

जेथें प्रकल्पितजटेंतुनि शंकराच्या, ही येतसे प्रथम दृष्टिपथा जनांच्या,
तेथें घडीभर बसून समग्र सृष्टि–सौंदर्य भोंवतिल, देउनि सूक्ष्मदृष्टि. १
जातां बघूं, मग किती तरि जागजागीं चोहींकडील सुमनोहर भूविभागीं
शोभा दिसे ! विविध रम्य किती पदार्थ, देऊनि दर्शन तिला करिती कृतार्थ २
जैसें वसंतसमयीं मधुमक्षिकेला, चोहींकडून फुलल्या सुमवाटिकेला,
दैवें प्रवेश मिळतां तिजला अपार, होतो प्रमोद, मनिं उत्सुकताहि फार. ३
तैसेंचि मन्मन यया बघतां नगातें, आनंदसिंधुलहरींत बुडून जातें !
जो या स्थळीं रुचिर वस्तुसमूह थाटे, तो पाहण्यास मज कौतुक फार वाटे ४
त्यानंतरें मग जशी मधुमक्षिका ते, सानंद पंख अपुले उडवीत जाते;
एका फुलांतिल पिऊन रसा दुज्यातें, तेथीलही रस पिऊन पुढें तिजातें; ५
त्या रीतिनेंच मम दृष्टिहि या स्थळींची, शोभा विचित्र रमणीय पहावयाची
इच्छा धरून हृदयांत, यथाक्रमानें, सारे पदार्थ निरखी परमादरानें. ६

जातां दृष्टि प्रथमचि पहा ! या गिरीच्या तळातें,
जें रानाचें वलय दिसतें रुंद याच्या सभोंतें;
त्या 'तार्यानी' म्हणुनि वसतें देशभाषेंत नांव,
लोकीं याच्या परि न दुसरा सांपडे घोर ठाव. ७
होती या उद्गम जवळच्या उंचभागीं जयांचे,
त्या साऱ्याही सलिल जमतें या स्थळीं निर्झरांचें;
त्या योगानें बहु दलदली थोर या घोर रानीं
होती, तापे रविहि वरती लंबरूपी करांनीं. ८

त्यानें येथें विपिन इतकें किर्र माजून जातें
कीं त्यामध्यें स्थळ न गवसे पायही ठेवण्यातें;
कोठें माजे यवस, झुडुपें कंटकांचींहि कोठें,
कोठें जाती सरळ गगनीं वृक्षही मोटमोठे. ९
कोठें होतीं अविरल वनें वेतसांचीं अफाट,
कोठें साधारण गवतही वाढतें उंच दाट;
जागोजागीं पडुनि तरुंचीं जीर्ण पर्णें कुजून,
जातां वाफा विषमय निघूं लागती त्यांमधून. १०
त्यांनीं वातावरण भरतें भोंवतालील साचें
त्यायोगें या स्थळिं न घडतें राहणें मानवांचें;
ऐसें आहे तरिहि, विविध श्वापदें क्रूर चंड
रानीं या निर्भय चहुंकडे हिंडती हीं उदंड. ११
कोठें मत्त द्विरद फिरती थोर यूथें करून
कोठें व्याघ्रप्रवर करिती वास खिंडींमधून,
कोठें कुंजाश्रय करुनियां वन्य गायी रहाती
कोठें वस्ती वरिति तरुच्या कोटरीं ऋक्षजाती १२
यांतें स्वग्रामधुनिहि नसे मानवी शक्ति ठावी,
तेव्हां तीपासुनि मरणभी केविं यांतें असावी?
हें सोडून प्रविततविषोद्गारगंधी अनूप
जातां कांहीं चढुन वरती, या नगाचें स्वरूप १३
पूर्वापेक्षां अधिक दिसतें सौम्य, पाहून ज्यातें
होतें दृष्टीप्रति सुख महानंदही मानसातें!
जातां मार्गीं बघत, लवणांतून दोहींकडे तें
येथें दृष्टी पडति हिरवीं गार विस्तीर्ण शेतें. १४
कोठें त्यांच्यामधुनि दिसती ओघ हे निर्झरांचे,
वाहे शुद्ध स्फटिकसदृश स्वच्छ वारी जयांचें;

कोठें कोठें मधुर दिसती रम्य गांवें तयांच्या,
भोंतीं ताल्या अविरल पहा लागल्या या फुलांच्या १५
चाफा, जाई, गुलतुर गुलाबादिकांतें विकास
होतां त्यांचा मधुर पसरे गंध दाही दिशांस.
कोठें सौगंधिक शतदली पद्मखंडें विकास
कासारांच्या धरिति सलिलीं, त्यांमध्यें राजहंस १६
आनंदानें प्रिय सहचरीयुक्त राहून, शांत
संसाराचीं सकलहि सुखें पूर्ण हे भोगितात.
जे उत्पत्ती धरिति समशीतोष्ण वा उष्णदेशीं
ते एकत्र द्रुम सकळही वाढती या प्रदेशीं. १७
कोठें माळावरि उगवती देवदारू विशाळ,
कोठें ओकद्रुम विलसती उंच कोठें तमाल,
पारंब्याही सुटुनि धरणीमाजि कोठें वडांच्या,
जीं कां त्यापासुनि उगवती अन्य झाडें तयांच्या १८
गुंफा होती निबिड, तरुणादित्यतापार्त ज्यांतें
कस्तूरीचे मृग निपतती प्रत्यहीं आश्रयातें.
ज्यांतें आलिंगिति मधुलता मुग्धशाखाकरांनीं,
ऐसे आम्रद्रुमहि दिसती नम्र भारी फलांनीं. १९
कोठें नानाविध परभृतश्येनकीरादि साचे
पक्षी वृक्षावरुनि वसती जे सुखानें, तयांचे
एके जागीं ध्वनि मिसळतां सर्व होतो विशिष्ट
जो कां नूतनध्वनि मधुर तो हें करी चित्त हृष्ट. २०
जो या स्थानीं सतत घुमतो कंदरांतून वारा
त्या मानून स्तनित, अपुला चित्रवर्णी पिसारा
सारा प्रेमें पसरुनि, गलत्प्रेमनेत्रांबुपूर
वृक्षस्कंधीं रुचिर करिती तांडवातें मयूर. २१

जी या स्थानीं निबिड जमते शीतकाळीं हिमानी
ती ग्रीष्मींच्या द्रुत वितळतां भास्कराच्या करांनीं,
मोठीं मोठीं हरित कुरणें वाढतीं या विभागीं;
त्यांच्यामध्यें चरति पशुंचे संघही जागजागीं. २२
कांहीं जागीं हरिण चरती हे निजेच्छानुसारें;
कोठें वन्यच्छगल इकडे, ग्राम्य कोठें खिलारें,
कोठें दृष्टी पडति बकरीं, आत्मजातुल्य त्यांशीं
शालीसाठीं जतन करिती लोक काश्मीरवासी. २३
जातां हाहि चढून भाग वरतीं, तेथें दिसूं लागती
साऱ्या वस्तु उदास, रुक्ष अवघ्या ओसाड दृष्टीप्रती
भासे हें स्थळ पाहतां, मधुरसा चाखून त्याच्यावरी
खातां तिंतिडिका घडे तशि अतां मच्चित्तवृत्ती वरी! २४
जातां या स्थळिं खालतीं, वरि, पुढें, मागें, चहूंहीकडे,
सारें बर्फ दिसे, तयाविण दुजें कांहीं न दृष्टी पडे;
वर्षांतून सदैव शीत अपुला आवास येथें करी;
तेणें वृद्धि न उद्भिदां घडतसे या शून्य भागावरी. २५
भूर्जांचे तरु जे क्वचित् खुरटले थंडीमुळें राहती,
त्यांवांचून न कोणतेहि दुसरे येथें तरू वाढती;
कस्तूरीमृग, वा मदोद्धत करी, वा हिंसक श्वापदें,
किंवा पक्षिसमूहही न करिती येथें निवासास्पदें. २६
जातां प्राणिनिवासचिन्हहि बघूं कोठें नसे तत्त्वतां
सारा भाग दिसे भयाण, अवघी भासे उदासीनता!
कोठें उंच कड्यांवरून पडतां वेगें नद्या खालतीं
त्यांची पातविशीर्ण तूर्ण शतधा धाराजळें वाहती! २७
तीं वेगें खडकांमधून पुढतीं वाहूं जशीं लागती.
त्यांच्या भीमरवें प्रपूरित दऱ्या साऱ्याहि नादावती;

या येथून विलोकितां दिसति जीं जातां नभोभ्यंतरीं,
स्वर्गारोहणहेतुर्निर्मितमहासोपानमार्गांपरी. २८
एकामागुनि एक उंच शिखरें या अद्रिचीं, त्या शिरीं
शोभे क्षीरविपांडु निर्मळ हिम प्रावारवस्त्रांपरी;
ग्रीष्मींचा प्रखर-प्रतापहि जरी भास्वान् सहस्रां करीं
प्रत्यब्दीं हिम येथलें वितळण्यासाठीं प्रयत्ना करी. २९
सारे व्यर्थ तरीहि; बर्फ न कधीं येथील जातें लया,
ज्यातें थोर निजाश्रया वितरती, कांहीं नसे भी तया;
जीं येथून समीप फार दिसती तीं स्वच्छ नेत्रांप्रती,
त्यांमागील लगेच अंधक जरा कांहीं दिसूं लागती; ३०
त्यांहीहून विशेष अंधक दुजीं त्यामागचीं, यापरी
ओळीनें शिखरें जशीं चढत हीं जाती नभोभ्यंतरीं.
तैसा आदिम वर्ण पालटुनियां नीलत्व त्यां येतसे,
त्यायोगें गगनास आणिक तयां वर्णैकता होतसे ! ३१

पा. व्यं. चिंतामणिपेटकर—गंगावर्णना.

---

## १५. कीचकवध.

मत्स्यदेशाचा विराट या नांवाचा एक राजा झाला अज्ञातवासांत वेष व नांवें बदलून द्रौपदीसह याच्याच आश्रयाला पांडव राहिले होते. विराट-राजाची सुदेष्णा नांवाची राणी होती. तिला कीचक म्हणून एक फार मदांध, दुर्वृत्त पण पराक्रमी असा भाऊ होता. विराट राजानें याला आपल्या सेनेचें आधिपत्य दिलें होतें. या कीचकानें सैरंध्री नांवानें विराटाच्या घरीं असलेल्या द्रौपदीची विटंबना केली. ती सहन न होऊन भीमानें त्याचा वध केला. या प्रसंगीं भीमाचें व कीचकाचें जें भयंकर युद्ध झालें त्याचें वर्णन खालीं दिलेल्या ओंव्यांत आहे.

### ओंव्या.

हस्त धरूनि हासडिला, तंव कीचक झोंबिये मिसळला,
दोघां संग्राम माजला, अत्यद्भुत ते काळीं. १

अंतरें पाहे पांचाळी, तंव दोघे मिसळले केशकवळी,
मुष्टी मारितां वक्षःस्थळीं, धरातळीं थरकंपु. २
घाय घालिती परस्परें, दणाणती दिगंतरें,
महाप्रासादांचीं शिखरें, खचोनि पडती दडदडा. ३
लोक म्हणती 'माहामारी, कोठोनि पातली इये नगरीं!'
कोण्ही न निघती बाहेरी, भयें अंतरीं दडाले. ४
उडोनि हृदयीं मारिली लात, वक्षःस्थळीं मुष्टिघात,
पृष्ठीं ताडितां निघात, दणदणाट माजला. ५
कोपर, हुमाणिया, चपेट, ताडितां अस्थि होती कुट;
कीचक म्हणे 'भरीन घोंट, मित्रावर्णासारखा.' ६
भीम म्हणे, 'नृसिंहें तवकें, असुर विदारिला नखें,
तैसें अंग एकूनएकें, छिन्नभिन्न करूनि टाकीन.' ७
शत्रू नवनागसहस्रबळी, भीमें कवळितां कंठनाळीं,
बळें ताडूनी बाहूबळीं, हस्त उखळोनि टाकिला. ८
भिडती नक्र आणि गजेंद्र, शरभपक्षी आणि मृगेंद्र,
वृत्रासुर आणि देवेंद्र, मूळवैरी झुंजती. ९
महामाया महिषासुर, शंकर आणि अंधकासुर,
हनुमंत आणि अखयाकुमर, अशोकवनीं ज्यापरी. १०
पूर्वीं सुग्रीव आणि वाळी, झुजिन्नले किष्किंधातळीं,
तैसा कीचक आणि भीम बळी, युद्धकंदना मिसळले. ११
भीम म्हणे, 'आंगवणें, दाऊनि शेखीं जासी प्राणें,
जशीं व्याधाप्रती हरणें, शिंगें पुढां झाडिती. १२
मागें सरोनि धांवती पुढें, हृदयीं थडका मारिती गाढे,
एकमेकां इडेपाडे, महापर्वत पै जैसे.' १३
यानंतर भीम जगजेठी, वर्मस्थळीं सहस्र मुष्टी,
बळ ताडितां, भतटीं, मूर्च्छा दाटोनि पडियेला. १४

9325

पुढती उचलोनियां, शिरीं, भोवंडोनि टाकिला पृथ्वीवरी,
सव्य पाय देवोनि उरीं, हस्त दोन्ही उपटिले. १५
अंगुष्ठ रोवोनि नाभिस्थानीं, छेदोनि सांडिले चरण दोन्ही,
शिर पिळोनियां धरणीं, भिन्न करूनि टाकिलें. १६
जैसा किरात शस्त्रघातें, चारी पाद ग्रीवा हातें,
छेदोनियां कूर्मातें, भिन्न करी भक्षावया. १७
तैसें निवडूनि अस्थिजाळ, शीर केलें गोळांगुळ,
सोडले रक्ताचे खळाळ, नदीलोटासारिखे. १८
सुरीं गर्जोनि जयजयकारीं, पुष्पें टाकिलीं भीमावरी,
म्हणती 'मारूनि कौरववैरी, जगीं होय यशस्वी.' १९

मुक्तेश्वर-विराटपर्व.

---

## १६. द्वारकावर्णन.

### श्लोक.

अनर्घ्या रत्नांचे कळस नभचुंबीत असती,
रवीचन्द्रज्वालानलताडितवेष्टीत वसती,
सुवर्णाच्या भिंती सारितपाति दुर्गा गवसणी,
फणाकारा द्वारीं झळकति गृहा रक्तकिरणीं. १
माणिक्यें माणि पुष्पराग मरकें वैडूर्य चिन्तामणी,
गोमेदोत्तम इन्द्रनील जडिलें पेरोज पाटांगणीं;
पाचीप्रस्तर पद्मराग सरळे वज्रप्रभा सांवळी,
कुंजस्तंभ सुमेद मंडप निके रत्नांचिया पोंवळीं. २
सुंदरें मंदिरें दिव्य दामोदरें, वास तेथें किजे नित्य दामोदरें;
लोक संपन्न ते पुत्रदाराधनें, दाससायुज्यता श्रीपदाराधनें. ३
द्वारकेसि उपमा कवणाची? दिव्य साम्य पुरि वैश्रवणाची;
भुक्तिमुक्तिफळ दे अकलंका, या गुणें अतुलसाम्यक लंका. ४

गोमतीनदितटीं सुरवाडें, पुष्पितें उपवनें फुलझाडें;
डोलती सफल तीं पवमानें, विप्र पाठ करिती पवमानें. ५

द्वारीं मंगलमूर्ति भैरव महासिद्धिप्रदाता सदा,
मुद्रा दिक्पति मातृका नवनिधी हंसासना शारदा;
तेजःपुंज सुदर्शनावरि पुरी निर्माण केली महा,
भोंवे चक्र पळांत एकविसदां 'शार्दूलविक्रीड' हा. ६

कृष्णें त्रिंशत योजनें स्थल निकें रत्नाकरा याचिलें,
शेषापासुनि कूर्मचक्र अवघें शोधूनियां पाहिलें,
दीपस्थानक तें बरी रचि पुरी जो विश्वाकर्मा स्वयें.
संख्या सप्तति योजनें नगरिचा आवर्त तो निश्चयें. ७

योजनें स्थल चतुर्दश जेथें, बिंदुमध्य हरिमंदिर तेथें;
अष्टपत्रचतुरस्त्रविहारी, गोपुरें चहु दिशांप्रति चारी. ८

वैकुंठ सालंकृत नित्य जेथें, अशां मुमुक्षां गति एक तेथें;
भक्तां अभक्तां गति भिन्न नाहीं, 'उपेंद्रवज्रा' पठ वृत्त पाहीं. ९

मुमुक्षु, तडितापडी, जटिल, कंदमूलाशनी,
तसे मुनि शिवालयीं बसति आसनें मांडुनी;
उपासक उपासना धरुनि राहिले साधनीं,
अखंड मठमंडपीं वसति मंत्रआराधनी. १०

द्वारका सकलतापहारका, देखिली परमसौख्यकारका,
सप्तमोक्षपुरि त्यांत उन्नता, छंद हा कवि म्हणे 'रथोद्धता' ११

कृष्णकीर्तनकथा परोपरी, नृत्यगीत करिती घरोघरीं,
कल्पवृक्ष लवती फुलीं फळीं, मोक्षदायक पुरी महींतलीं. १२

जरा ना मरी, शोक ना दुःख कांहीं, सदाचार सत्यव्रती लोक पाहीं;
कथा नृत्यगीतादि होती पुराणें, जगामाजिं वर्ते खरें नामनाणें! १३

गृहें गोपुरें चित्रिल्या पट्टशाळा, विराजीत मुक्तामणी रंगमाळा;
प्रदीपावळी सोहळ्याची दिवाळी, असें सौख्य नेणे कदा नाकपाळी १४

वेदान्ती अग्निहोत्री भट गणक महावैद्य गोपाळ मंत्री,
संन्यासी पाणिपात्री जपति हरि मुनी, द्वारका मोक्षदात्री;
सद्विद्याभ्यास रात्रिंदिवस गुरुमुखें साधिती सांख्यशास्त्री
निर्वैरें पुण्यधात्री वसति जन सुखें अर्जिती कृष्णमैत्री. १५
चतुष्पथ पदोपदीं, मणिमनोहरा वेदिका,
समार्जित सुकुंकुमें सरणि वीथिरथ्यादिका;
पवित्र तुलसीवनें सजल कुंभ कुंभावरी,
महोत्सव पुरौकसां, नगरि रम्य पृथ्वीवरी. १६

विठ्ठल—रुक्मिणीस्वयंवर.

---

## १७. अंतरिक्षप्रवास.

रावणाचा वध करून रामचंद्र सीतेसह पुष्पक नांवाच्या विमानांत बसून आकाशमार्गानें लंकेहून अयोध्येला गेला. त्या प्रसंगीं रामानें मार्गांतील कित्येक स्थलें सीतेला दाखवून त्यांचें वर्णन केलें. हा कथाभाग खालीं दिलेल्या पद्यांत आला आहे.

श्लोक.

सांगातें जनकात्मजेस अपुल्या घेओनियां सत्वरीं,
जाई व्योमपथें विमानिं बसुनी श्रीरामनामा हरी;
तैं रत्नाकर पारशून्य सहसा पाहोनियां खालता
एकांतीं दयितेस तो गुणनिधी झाला असें बोलता— १
"हा पाहें मम सेतुनें जलनिधी झाला द्विधा मैथिली,
लाटा या मलयावरी उसळती, तैशाच फेनावली;
तारांचे गण जेथ शोभति शरत्कालीं बहू निर्मळ
त्या छायापथ जेविं भेदि गगना, तैसा दिसे सोज्ज्वळ. २
याचें घेउनि अंबु वृष्टि करिती अंशू रवीचे जनीं,
होती चंद्रमुखी अमोलिक असे पोटांत याच्या मणी;

अंभोभक्षक वाडवाग्निहि जलीं यानेंच गे पोशिला,
लोकानंदन चंद्रमाहि सखये ! यापासुनी जन्मला. ३
मातंगाकृति नक्र या जलनिधीमध्यें उड्या मारिती,
तेणें फेनगिरी फुटोनि तुकडे होओनि नाना रिती;
तेही उंच उडोनि कर्णयुगुला नक्राचिया लागती
पाहातां नयनीं जना क्षणभरी हे चामरें भासती. ४
येती सर्प वरी बिळांमधुनि हे वेलानिला प्यावया,
या लाटाच असा जना ग्रह मुळीं होतो बघूनी ययां,
सूर्याचे किरणव्रजें चमकती जेव्हां फणांचे मणी,
तेव्हां निश्चय होय कीं, पसरले आहेत एथें फणी. ५
आकाशांतिल मेघ सिंधुसलिला प्यायास ओणावला
पाण्याच्या भ्रमणामुळें गरगरां तेथें फिरों लागला;
त्याला पाहुनियां मनांत, वनिते ! येतें असें संप्रती,
कीं हा मंदर शैल या घुसळितो सिंधूप्रती मागुती. ६
शुक्ती भंगुनि सैकतीं विखुरल्या मुक्तावळी शोभती,
जेथें नाराळि पोफळीहि लवल्या भारें फळांच्या अती;
ऐशा सिंधुतटीं विमानगतिनें अत्यल्पकालें पहा,
आलों आपण, इंदुसुंदरमुखी ! आश्चर्य वाटे महा. ७
इंद्रैरावतमस्तकोद्भवमदें आमोद ज्याला असे,
गंगातोयसमागमें अतिशयें शीतत्व जेथें वसे,
तो हा व्योमसमीर आननिं तुझ्या मध्याह्निं उष्णोत्थिता
घर्माच्या कणिकांस शुष्क करितो हे जानकी ! तत्त्वता ८
सीते ! गवाक्षवदनांतुनि बाह्य देशीं, तूं कौतुकें जलदसन्निध हस्त नेशी,
विद्युल्लता तव कराजवळी प्रकाशे, ती वर्तुलाकृति बघूनि मनासि भासे–
कीं तोयद प्रकट हा अपुल्या करानें, घालीं दुजें वलय हस्तिं तुझ्या त्वरेनें ९
विघ्नें सर्व निरस्त देखुनि जनस्थानीं पुन्हां ये मुनी,
पूर्वीं जीं त्यजिलीं निजाश्रमपदें आतां तिथें येउनी;

ज्याची शक्ति जशी तशींच उटजें बांधोनियां ते स्वयें
  आनंदें करिती निवास, दयिते! टाकोनि सारीं भयें. १०
त्वच्छोधाकरितां वनांत फिरतां शोकाचिया निर्भरीं,
  कांते! नूपुर एक म्यां निरखिला दैवें धरित्रीवरी;
तो त्वत्पादवियोगदुःखित जणूं बोलेच ना दुर्बळ,
  ऐसें वृत्त घडे, जिथें जनकजे! तें हेंचि आहे स्थळ! ११
ज्या मार्गें तुजला निशाचरपती नेई अगे संदरी!
  त्या मार्गा वचनेंकरूनि वदण्या शक्ती नसे ज्यां बरी;
वाताकंपित पल्लवांगुलिवशें त्या ह्या लतांनीं मला,
  सीते घोरवनीं दयार्द्रहृदयें पंथा तुझा दाविला. १२
लागेना तव शोध यास्तव बहू मी व्यग्र, हें अंतरीं
  जाणोनी हरिणी तृणां त्यजुनि ह्या तोंडा करोनी वरी;
दृष्टी फेंकुनि दक्षिणेस अपुली त्यांनीं मला सूचना,
  केली कीं, बघ या दिशेसचि असे, बापा, तुझी अंगना! १३
आतां हे अग्रभागीं, हिमकरवदने! माल्यवान् पर्वताचें,
  आकाशस्पर्धि ऐसें शिखर बघ दिसूं लागलें थोर साचें;
जेथें एकेचि काळीं विमल नव जला सोडिलें शीघ्र मेघें,
  तैसें बाष्पोदकातें व्यथित बहुत म्यां होउनी त्वद्वियोगें. १४
जो सीते गंध चाले भिजुनि पथजलें मृत्तिका पल्वलांची,
  वाणी सुस्निग्ध मेघागममुदित अशा तैं मयूरव्रजांची;
नीपांच्या रम्यपुष्पांतिल मृदुल असे तंतु बाहेर येती,
  या गोष्टी याच शृंगीं मज तव विरहें दुःसहा फार होती. १५
रक्तें कंदलिचीं फुलें उमललीं जीं काननीं चांगलीं;
  पर्जन्यें भिजुनी बहु क्षिति तिची ती वाफ ज्यां लागली;
तीं पाहूनि विवाहकालिक तुझीं धूमारुणें लोचनें
  चित्तीं आठवुनी मला श्रम इथें झाले मृगांकानने! १६

त्यांच्या भोंवतिं फार दाट विलसे हें वेतसीचें कुळ,
तैसे सारसपाक्षि देख दिसती दूरून किंचित् चल;
त्या पंपासलिलासि पाहुनि, सखे! ये खालती धांवुनी,
श्रांता होउनि दृष्टि ही मम पिते कीं काय वाटे मनीं. १७
विमानाला घंटा असति लघु या हेमघटिता,
तयांपासोनी हा मधु रव निघे यान करितां;
तयाला ऐकोनी वरि उडति हीं सारसकुलें,
जणूं सामोरें तीं तुज जिवलगे! येति सकलें. १८
जेथें आम्रतरू तुवां घटजलें मोठ्या श्रमें पोशिले,
तोंडें ऊर्ध्व करोनि धांवति जवें जेथें मृगांचीं कुलें;
ती ही पंचवटी अजी बहुदिनीं संप्राप्त झाली असे,
जीतें पाहुनियां मदीय हृदया आनंद गे! होतसे. १९
गोदातीरवनीं करूनि मृगया आल्यावरी सुंदरी!
वेताच्या सदनीं इथें शिर तुझ्या ठेवोनि अंकावरी;
विश्रांत्यर्थ निजें, तईं झुळझुळां वाहोनि वायू भला,
होई सौख्य अपार जें समयिं त्या, तें आठवे गे मला. २०
ज्यानें तो नहुषाख्य भूप पृथिवीमाजी बहू उद्धत,
भ्रूभंगें सहसा महेंद्रपदवीपासोनि केला च्युत;
येतां जो उदयास पंकिल जलें होती अती निर्मळ,
पाहें आश्रम त्या अगस्तिमुनिचा हा भूवरी सोज्ज्वळ. २१
त्याच्या अग्निगृहांतुनी इथवरी हा धूम कीं चालिला,
त्यायोगें दयिते, विमानपथ हा चोहीकडे व्यापिला;
त्याला येइ मनोज्ञ गंध हविचा, त्या हुंगतां म्यां स्वतां
जाओनी रज चित्त होउनि लघू भासे बहू शुद्धता. २२
ही शातकर्णिमुनिची जलकेलिभू कीं, पंचाप्सर प्रथित नाम हिचें विलोकीं;
मेघांमधोनि दिसतें विधुबिंब जैसें, झाडींत अंधुक दिसे स्थळ दूर तैसें. २३

सौधा बांधुनियों जळांत वसतो हा एथ रात्रंदिनीं,
उल्हासें परिसे मृदंगमुख जीं वाद्यें तयांचे ध्वनी;
त्यांचा हा प्रतिशब्द होउनि नभामाजीं, यया पुष्पकीं,
झाला फाराचि संप्रती गलबला, देखे प्रिये जानकि ! २४
चोहींकडे ज्वलन पेटवुनी दुपारीं, माथ्यावरी तपतसे जंव सूर्य भारी;
बैसोनियां मुनि सुतीक्ष्ण म्हणोनि हा कीं, पंचाग्निसाधन करी अबले विलोकीं.
नांवेंचि हा विदित लोकिं सुतीक्ष्ण पाहे, हे जानकि प्रकृतिनें तरि सौम्य आहे;
नांवावरोनि न कधीं करि जे परीक्षा, लक्षांत ठेविं सखये ! मम ही सुशिक्षा २६
हा मौनी म्हणुनी मम प्रणतिला अत्यादरें घ्यावया,
किंचित् मस्तक डोलवोनि करुनी प्रत्युक्तिची सत्क्रिया;
गेलें जैं निघुनी विमान मधुनी व्योमांत एकीकडे,
तेव्हां लावि मुनी पुनश्च अपुल्या दृष्टीस सूर्याकडे. २७
आहे हा शरभंगनाम मुनिचा संशुद्ध गे आश्रम,
जेथें दीनजनांस सौख्य मिळतें अद्यापि सर्वोत्तम,
ज्यानें अध्वरिं फार होम करुनी अग्नीस संतर्पीलें
अंतीं आत्मतनूसही शुचिमनें अग्नीमधें होमिलें. २८
पांथांच्या बहुला श्रमांस हरिती देओनियां सावली,
क्षुद्बाधा हरितात तेंवि विपुलीं जे आपुल्या सत्फलीं;
वृक्षांच्या असल्या गणां अतिथिचा सोंपूनि पूजाविधि,
सत्पुत्रास पिता तसा, त्याजि निजा देहा तपांचा निधि. २९
वाहे निर्मळ आणि सुस्थिर बहू पाणी जयेचें असे,
एथोनी बहु दूर यास्तव लघू तो ओघ जीचा दिसे;
आहे ही तटिनी समीप गिरिच्या मंदाकिनीनामिका,
मोत्यांचा जणुं हार हा पृथिविच्या कंठांत शोभे निका. ३०
एथें हा गिरिच्या शिरीं जिवलगे ! देखें तमालद्रुम,
याचा पल्लव घेतला खुडुनि मीं, ज्या गंध ये उत्तम;

हे वैदेहि ! तई मनोहर असा कानावरी खोंविला,
ईषत्पांडुयवांकुरापरि तुझ्या वक्त्रीं बहू शोभला. ३१
शिक्षेवांचुनि शांत जीव असती जेथें स्वतां सत्तम,
पुष्पांवांचुनि पादपांस नियमें येती फळें उत्तम;
ऐशा चित्तचमत्कृतीस करितो जेथील, सीते ! क्रम,
तो हा साधन सत्तपास, वनिते ! उद्दाम अत्र्याश्रम. ३२
गंगास्नान तशीं पवित्र कुसुमें हीं योग्य पूजाकर्मीं,
हें जाणोनि महासती सुरनदी आणी स्वकीयाश्रमीं;
प्रातःकालिं उठोनियां सुविधिनें स्नानासि संसाधिती,
सप्तर्षी स्वकरीं सुवर्णकमलें तोडोनि आराधिती. ३३
ध्याताती हृदयीं परेशविभुला वीरासनीं बैसुनी,
जैसे शोभति योगि अत्रिमुनिच्या शाखीहि तैसे वनीं;
जे वेद्यासनिं बैसुनी विलसती आरूढ योग्यांपरी,
एकांतीं तनुकंपशून्य अगदीं आहेत हे सुंदरी ! ३४
मुक्तायष्टिच इंद्रनीलमणिंनीं शोभे जशी वेढिली,
किंवा शुभ्र सरोजपंक्ति खचिली इंदीवरांनीं भलीं;
श्वेता हंसतती जशी मिसळतां कादंबकांच्या गणीं,
वा कृष्णागुरुमिश्रपत्ररचना भूची दिसे चांदनी. ३५
छायेमाजि दडोनि राहि तम जें तेणें जशी चंद्रिका,
रात्रीं वेगळि वेगळी दिसतसे ती पाहतां जेविं कां;
किंवा शारदमेघराजि गगनीं तीच्या स्वरंध्रांतुनी,
आकाश स्फुट कृष्णवर्ण दिसतें, जैसें सखे ! लोचनीं. ३६
किंवा शुभ्रविभूतिनें शिवतनू जी कां दिसे पांढरी,
ती ही कृष्णभुजंगभूषणगणीं होते जशी साजरी;
तैसा जन्हुसुताप्रवाह दिसतो गे पांढरा शुभ्र हा,
त्याला हा यमुनौघ कृष्ण मिळुनी वाहे कसा तो पहा ! ३७

पाहें ही नगरी गुहाख्य अमुचा जो मित्र त्याची, प्रिये !
येथें मस्तकभूषणां त्यजुनियां बांधीं जटा मी स्वयें;
तेव्हां तो सुमती सुमन्त्र रडुनी ऐसें मुखें बोलला,
कीं 'गे, केकयकन्यके! आजि तुझा इष्टार्थ आला फला.' ३८
स्रष्टयाचें सर मानसाख्य, सखये! विख्यात पृथ्वीवरी,
जेथें यक्षवधूगण प्रतिदिनीं पानीयकेली करी;
त्यापासोनि निघे पवित्र सरयू नामें नदी ही तशी
अव्यक्तांतुनि बुद्धि जेविं निघते, हें सांगताती ऋषी. ३९
हीच्या उत्तरकोशलेश पुलिनोत्संगीं सुखें खेळले,
तैसें पुष्कळ आणि निर्मळ पय प्राशोनियां पोसले;
या हेतूस्तव वाटतें मम मनीं कीं ही नदी निश्चयें
त्यांची एकचि सर्वही मिळुनियां माता असे हे प्रिये! ४०
मातेच्या परि ही वियुक्ताचि असे मान्यें नृपानें धुनी
मी आलों वनवास भोगुनि असें ती मानसीं जाणुनी
वातें शीत तरंगरूप कर जे त्यांनींच आलिंगिते
जाणो ही मजला, सुधांशुवदने! ऐसें मला भासतें. ४१
संध्या रक्त जशी तशीं अवनिचीं मोठीं उडालीं रजें,
त्यांतें पाहुनि वाटतें मम मनीं कीं संभ्रमें वायुजें
नंदिग्रामिं महोत्सवें कळविला वृत्तांत माझा बरा
ऐकोनी भरत त्वरें मजकडे येण्या निघाला खरा. ४२
मागें ठेवुनि सर्व सैन्य अपुल्या अग्रीं गुरूला करी,
तैसा वृद्ध अमात्यवर्ग अवघा घे जो सवें सुंदरी!
पूजापात्रहि यत्करांत विलसे जो वल्कलें नेसला,
तो पाहे भरत प्रिये! मजकडे पायींच येतो भला." ४३

गणेशशास्त्री लेले–रघुवंशभाषांतर.

## १८. रुक्मिणी आपल्या लग्नाची गोष्ट सांगते.

### गीतिच्छंद.

कौरवयादवभार्या एका जागां मिळोनियां बसती;
हरियश गातां पळविति कोकिळशुकसारिकांस लांब सती. १
श्रीमद्रुक्मिण्यादि प्रभुपत्नीतें अजातरिपुभार्या,
प्रश्न करी प्रेमें जे मित्र ननांदा प्रियासखी आर्या. २
"हे वैदर्भि! स्वमुखें स्वाविवाहोत्सवकथा मला सांगें,
कैसें वरिलें तुजला, श्रीकृष्णें दीनवत्सलें आंगें? ३
प्रथम म्हणे वैदर्भी, 'बाई, होतें लहान मी कन्या,
धन्या कृष्णकथा मज तेव्हांच रुचे, न आवडे अन्या. ४
भगवद्भक्त ब्राह्मण जे येती मत्पित्याचिया गेहा,
जें हारि हरियशोमृत पाजिति तें मात्र चालवी देहा. ५
हरिगुणगायक सज्जन ते धनलोभी नव्हेत, परि हार,
मुद्रा, कंकण द्यावें; न करिति मातापिताहि परिहार. ६
ज्या दिवशीं हरिचरितश्रवण नसे त्यांत मज महा दुखणीं,
दुखणी काय नवखणी माडी नलगे, धरा नखेंदु खणी. ७
श्रीकृष्णाला द्यावी श्रीरामा जानकी तशी दुहिता,
ऐशी गुरुबुद्धींनीं केली बाई! विचारणा सुहिता. ८
कृष्णीं माझें अर्पण चित्त आलेंचि साधुभावांच्या,
कृष्णगुणीं श्रुत्यर्पण ये जेविं मनास सत्स्वभावांच्या. ९
रुक्मी माझा दादा जो आम्हां साजणांमधें मोठा,
खोटा नव्हेचि, परि हरिचरितरसीं तो भिजे न मणिगोटा. १०
त्या स्वगुरुविचारातें निंदुनिया मोहरोगवैद्यातें,
मजला देऊं केलें दादानें हठ धरूनि चैद्यातें. ११
केला लग्नाचाही निश्चय, चैद्यासि धाडिलें मूळ,
गूळ क्ष्वेडचि वाटे मज, तातविचार होय पांगूळ. १२

न चले कांहीं तेथें जननीचें बंधुचें स्वताताचें !
हाेय लवांत दहादां फळ इष्ट अनिष्ट आत्मघाताचें. १३
एक ब्राह्मण केवळ साधु दयामूर्ति तत्पदीं नमनें,
केलीं पाय धरुनि म्यां, एकांतीं विनविला सुदीनमनें. १४
कां तो द्रवता माझा असतां जरि भाव पाहिला खोटा,
जेणें अभयवर दिला त्या गुरुहस्तांत म्यांहि लाखोटा. १५
स्वकरें वसंततिलकावृत्तें पत्रांत सात मोजूनी,
लिहिलीं होतीं तींही लिहितां लिहितां क्षणांत योजोनी. १६
काय लिहावें म्यां सखि ! ज्याचे संपूर्ण वेद निश्वास,
विश्वास ज्ञानप्रद, परि माझा हरिपदींच विश्वास. १७
गेला धावत घेउनि मत्पत्र द्वारकेस सद्विप्र,
त्या प्रणतवत्सलाला आणाया आण घालुनि क्षिप्र. १८
तों आला शाल्व मगधपतिसख, तो चैद्य; मांडलें लग्न,
झालें पुर तद्बळजळानिर्घोत, आधींत मन्मनहि मग्न. १९
तांतडि बहु दादाची; कैंचा अवकाश ? लागली हळद,
खळदर्पघ्न दिसेना जो नतचातकदयासुधाजळद. २०
गरळ विलेपन वाटे लाविति अंगास जी हरिद्रा तें,
सखि ! सुकृपणकृत शुष्कोपचरण निववील कसें दारिद्रातें ? २१
शतदा ध्वजाचि झाल्यें प्रासादशिरीं ? पुरेक्षणच्छद्में,
द्वारवतीपथ पाहति नयनें हरिदिङ्मुखा जशीं पद्में. २२
आली रात्रि सुगात्रि द्रौपदि ! अवकाश तीच लग्नासी,
झाली यष्टी कष्टी जें मन त्या आधिभारभग्नासी २३
चिंताज्वरांत रात्रौ माझा नाहींच लागला डोळा,
जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा. २४
लावियला म्यां दुःखीं बाई ! त्या ईश्वरासही बोल,
यत्पदपद्मरजाचें चिंतामणिकोटिही नव्हे मोल. २५

तों 'प्रियकंठीं आपण पडोन हेही सुखांत पाडावी,'
या भावेंचि स्फुरली, कारे माझी भुजलता कृपा डावी. २६
नेत्रभुजोरुस्फुरणें चिंतेची सोडिली मनें बाज,
माज प्राणांनींही, गेल्या धैर्येंहि यावया लाज. २७
तोंचि समूळाधिज्वरहरमात्रा आणुनी उषःकाळीं,
आला द्विज धन्वंतरि, सदय पिताही तसा नसे बाळीं. २८
आधीं विप्रमुखश्री कळवी येतांचि माधवागमन,
मग मुनि सांगत, मज तो ऊठ म्हणे, 'गुरुपदास लाग' मन २९
विप्रें कथिलें मज कीं, 'वत्से! लिहिलेसि उत्तम श्लोक,
ज्यांच्या अर्थश्रवणें आला धांवोनि उत्तमश्लोक.' ३०
कृष्णागमनानंदें हृदयांतुनि ज्यां बळेंचि घालविलें,
वैद्यादिमनें द्याया स्थळ त्या चिंतादिकांसि पालविलें. ३१
अंबेच्या नमनाला न्यावी जीचा विवाह नवरी ती,
धरि हरिशंका दादा, देवीयात्रा कलीं, न नव रीति. ३२
मग बाई! दादाचे मागधशल्यादिकाहि मेल्यांचे
सैनिक मज रक्षाया आले धाकें विरोनि गेल्यांचे. ३३
स्वसखी धात्री जननी विप्रस्त्री मंडळी न, ती पेटी!
तींत मणी मीं, नेलें शुभविधिनें श्रीशिवेचिये भेटी. ३४
पूजुनि पाय निवविली, 'कन्यांतें प्रसवितात ज्या माता,
त्या लटक्या, तूंचि खरी, तुज कृष्णाचि योग्य होय जामाता.' ३५
पत्रीं लिहिलें होतें, 'देवीयात्रेंत मज पदें दावा,
दावा बहुतांसीं, हा भाव कळों दुर्जनांसि नेदावा.' ३६
तों आला हरि, सुंदरि! जोडा नाहींच त्या महा, भागा
आपलिया घ्याया, ते कोले वारिति कसे महाभागा! ३७
हरि रवि, मी नलिनी; स्त्री कैरविणी, वीर वायसाराती;
आनंदाची वेळा सांगों तुज साध्वि! काय सारा ती! ३८

माझा मूर्त मनोरथ तो रथ आला प्रियास घेऊन,
दर्शन नयनें घेती, जैसें शिशिरीं दरिद्र घे ऊन. ३९
तों आलि म्हणे मज, 'सखि ! सुमनोमाळा वरा वहा यास,
हा या समयीं विधि; मग नित्य असेचि प्रिया पहायास.' ४०
माळा ऊचलितां प्रिय आपणहि रथावरूनियां लवला;
लव लागेना तों घे अंकीं, करुणासमुद्र कालवला. ४१
हंसें मुक्ता नेली, मग केला कलकलाट काकांनीं,
हाकांनीं नभ भरलें जाय सुरांच्याहि नाद हा कानीं. ४२
श्वगणांतूनि जसा हरि निजभागा हरि, तसाचि अतिधीर
अबळ खळांतूनि प्रभु मजला घेऊनि जाय यदुवीर." ४३

मोरोपंत—बृहद्दशम.

---

## १९. वर्षाकाल.

ओंव्या.

यावरी पातला वर्षाकाळ, पंचमऋतु झाला प्रबळ,
सुटला पश्चिमेचा अनिळ, मेघमाला मोकली. १
पृथ्वीमंडळींचा जळराशी, पारधी पातला आकाशीं,
पिटीत मृगांचे पाठीशीं, सैरा गगनीं धावत. २
इंद्रचाप धरूनी मुष्टी, रोहिणीमृगांचिया पाठीं,
मेघ धाराजीवनवृष्टी, करीत वेगें पातला. ३
सूर्यकिरणमृगसमुदाय, निस्तेज होउनी पावले भय,
लपावया शोधीत ठाय, अभ्रें आड करूनियां. ४
कीं पृथ्वीखंड त्या शाळुंका, अनेक पर्वत शिवपिंडिका,
इंद्रें मांडिलें अभिषेका, गगनपात्रीं बहुधारा. ५
मयूर, चातक, कपोतक, दर्दुर करिती महाघोख,
'मेघ जगाचा पाळक,' सर्वलोकीं जाणविती. ६

विद्युल्लतांचे कडकडाट, घनगर्जना गडगडाट,
गंगादि सरितांचे संघाट, महापूर माजले. ७
अठरा भार वनस्पती, अंकुरवसनें वेढिली जगती,
फळ शाका धान्य संपत्ती, पृथ्वी पिके जगातें. ८
विष्णु जगाचा प्रतिपाळिता, तोचि मेघ होय तत्त्वता,
प्रमाण करुनी चंद्रसविता, आप वोपी अयनांशें. ९

मुक्तेश्वर–वनपर्व.

---

## २०. श्रीरामराज्याभिषेक.

रावणाचा वध केल्यानंतर श्रीराम, जानकी व लक्ष्मण यांसह, पुष्पकविमानांत बसून अयोध्या नगरीला आला. त्या वेळचें अयोध्याप्रवेशाचें व रामराज्याभिषेकाचें हें वर्णन आहे.

### श्लोक.

जवळिं अनुज सीता राम बैसे विमानीं
कपिपतिसह ज्यातें बंधुतें जेंवि मानी,
दशमुखअनुजा दे उत्तमश्लोक लंका
पवनजसह यानीं घे तया निष्कलंका. १
प्रभु करि चिरजीवी शत्रुच्या सोदराशी,
रविशशि गगनीं तों राज्य दे मोदराशी.
रघुपति परते, हो! तैं सुरां सौख्य वाटे,
स्तविति कुसुमवर्षे त्या विमानांत वाटे. २
गोमूत्रपक्क जव भक्षुनि वाट पाहे,
येणें तदर्थ भरतावरि हो! कृपा हे.
कीं स्थंडिलावरि निजे, क्षण कल्प कंठी,
जो प्राण ठेवुनि असे बसला स्वकंठीं. ३

श्रवणिं भरत ऐके 'राम आला अयोध्ये,'
अभिमुख विभुतें ये, येति आमात्य योध्ये.
पुरजनगुरु संगें, पादुका मस्तकांतीं,
कारिति रविशशींच्या ज्या अहो! ध्वस्त कांती. ४
वसे नंदिग्रामीं, परि हृदय रामीं, भरत तो,
विना त्याचे पाय त्रिभुवनिं न जो लाभिं रततो,
वसे वेदाध्यायीं, धरि इतर ठायीं न मन तो,
करी वाद्यांगीतांसहित पदपद्मा नमन तो. ५
कनकमय पताका, वृंद चित्रध्वजांचे,
रथ चपळ तुरंगीं स्वर्णसन्नाह ज्यांचे,
कवचसहित योद्धे, मुख्य मुख्य प्रजांचे
प्रभु अभिमुख येती, दास पादांबुजांचे. ६
चिह्नें महाविभवराजविलासमुद्रा, आणी पुढें भरत त्या करुणासमुद्रा,
प्रेमें पदावरि पडे विसरूनि देहा, आलिंगनें प्रभु, भुजा पसरोनि, दे हा. ७
प्रथम शिरिंहुनी त्या पादुका पादपद्मा—
जवळि भरत ठेवी, ज्या पदीं नित्य पद्मा,
मग चरणिं पडे, त्या क्षेम दे सुस्वभावा,
प्रभु नयनजळीं सप्रेम न्हाणी स्व भावा. ८
ब्राह्मणांस करि वंदन पादीं, 'हें मला प्रिय.' असें उपपादी.
लक्ष्मणक्षितिसुतेसह पायीं, लोक वंदिति जयास उपायीं. ९
कोसलाधिपति कोसललोकीं, देखिला बहु दिसां अवलोकीं,
नृत्य वस्त्र उडवूनि करीती, पुष्पवृष्टि वरि कौतुकरीती. १०
धरी भरत पादुका, व्यजनचामरें वीजती,
बिभीषणकपींद्र, जे निजसुखें तयाच्या जिती;
मरुत्सुत धरी सुधाकरसितातपत्रा कुती,
प्रवेश करि राघव स्वनगरीं पवित्राकृती. ११

धरुनि सधनु भ्राते दास्य शत्रुघ्न मानी,
धरि करिं जळझारी रामकांता विमानीं,
धरियलिं असिचर्मे अंगदें ऋक्षपाळें,
विभव नगरलोकां दाविलें हें कृपाळें. १२

रघुपति अति शोभे पुष्पकीं व्योमवाटे,
द्विजगुरुसह नेत्रांउत्पलीं सोम वाटे,
नटति युवति, गाती कीर्ति बंदी विमानीं,
प्रियतम जन आत्मा आपुला जेंवि मानी. १३

रचित कुसुमरत्नें श्रीअयोध्यापुरीतें,
जन अमृतरसाच्या वाहती त्या पुरीं ते;
नृपगृहिं गुरुपत्न्या, माउल्या, त्यांस भावें
नमन करि, तयीं त्या तोषल्या बंधुभावें. १४

वंदिलें अवधिया वडिलां, हो! धाकुट्या स्वपदवंदनलाहो.
रामलक्ष्मणधरातनयांहीं, घेतलें पुजुनि पूजन यांहीं. १५

असे नंदिग्रामीं, जननिहि विनाराम नयनीं
न पाहे, शत्रुघ्नासह भरत जी भूमिशयनीं,
म्हणोनी चौघांही भिजविति तिघी एकसमयीं
तनुप्राणन्यायें नयनजळिं मोयारसमयीं. १६

मग उकलि जटांतें राम कोदंडपाणी
कुळगुरु जयिं न्हाणी, घे चतुःसिंधुपाणी,
त्रिदशगुरु सुरेंद्रा, ये रिती रामचंद्रा
द्विज वडिलहि देती मान वंशाब्धिचंद्रा. १७

सुस्नात होउनि असा करुणांबुराशी अंगीकरी मग विभूषणअंबरांशीं.
प्रार्थूनि दे भरत वंदुनि आसनातें, घे तो पदप्रद सुरां कमळासनातें. १८

स्ववर्णाश्रमधर्मवाटे लावी, जया बापचि राम वाटे,
प्रजा गमे संतति त्या पित्याला, स्पर्शो न दे दुःख कदापि त्याला १९

९३२६ ५१

त्रेतायुगीं कृतयुगापरि काळ जाला, देखूनि राज्य कारितां रघुवंशजाला.
धर्मज्ञ राम सुख दे सकळां प्रजांला, प्रेमें प्रजा भजति त्या भरताग्रजाला. २०

वनें, नद्या, पर्वत, सर्व खंडें, द्वीपांसमुद्रासहितें अखंडें,
हीं कामधेनू सकळां प्रजांला, देखूनि होती भरताग्रजाला. २१

बहु भिति यमलोक श्रीवरा रामराया
जन मरण न पावे, जो न बैसे मराया;
वळखति न जराधिव्याधिशोकादिकां या,
श्रमभयअसुखातें नेणती लोककाया. २२

रघुपती निज एकवधूव्रता, शिकवि हो! जनाचित्तमधुव्रता,
स्फुट करी गृहकर्म समस्त कीं, धरुत लोक कथारस मस्तकीं. २३

कारि जनककुमारी नित्य निर्व्याज सेवा,
तुम्हिहि जन मनीं हो! तो महाराज सेवा;
सगुण सहज सीता भाव जाणे पतीचे
मन हारिति पतीचें प्रेमसंलाप तीचे. २४

वामनपंडित–भागवतरामायण.

---

## २१. हंस नलाकडून दमयंतीकडे जातो.

नलराजानें सोडून दिलेला हंस नलगुणवर्णन करण्याकरितां दमयंतीला कुंडिननगरीं जाऊन भेटला, तें येथें वर्णिलें आहे.

श्लोक.

खग मग नगरीचे गोपुरीं झेंप घाली,
मृदु पवनगवाक्षीं बैसतां झोंप आली;
तदुपरि जवशाली वेंघला चंद्रशाला,
निरखि विततशाला राजधानी विशाला. १

तेणें तसें नगर तें धरितां निडारीं, तेथें विलासवन एक दिसे पुढारीं;
जेथें सुशीतळ महीतळ सांद्र साई, जाई जुई फुलमयी बहु आंबराई. २
तो मंडळाकृति फिरे उतरावयाला, भैमीमुखेंदुपरिवेष म्हणों तयाला;
तेथें महीवरि असा खग बैसताहे, कीं सुंदरी निजकुतूहल जेंवि पाहे. ३
जो बैसतां चपळपक्षपुटीं धरेला, हाणीतसे, फडफडां ध्वनि हो उदेला;
पाहे तया खगवरासि वरांगना हे, मानीं मनीं नवलही, मग बोलताहे.४

'असा पक्षी लक्षीं बहुविहगलक्षीं न मिळता
सुवर्णी जो वर्णीं, वद कवण वर्णी कवायिता ?
अगाई ! हा बाई ! त्वरित वरि जाईल पळुनी !
धरूं जातें हातें हळुहळु तयातें न कळुनी.' ५

ऐसें वदे मग तयास धरावया हे
तैं होय हंसगमना पहिलीच आहे.
वाजेच ना वलय नूपुरनाद नोहे
तो तद्गतीस निरखूनि कसा न मोहे ! ६

हे मंदमंदपद सुंदर कुंददंती, चाले जसा मदधुरंधर इंद्रदंती,
हंसा धरूं जवळि जाय कृशोदरी ते, निष्कंप कंकणकरासि पुढें करीते.७
गवसलाच असा खग भासला, तंव तदीय सखीजन हांसला;
मग सवेंच बुझावुनि हांकिला, उडविलाचि पिटाळुन लाविला. ८
कांहीं उडोन गगनीं मग नीट येतो, नाहींच दूर न समीप बसे तसा तो;
पाहे सुधाकरमुखी कलहंसराया, लाहे मनोरथ तयास पुन्हां धराया. ९

'हंस धरीन म्हणोनि मनोरथ हा मज, होय विनोद तुम्हांला !
हा कलहंस पिटाळवितांहि, पुन्हां उडवाल तया विहगाला !
जा परत्याच ! तुम्ही नलगेचि,' असें वदुनी नृपराजसुता ते
राहविला सखिचा जन, आपण मात्र तयास धरूं मग जाते. १०

रागेजली अरुणकांति विराजवीते, ही एकली सुतनु चंद्रकला तशी ते;
गोळी हळूच कलहंस समीप केला, कांहीं पुढें फडकला अवलोकिलेला.११

आणीकही पद न वाजत मंद चाले, जो चालतां पदर सांवरिला न हाले;
हेंही करी निजकरीं खग सांपडेसा, तोही हळूहळुच होय पलीकडेसा. १२
मदगजगमनेनें मागुती चाल केली, वि नततनुलता हे तत्समीपास गेली;
पुनरपि फडके तो फारसा दूर नाहीं, जव ळि जवळि ऐसा भासला हंस कांहीं.
हंसें तदा चतुरसंमत युक्ति केली, ते चालवीत सुतनू बहु दूर नेली;
छाया तियेसि दुसरी तिसरी वनाळी, जे सांवळी युवतितुल्य दिसे निराळी.

रघुनाथपंडित-नलोपाख्यान.

---

## २२. प्रपंचांतील वागणूक.

ओंव्या.

आळस उदास नागवणा, आळस प्रयत्न बुडवणा,
आळसें करंटपणाच्या खुणा, प्रकट होती. १
म्हणोनि आळस नसावा, तरीच पाविजे वैभवा,
अत्रीं परत्रीं जीवा, समाधान. २
प्रातःकाळीं उठावें, कांहीं पाठांतर करावें,
यथानुशक्ति आठवावें, सर्वोत्तमासी. ३
कांहीं फलाहार घ्यावा, मग संसारधंदा करावा,
सुशब्दें राजी राखावा, सकळ लोक. ४
ज्याचा जो व्यापार, तेथें असावें खबरदार,
दुश्चितपणें तरी पोर, ओढा लावी. ५
या कारणें सावधान, एकाग्र असावें मन,
तरी मग जेवितां भोजन, गोड वाटे. ६
ऐका सदैवपणाचें लक्षण, रिकामा जाऊं नेदी क्षण,
प्रपंचव्यवसायाचें ज्ञान, बरें पाहे. ७
समाधानें समाधान वाढे, मैत्रीनें मैत्री जडे;
सोडितां क्षणमात्रें मोडे, बरेंपण. ८

तनें मनें झिजावें, तेणें भलें म्हणवोनि घ्यावें,
उगेंचि कल्पितां शिणावें, वाउगें जनीं. ९
म्हणोनि दुसऱ्यास सुखी करावें, तेणें आपणं सुखी व्हावें,
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें, लागेल स्वयें. १०
बहुतांचे मुखीं उरावें, बहुतांचे अंतरीं भरावें,
उत्तमगुणीं विवरावें, प्राणिमात्रांसी. ११
शहाणे करावे जन. पतित करावे पावन.
सृष्टीमध्यें भगवद्भजन, वाढवावें. १२
ओळखीनें ओळखी साधावी, बुद्धीनें बुद्धी बोधावी;
नित्य न्यायें वाट रोधावी, पाखंडियाची. १३
उदंडांचें उदंड ऐकावें, परी तें प्रत्ययें पहावें,
खरें खोटें निवडावें, अंतर्यामीं. १४
धक्के चपेटे सोसावे, नीच शब्द सोशीत जावे,
पस्तावोनि परावे, आपुले होती. १५
प्रसंग जाणोनि बोलावें, जाणपण कांहींच न घ्यावें;
लीनता धरूनि जावें, जेथें तेथें. १६
आधीं कष्टाचें दुःख सोशिती, ते सुखाचें फळ भोगिती,
आधीं आळसें सुखावती, त्यांसि पुढें दुःख. १७
उपाधीस जो कंटाळला, तो भाग्यापासोनि चेवला,
समयीं धीर सांडिला, तोही खोटा. १८

रामदास—दासबोध.

---

## २३. वैराग्यपर अभंग.

संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ, नाहीं तळमळ दुःख लेश. १
तेथें मी राहीन होऊनी याचक, घालितील भीक तेचि मज. २
संतांचिये गांवीं वरो भांडवल, अवघा विश्वंभर धन वित्त. ३

संतांचें भोजन अमृताचें पान, करिती कीर्तन सर्व काळ. ४
संतांचा उदीम उपदेशाची पेठ, प्रेमसुखपाठ घेती देती. ५
तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी, म्हणोनि भिकारी झालों त्यांचा. ६

कन्या सासुऱ्याशी जाये, मागें परतोनी पाहे. १
तैसें झालें माझ्या जिवा, केव्हां भेट देसी देवा ! २
चुकलीया माये, बाळ हुरुहुरु पाहे. ३
जीवनावेगळी मासोळी, तैसा तुका तळमळी. ४

*आशा हे समूळ खणोनी काढावी, तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें.* १
नाहीं तरी सुखें असावें संसारीं, फजीती दूसरी करूं नये. २
आशा मारूनीया जयवंत व्हावें, तेव्हांचि निघावें सर्वांतोनी. ३
तुका म्हणे जरी योगाची तातडी, आशेची बिंबुडी करी आधीं. ४

कईं वाहावें जीवन, कईं पलंगीं शयन. १
जैसी जैसी वेळ पडे, तैसें तैसें होणें घडे. २
कईं भोज्य नानापरी, कईं कोरड्या भाकरी. ३
कईं बैसावें वाहनीं, कईं पाईं अनवाणी. ४
कईं उत्तम प्रावर्णे, कईं वसनें तींही जीर्णें. ५
कईं सकळ संपत्ती, कईं भोगणें विपत्ती. ६
कईं सज्जनासी संग, कईं दुर्जनासी योग. ७
तुका म्हणे जाण, सुख दुःख तें समान. ८

जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी, मृत्यूचिये भेटी जवळी आली. १
आतां माझ्या मना होईं सावधान, हे पुण्याची जाण कार्यसिद्धी. २
शेवटील घडी बुडतां नलगे वेळ, साधावा तो काळ जवळीं आला. ३
तुका म्हणे चिंतीं कुळींची देवता, वारावा भोंवता शब्द मिथ्या. ४

जिव्हा जाणे फिके मधुर कीं क्षार, येर मांस पर हाता न कळे. १
देखावें नेत्रीं बोलावें मुखें, चित्ता सुखदुःखें कळों येती. २
परिमलासि घ्राण ऐकती श्रवण, एकाचें कारण एका नव्हे. ३

एक देहीं भिन्न ठेवियेल्या कळा, नाचवी पुतळा सूत्रधारी. ४
तुका म्हणे ऐसी जयाची ते सत्ता, कां तया अनंता विसरलेती. ५

तुकाराम–गाथा.

---

## २४. उज्जयिनी.

### श्लोक.

पुरी पूर्वी गर्वें निरुपम निजैश्वर्य मिरवी,
जिला वर्णूं जातां थकति सुकृती संस्कृत कवी;
तिच्या स्थानीं आतां पसरत असे निर्जन वन,
वघोनी हें झालें मम समयिं या दुःखित मन. १

कोठें ते कांचनाचे कळस चमकती उंच देवालयाचे?
हर्म्यें प्रासाद कोठें असति? विलसलें थोर ऐश्वर्य ज्यांचें?
कोठें त्या नाट्यशाला दिसति न नयना चंद्रशाला विशाला!
रत्नांनीं पूर्ण गेले विपणितळ जणों अब्धिचे ते लयाला! २

प्रातःकाळीं नगरवनिता कुंकुमाच्या सड्यांनीं
रांगोळ्यांनीं अधिकच जयां देति शोभा झटोनी;
नाना यानीं वसुन गमना पौर जेथें करीत,
नाना वेषीं फुलतिच, कुठें जाति ते राजपंथ? ३

जेथें नाचति मोर, मंजुळ रवें गातात जेथें पिक,
वापींच्या तटिं खेळती सुखभरें चक्रांगहंसादिक,
पुष्पांनीं लवल्या लता तरुवरां जेथें मिठी घालिती,
उद्यानें दिसती न तीं वसति जीं क्षिप्रानदीच्या तटीं. ४

विद्याधर्मसुकर्मतत्पर असे होते इथें ब्राह्मण,
तैसे क्षत्रिय शूर मानधन ते, ज्यां जीव वाटे तृण!
अर्थोत्पादक वैश्य, शूद्र खपले सेवावया भूमिला,
कोठें उज्जयिनीमधील जन ते गेले कळेना मला! ५

जीस विक्रम पराक्रमी गुणी, तोषवी झटुन नित्य रक्षुनी,
राजभक्तिवश धन्य लोक ते, होति या नगरिं पूर्विं नांदते. ६
लोकीं पावसि तूंचि विक्रमनृपा धन्यत्व या जन्मुनी,
काव्याभिज्ञजनांत तूंच पहिला, दात्यांमध्यें अग्रणी;
बाणीकंठमणी कवीश्वर गुणी शाकुंतलाचा पिता
होता आश्रय पूर्ण पावत तुझा! विद्वत्सभासंमता! ७
शृंगारवीरकरुणारसपूर्ण काव्यें, जीं कालिदास तुज ऐकवि नित्य नव्यें;
गंभीर सुस्वर रसाळ अशी सुवाणी, त्याची नृपा! परिसली असशील कानीं. ८
सांगाया निज वल्लभेस वदला तो यक्ष जें जें घना,
सीतेचा पतिला निरोप, रतिचा तो शोक भेदी मना;
ज्यातें ही कविच्या मुखेंच कविता ऐकावया सांपडे,
त्याचें भाग्य विशेष, दुर्लभ जगीं तो लाभ त्यातें घडे! ९
ज्यांनीं गर्वभरें शिरें उचलिलीं आकाश भेदावया,
जाती पर्वत उंच थोरहि असे ज्याच्या प्रभावें लया;
किंवा घोर अपार सागरजळें ज्यानें बळें शोषिलीं,
तो हा धन्य अचिंत्य कालमहिमा स्वच्छंदचारी बळी. १०
महाकाल रक्षावया सिद्ध नित्य, अवंतीस हे बोलती लोक सत्य,
कसा काल नाशावया तीस पाहे? अहो थोर आश्चर्य हें वाटताहे! ११
कविवर चिर गाती किर्ति ज्याची अमूप,
त्यजुनि भुवन गेला विक्रमादित्य भूप;
कवण रसिक भोक्ता आपणां होय आतां,
म्हणुनि सुकविताही पावली स्वर्गपंथा! १२
श्रीविक्रमानुज नृपाल उदार शुद्ध, राज्यें प्रजा सुखवि भर्तृहरि प्रसिद्ध.
तो आपल्या प्रियपुरास विनाशकाल, येणार जाणुनि असें वदला असेलः—
"ती रम्या नगरी, महा नृपति तो सामंतचक्रावृत,
त्याची राजसभा विशाल, जवळीं चंद्रानना त्या स्थित;

शौर्यें गर्वित राजपुत्रगण तो, ते भाट, तीं भाषणें,
ज्या काळें सगळें लया दवडिलें माझों तया वंदनें." १४

गेली उज्जयिनी! तिच्या धरितसे नांवास जे लोकिं या,
आहे सांप्रत उज्जनी नगर तें राज्यांत शिंद्याचिया;
आहे नांव परंतु वैभव दिसे कोठें न हो त्यापरी,
नामैक्यें समता चुन्यास अमृता येईल कैसी तरी? १५

वा. शा. खरे.—काव्यरत्नावलि.

---

## २५. सत्यभामचा रुसवा.

नारदमुनीनें एकदां कृष्णाला पारिजातपुष्प दिलें. तें त्यानें रुक्मिणीला दिलें. ही गोष्ट सत्यभामेला कळतांच ती रुसून बसली. तेव्हां कृष्णानें तिची समजूत केली. ही विनोदपर कथा या उताऱ्यांत आहे.

### श्लोक.

कृष्णासि कृष्णपदभक्तिविशारदानें, जें स्वर्गपुष्प दिधलें मुनिनारदानें,
तें रुक्मिणीप्रति दिलें त्रिजगन्निवासें, जें द्वारका करि भरोनि सुगंधि वासें.
अशी गोष्ट दासीजनीं बायकांनीं, विचारूनियां सांगतां जाय कानीं;
तईं सत्यभामा महाक्रोध दावी, बुझावी हरी, तेचि लीला वदावी. २

गडबडां धरणीवरि लोळते, वदवती न कवीसहि लोळ ते;
रडत मूर्च्छित होय घडी घडी, पवननिश्चळ नेत्र न ऊघडी. ३

रडत रडत मूर्च्छेमाजि वृत्ती बुडाल्या,
परम विकल, मी तूं या स्मृतीही उडाल्या;
उचलुनि सखियांहीं मंचकीं दिव्यसेजे
निजाविलि मृततुल्या सत्यभामा दिसे जे. ४

ये अशांत सदनांत हरी तो, जो अनादि भवशोक हरीतो;
किंकरी नमुनियां चरणातें, सांगती सकळ आचरणातें. ५

म्हणे शोक कां प्राप्त झाला महा हा, अशी कष्टली कां शुभांगी अहाहा !
न बोलेचि कां आमुशीं आज राणी, जिच्या बोलण्याचीच आम्हां शिराणी. ६
जयीं श्रीवत्सांकप्रभु करि निजांकास्थित शिरा,
शिरा, नाडी, प्राण प्रकटवि न लावूनि उशिरा;
शिराणी शब्दाची पुरवि, तरि डोळे न उघडी;
घडी जों मानाची विघडलि असे तोंवरि घडी. ७
वदे भामा कोपें अतिविकल चावूनि अधरा,
"धरापृष्ठीं नाहीं ठक तुजअसा, अंबुजधरा !
धरावें या अंकीं शिर अजि तिचें पक्षिगमना,
मना आलें देणें कुसुम जिस तें, कंसदमना !" ८
जों नेत्र मोडुनि वदे, ढकलूनि मांडी, भ्रूमंडळी भ्रमण, अंगुलिभंग मांडी,
तों कृष्णजी करुनि हास्य म्हणे, अहाहा! वेडे, अनर्थ इतुक्यास्तव कां महा हा
अर्पितां मुनिवरें सुमनातें, वाटलें प्रथम हेंचि मनातें,
कीं, असा तरु पुरींत असावा, त्यांतही स्वसदनींच वसावा.
फूल देउनि तिला उतराई, होइं मी, समज हे चतुराई;
देतसें तरुचि तो तुजला गे ! खेद हा न करणें तुज लागे. १०
तुतें वृक्ष देणेंचि, यालागिं आधीं, फुलें नाशिला जो तिला होय आधी;
न जाणोनि केले तुवां कष्ट भारी," समाधान ऐसें करी कैटभारी. ११

वामनपंडित—भामाविलास.

---

## ३६. गृहिणीविरह.

एका रसिक पंडितानें आपल्या पत्नीचा वियोग झाला असतां विलाप केला तो खालीं दिला आहे.

श्लोक.

अहा ! कैसा झाला अवचित विधी निष्ठुर असा
प्रिया एकाएकीं अमरसदना गेलि सरसा !

मना ! आतां कोणा कथिशिल जिवींच्या हितगुजा?
सुखाच्या शब्दांनीं कवण निववी तापहि तुझा? १
घरातें मी येतां दचकुनि उठोनी हंसुनियां,
विशालां नेत्रांहीं अमृतरसवृष्टी करुनियां,
न कां चित्ता ! आजी मधुरवचनीं हर्ष करिशी?
असे झाली माझ्या अगळिक करें कोणाति अशी? २
बुजालें दुःखानें स्मरण विषयांचें अवधिया,
अनभ्यासें गेली मज सकल विद्या त्यजुनियां;
जिचे डोळे काळे बघुनि मृगबाळेंहि झुरती,
वसे चित्तीं देवीपरि सतत ती मात्र सुदती ! ३
पडायाच्या भीतीस्तव मम करातें धरुनियां,
विवाहीं पाषाणीं चढलिस, सखे ! तूं जपुनियां,
कशी ती तूं आजी चढशि मज सोडोनि गगनीं,
करी ऐशी शंका हृदय शतधा येउनि मनीं. ४
तुझें जाणें प्राणेश्वरि ! परिसुनि स्वर्गभुवनीं,
अलापांतें शंका त्यजुनि करिती कोकिल वनीं,
निमाली चिंताही सकल कमलांची अजि अहा !
कशी आतां चंद्रा अतुल सुषमा लाधलि, पहा ! ५
सखे, विद्युल्लेखास्फुरणचपलां देउनि मला,
सुरेंद्राच्या कांहीं दिवस उपभोगांस अतुलां,
अहा ! मंत्रभ्रष्टक्षितिपतिस लक्ष्मी त्यजि जशी
लया पुण्यें जातां त्यजुनि तशि गेलीस मजशी ! ६
असोनी ज्या भूमीवर चढविलें त्वां सुरपदीं
'प्रिया, नाथा,' ऐशा अतिमधुर संबोधनपदीं;
तया मातें कैशी धरणितलधूळींत, सखये !
दिवस्था होऊनी ढकलिशि ! दया कां तुज न ये ? ७

गुणांनीं जी पूर्णा, अणुसम नसे दोषहि जिला,
अलंकारीं साजे, रस वसतसे जींत पहिला,
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां,
वसे ती पद्माक्षी मम हृदयिं जेवीं सुकविता. ८
सुधातुल्यें हास्यें करुनि अभिषेकास मजला,
कटाक्षांनीं वर्षे जणुं मजवरी नीलकमलां!
मृगाक्षी मांगल्यप्रदविधिविधात्री सुवदना
न सोडी चित्तातें, क्षणभरिहि ती कुंदरदना! ९

कृ. शा. चिपुळणकर-पद्यरत्नावलि.

---

## २८. अंतीं एकटाच!

### अभंग.

रावणासारिखी कोणाची संपत्ति? तोही गेला अंतीं एकलाची. १
एकलाची गेला वाली तो वानर, कपि थोर थोर तेही गेले. २
गेले चक्रवर्ती थोर वैभवाचे, फार आयुष्याचे ऋषीश्वर. ३
ऋषीश्वर गेले मार्कंडासारिखे, इतरांचे लेखे कोण करी. ४
कोण करी सर्व शाश्वत आपुलें, सर्व राज्य गेलें कौरवांचें. ५
कौरव निमाले, पांडव गळाले, यादवही गेले एकसरें. ६
एकसरें गेले राजे थोर थोर, आणीक श्रीधर भाग्यवंत. ७
भाग्यवंत गेले एकामागें एक, हरिश्चंद्रादिक पुण्यशीळ. ८
पुण्यशीळ गेले कीर्ती ठेवोनियां, पापी गेले वायां अधोगती. ९
अधोगती गेले देवा न भजतां, संसारीं म्हणतां माझें माझें. १०
माझें माझें करी साचाचीये परी, अंतीं दुराचारी एकलाचे. ११

रामदास–स्फुट अभंग.

---

## २८. रजनी आणि उषःकाल.

### ओंव्या.

भीमसेन पाहे दृष्टी, तंव अंधकारें कोंदली सृष्टी,
गुल्मलता वृक्षदाटी, तृणें मार्ग लक्षेना १
निशाचरी श्वापद पक्षी, थोर गर्जना करिती कुक्षीं,
वोळकंबलीं महावृक्षीं, आस्वलें आणि वाघुळें २
वनदेवता यक्षिणी पाळे, घुमस घालिती गद्रारोळें,
दीपिका लावोनि भंबाळें, गुप्त होती एकसरा. ३
प्रेतगण स्मशानवासी, रूपें धरुनि भ्यासुरवेषीं,
छळिती अशुचि मानवासी, झोंबती मांस भक्षावया ४
दिवाभीतांचे घुंघाट, पिंगळियांचे किलकिलाट,
भालू भुंकती सैराट, टिटिवे थोर टिवटिवती. ५
चक्रवाकांचे आर्तस्वरीं, कुमुदीं भ्रमरांचे झंकारीं,
मस्तकमणितेजविखरीं, जीव आहारा शोधिती. ६
चारिया निघोनी निधानें, धगधगीत प्रकाशमानें,
ईश्वरकृपेस्तव पूर्वपुण्यें, 'येवों' म्हणती सभाग्या. ७
असो. हे निशा दाटली काळी, जेंवी काळपुरुषाची कांबळी,
ब्रह्मांडदेवतेवरी सगळी, पांघुरविली आसत्वें. ८
ऐसें देखोनी तये काळीं, भीमसेन बळियां बळी,
धैर्यें कास घालूनी कवळी, पांचांतेंही एकला. ९
खांदी वाहूनियां जननी, कडिये माद्रीकुमर दोनी,
धर्मार्जुनां बाहुस्थानीं, पाणितळें कवळिलें. १०
पाठीं देऊनी ध्रुवमंडळा, अगस्तिचक्रा लक्षूनि डोळां,
वामीं कृत्तिकांचा मेळा, याम्यदिशे चालिला. ११
पवनवेगें पवनात्मजू, दक्षिण दिशे निघाला उजू,
जैसा मातला महागजू, कर्दळीवना विभांडी. १२

झडपाआड मोडीत झाडें, तळवा चूर्ण करीत धोंडे,
श्वापदसर्पांचीं जुंबाडें, पायातळीं रगडीत. १३

भीमसेनाचा अंगवायो, सुटतां सिंहशार्दूळां प्रलयो,
म्हणती 'वना करावया क्षयो, काय अद्भुत पातलें.' १४

शेष वेंचतां अठरा घटिका, पूर्वदिशेनें क्षाळिलें मुखा,
कुंकुम रेखिलें त्या तिलका, 'अरुणोदय' बोलिजे. १५

भार्गवाचार्य उदया येत, तंव अपार क्रमूनियां पंथ,
पुढें जाह्नवीजळाचा वात, शीतळ मंद पातला. १६

हस्त आवरितां कुमुदीं, अवमान मानिला षट्पदीं,
त्यांतें आदरें कोकनदीं, पाचारिलें जवळिके. १७

कुक्कुटरव करितां 'का का,' भयें पळ सुटला उलूकां;
भेटावया चक्रवाकां, चक्रवाकी चालिल्या. १८

गगनसमुद्रीं मुक्ताफळें, अरुणचंचूनें कनकमराळें,
वेंचूनि घेतां कळाकुशळें, नाहींच केलीं नक्षत्रें. १९

कीं व्योमनर्मदेमाजी थोर, कार्तवीर्यसहस्रकर,
ताराबाणलिंगाचा भार, निवटोनी करी परौता. २०

कापडी चालिले तीर्थपंथें, 'सोऽहमस्मि' चिंतिती ज्ञाते,
भक्त स्मरती हरिहरांतें, प्रेमभावें आवडी. २१

शाक्त चिंतिती शक्तिप्रतिमा, सौर म्हणती सूर्याचि आत्मा,
गाणपत्य गणेशमहिमा, वाखाणिती ब्रह्मत्वें. २२

प्रातर्होम द्यावया जाणा, अग्निहोत्री उठले स्नाना,
एकएक सिद्ध झाले अनुष्ठाना, जपी तपी सुनेमें. २३

मुक्तेश्वर—महाभारत.

## २९. सुभद्राहरण.

एकदां अर्जुन तीर्थाटन करीत करीत द्वारकेजवळ प्रभास नांवाच्या तीर्थाला येऊन पोहोंचला. कृष्णाची धाकटी बहीण सुभद्रा हिला बळरामानें दुर्योधनाला देण्याचा निश्चय केला आहे हें वर्तमान त्याला येथें समजलें. तेव्हां सुभद्रा आपणास मिळावी म्हणून कृष्णाच्या विचारानें त्यानें कपटसंन्यास घेतला, आणि संधिसाधून सुभद्रेचें हरण केलें. हा संन्यासी अर्जुन आहे असें समजल्यावर बळरामानें त्यास आदरानें बोलावून आणून सुभद्रा दिली. ही कथा प्रस्तुत उताऱ्यांत आहे.

**गीति.**

तीर्थें हिंडत गेला धर्मानुज अर्जुन प्रभासाला,
आप्तमुखें निजमातुलकुलवृत्तांतासि ऐकता झाला. १
कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे,
तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे. २
तातादिक म्हणति मनीं सुमति खळाला, अचक्षुला रत्न,
शूद्रास श्रुति देतो राम, न चालेचि यापुढें यत्न. ३
ऐकुनि मनीं म्हणे मज तीर्थस्नायीस जाहली शुद्धि,
या सुकृतें ते व्हावी प्राप्त विरक्तास जेविं सद्बुद्धि ४
निजसुखसिद्धि सुभद्रा साधाया होइन त्रिदंडि यती,
प्रिय तीहूनि नसे मज; ती कीं ही रीति गति, अहो नियती!
पार्थ त्रिदंडि वेष स्वीकारी हलधरासि वंचाया
युक्तीनें स्वपरविहितहित करितां कपटदोष कंचा या! ६
द्वारवतींत वसे तो यति वार्षिक चार मासपर्यंत,
हर्यंतःकरणासचि ठावा तद्योग जो सपर्यंत. ७
मौन, सदा एकांतस्थिति, साधु समाधियोग, सुविरक्ती,
सक्ति न लोकसमाजीं, लागे पौरांसि पार्थयतिभक्ती. ८
रामासहि कळलें कीं, योगी मोठा असे, म्हणे पाहूं,
आहों ब्रह्मण्य, तया आणूं भिक्षेसि, शिर पदीं वाहूं. ९

तो यति एके दिवशीं बळदेवें आणिला स्वगेहास
पूजुनि सुश्रद्धेनें जेवविता माधवास ये हास. १०
यतिदर्शना सुभद्रा येउनि बैसे निजाग्रजाजवळ,
न बळ प्रेक्षी, परि यतिहस्तींचा पाहतां गळे कवळ. ११
कन्यारत्न हराया अवसर पाहे जसा खरा चोर,
घोरप्रताप परि मी भीमानुज, कीं अनंतबळ थोर. १२
दामोदर दासा दे अनुमोदन ती हरावया नवरी,
दादास देव दावी दारकरीति स्वयें सदैव वरी. १३
ताताला मातेला एकांतीं गुह्य वृत्त हें कळवी,
बळवीरभीतिकोपोपशमोपायासि सांगुनी पळवी. १४
अनुकूळ ब्रह्म तसें तों झालें मन्मनोरथा पर्व,
तीर्थस्नान कराया पुरवासी लोक चालले सर्व. १५
नर हयरथगजशिबिकारूढ सकळ वृष्णिदारजन चाले,
झाले सिद्ध वऱ्हाडी तैसे यदुभट; धरा बळें हाले. १६
दिव्यरथांत सुभद्रा बैसुनि सेनेंत तेधवां शोभे,
यन्मुखसुधाकरें नरवरपार्थाशयपयोनिधि क्षोभे १७
तेव्हां धांवुनि बैसे पार्थ सुभद्रारथीं जसा पार्टी,
सुचिरक्षुधित ब्राह्मण हां हां म्हणतांहि वाढिल्या ताटीं. १८
समयज्ञ चतुर सेवक धनु तूण तयांत देति आणोनी,
धांवति रक्षक सैनिक कपटयतिकृतात्यनर्थ जाणोनी. १९
त्यांतें म्हणे सुभद्रामुक्ताहर वीर अर्जुन मराल,
समरा लक्षाहि या, परि काक तुम्ही, गति विसर्जुन मराल. २०
धर्मानुज मी अर्जुन सिंह, तुम्ही शशकिशोर, आटोपा,
या टोपा कवचाऱ्या भीमा वल्गा उगेचि आटोपा. २१
ऐसें नीट दटावुनि जाय सुभद्रा हरूनि तो पार्थ,
मारिति हांका केवळ, नागविला वनिं जसा वणिक् सार्थ. २२
सार्थक पार्थ करी, ती कैरविणी, तो सुधांशु गौरविता,
सविता बिसिनीसि वरी, कीं भेटे तो गुणज्ञ ती कविता. २३

श्रुति सत्क्रिय धर्मपथा शोभविती दंपती तसे स्वरथा,
अन्योन्याप्रिय संगम, तो प्रेमळभक्त ती मुकुंदकथा. २४

झटिति भटकटक बहु करि कन्या नेली म्हणोनि बोभाट,
वाटे बळासि सांगे जो जो त्या दस्युचाचि तो भाट. २५

प्रस्फुरदधरदल प्रभु बलभद्र म्हणे, ‘ खरेंचि सांगा रे,
कोठें तो कपटपटू गांठितसे जो पटांत आंगारे. २६

कोठें रथ ? मुसळ पुरे, कवच कशाला ? धनुष्य राहों द्या;
वत्सेला निजघर्षणकरखळदंडोत्सवासि पाहों द्या. २७

पूर्वी अर्णव तैसा भगवान् बळभद्र पुष्कळ क्षोभे,
संध्यारागसुरंजितशरदभ्राहूनि फार तो शोभे. २८

कोपज्वरभरकंपितकाय प्रभु लोचनें करी शोणें;
होणें पुढें सुदुर्घट, वारावें त्या महेश्वरा कोणें ? २९

जाय हळूच विनयनतकाय चतुर वृष्णिराय देव हरी,
माय सुतार्थ पतीचे काय गुरूचे नमूनि पाय धरी. ३०

नमनीं प्रकटवि सहभव सद्गुण शांतिक्षमानुकंपादी,
कंपा दीनसख नुरवि अधरीं, प्रणतींहि भव्य संपादी ३१

हांसे बळभद्र म्हणे ‘ कृष्णाक्रूरोद्धवा अहो ! कळलें,
वळलें मन, मत्पद भय सोडा, आदान बंधुचें टळलें. ३२

जा जा, उठा; मुलीला पाहूं, वाहूं वरा, घरा आणा;
प्राणाधिक तो येना तरि घालाव्या मदंघ्रिच्या आणा. ३३

अथवा कशास शासनभय धरुनि मनीं पळेल तो दूर,
शूर ख्यात पळेना नेऊं द्या पारिबर्ह अक्रूर. ३४

धाडा भूषा वसनें दासीदासाश्वहस्तिरथरत्नें,
झाला भगीरथाचा पार्थ सखा आजि या महायत्नें. ३५

हें रसिककर्णतर्णकशत तर्पायासि कामधेनु कथा
करिती प्रभुवर अनुचरपरसुखकर अनुसरोनि लोकपथा. ३६

मोरोपंत—सुभद्राहरण.

9325

## ३०. शिवधनुर्भङ्ग व सीताविवाह.

रामलक्ष्मण विश्वामित्राबरोबर मिथिलानगरीला सीतास्वयंवराकरितां गेले. तेथें रामानें शिवधनुष्याचा भंग केला, तेव्हां सीतेनें त्याच्या गळ्यांत माळ घातली. ही कथा या उताऱ्यांत आहे.

### श्लोक.

'हां जी ! श्रीगुरुजी समर्थ !' म्हणुनी माजीं कटारी सजी;
राजीवाक्ष, अजिंक, निस्तुल नृपांमाजीं कशी कास, जी.
माजी राम धजी, सभा गजबजी, हे लोकराजी त्यजी,
या जीवांतील काळजी, जनकजी जोडा दिसे सत्य जी. १
ठाके राम उभा, सुनील मृदुभा देखोनि सारी सभा
झाली चित्रनिभाचि चाविति जिभा साश्चर्य लक्षूनि भा.
तेजें दाहि दिशा झळाळित; निशानाथाभमुक्तावळी,
नानारत्नमणीं विभूषणगणीं छाया दिसे भूतळीं. २
जैसा सिंह उफाळला हिमगिरीच्या गव्हरापासुनी;
किंवा दुर्धर धीरधिंग उठिला शार्दूळ उल्हासुनी;
लीले खेळत इक्षुदंड कवळें वेतंडशुंडा उभी,
तैसा राम उठावला धनुवरी, लक्षी मृगाक्षी उभी. ३
झेंपावे जवळी, मुठीसि कवळी, तों चापघंटावळी
घोषें गाजति, रम्य वाजति, धनुःकोटी गुणीं आवळी;
ओढी, तेचि घडी स्वशक्ति उघडी, गांठी मुठीची मिठी,
ओढी कानवरी तदाचि नवरी लाजोनि लक्षी दिठीं. ४
रामें, लोकाभिरामें, मदनशतसमें, पूर्णकल्याणधामें,
लीलाभूभृल्ललामें, तुकुनि शिवधनू, ओढिलें, पूर्णकामें.
ओढी घेतां तडाडी; निबिड दशदिशीं घोष मोठा झडाडी;
मध्यें भंगे; कडाडी; प्रतिनदन नभीं मेघ जैसा गडाडी. ५

विद्युल्लता पडति भूमितटीं तुटोनी; कीं ते कडे उलथले गिरिचे खुटोनी,
तैसा उठे धनुसि नाद, नभीं भरोनी, टाळी बसे कवण सावध सांवरोनी.
श्रीराम, लक्ष्मणहि, गौतमपुत्र, राजा, गाधेय, जानकि, अशां न पिडी अवाजा.
हे मात्र सावध सद्दा; इतरां जिवांसीं मूर्च्छा जडे; विकल ते पुरदेशवासी.
ओढूनि कार्मुक करें अतिलाघवानें, कीं दाविला रस महाद्भुत राघवानें.
केली सभा तदविमोहित तत्क्षणानें, लक्षी सुलक्षण वधू सुरसेक्षणानें. ८
कौंडिण्य, कौशिक, पराशर, योगिराजे; शांडिल्यगोत्र मधुकादिक अंगिरा जे
ते नाचती गुणकथा कथिती गिरा जे; तो घोष दोषहर सद्रतिलागिं राजे.
देखोनि दोर्बलगती रघुराजयाची, आनंदले द्विज; गुढी उभिती जयाची;
ज्याच्या पदासि वरदेवसमाज याची, तेही मुखीं कारिति भाटिवकी जयाची.

कोणी एक सतोष नाचत उठे, 'रामा! भला रे!' म्हणे.
एकीं वल्कल अर्पिलें रघुविरा, छाटी तिज्या ब्राह्मणें,
एकीं व्याघ्रकडासनें उडविलीं, कृष्णाजिनाचीं शतें,
श्रीरामें बहु मानिलीं स्वशिरसा, आश्चर्य तें भासतें. ११

तों त्या सौधतटीं सख्यांस निकटीं चांपेकळी, गोरटी
सीता सिंहकटी ससंभ्रम उठी, कासे धटी गोमटी;
सजी चालत, सज्जनस्तुतगुणा ते भव्य भागीरथी
पावे दाशरथी-कृपाब्धिजवळीं; ते कोण लीला कथी? १२

सकलहि कलहंसीसारिख्या चांगचाली
चमकति सखिया त्यांमाजिं सीता निघाली,
उतरति तरुणी त्या सौधसोपानमाला;
निरखिति निजभावें आवध्या राघवाला. १३

सहज जंव विलोकीं श्री वराया वरा या,
तइं निरखुनि डोळां देवरा देवराया,
हृदयिं बहु सुखावे; पावली भावलीला;
प्रणमन करि रंगीं ते धुनी मेघनीला. १४

समजति मनिं जीतें योगिये योगमाया;
अतिघनगतिनें ते शीघ्र येती नमाया,
अतुर तरि तशी ते जानकी रामचंद्रा
निरखि निजअपाङ्गें, योगिहृद्व्योमचंद्रा. १५
हळुहळु अमलांगी संगती राजबाळी,
जवळ जवळ आली, डोलते घोंसबाळी;
स्वकरिं कुसुममाला घेउनी, त्या कृपाळा,
धरुनि सुखउमाळा, लक्षिती लोकपाळा. १६
सीतेला स्मरसा, धनूसि हरसा, राजां दिसे वीरसा,
मूढाला नरसा, जनां नृवरसा, भक्तांसि माहेरसा;
देवां ईश्वरसा, रिपूंसि गरसा, ज्ञात्यांसि चित्सारसा;
ऐसा सर्वरसांसि हेतु पारिसा, जो सूर्य हृत्सारसा. १७
आनंदें अळुमाळ लक्षित पदा, वेल्हाळ त्या आंगणीं
लज्जानम्र मदालसा चमकतां कोल्हाळ भूपांगणीं;
हांसे मंद अनालसा अलिकुलस्तोमालका मंगला
रंगीं भव्य तमालनील विभुच्या ते माळ घाली गळां. १८

आनंदतनय–सीतास्वयंवर.

---

## ३१. वयाच्या तीन अवस्था.

### अभंग.

बाळपणें ऐसीं वरुषें गेली बारा, खेळतां या पोरा नाना मतें; १
विटू दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडी, पंपे पेंड घडी एकीबेकी; २
हमामा हुंबरी पकव्याच्या बारे, खेळे जंगी भोंवरे चुंबाचुंबी; ३
सेलडेरा आणि निस्तरभोंवडी, उचली बाले घोंडी अंगबळें; ४
तुका म्हणे ऐसें बाळपण गेलें, मग तारुण्य आलें गर्वमूळ; ५
तारुण्याच्या मदें न मानी कोणासी, सदा मुसमुसी धुळी जैसा; ६

अटोनी वेठोनी बांधीला मुंडासा, फिरतसे म्हैसा जनामधीं; ७
हातीं दीड पान वरतीं करी मान, नाहीं तो सन्मान भलीयासी; ८
तुका म्हणे ऐसी थोर हानि झाली, कारितां टवाळी जन्म गेला. ९
म्हातारपणीं थेटे पडसें खोकला, हात कपाळाला लावुनि बैसे; १०
खोबारियाची वाटी जालें असे मुख, गळतसे नाक श्लेष्मापुरी; ११
बोलों जातां शब्द नयेचि हा नीट, गडगडी कंठ कफ भारी; १२
सेजारी म्हणती मरेना कां मेला, आणीला कंटाळा येणें आम्हां. १३

तुकाराम–गाथा.

---

## ३२. सीताशुद्धि.

रामचंद्रानें रावणाचा वध करून बिभीषणास लंकेच्या राज्यावर बसविलें व रावणवधाचें वृत्त कळविण्याकारितां मारुतीला सीतेकडे अशोकवनिकेंत पाठविलें. तें वर्तमान श्रवण करून सीतेला अत्यंत हर्ष झाला. तिनें रामदर्शनाची आपणास अतिशय उत्कंठा आहे असें मारुतीला सांगितलें. मारुतीनें सीतेचा निरोप रामचंद्रास कळविला. तेव्हां सीतेला आपणाकडे घेऊन येण्याविषयीं रामानें बिभीषणास आज्ञा केली. विभीषण लागलाच अशोकवनिकेंत गेला. त्यानें तिला मंगलस्नान घातलें व वस्त्राभरणांनीं तिला गौरवून शिविकेंत बसवून रामाकडे आणलें. सीता रामाच्या पार्श्वभागीं उभी राहिली. त्या वेळीं रामानें परगृहवासाबद्दल तिला दूषण दिलें. हें ऐकून सीतेला परम दुःख झालें. आपल्या शुद्ध चरित्राविषयीं सर्वांची खात्री करून देण्याकारितां तिनें अग्नि प्रज्वलित करून त्यांत उडी घातली! त्यांत ती दग्ध न होतां अधिकच तेजस्वी होऊन बाहेर आली! हें पाहून सर्व आश्चर्यचकित झाले. सीतेच्या पवित्र आचरणाविषयीं रामचंद्राची खात्री झाली व त्यानें तिचा मोठ्या प्रेमानें व आदरानें स्वीकार केला. प्रस्तुत उताऱ्यांत हा सीताशुद्धीचा प्रसंग वर्णिला आहे.

### ओंव्या.

नयनीं वाहती अश्रुपात, जानकी वानरां आज्ञापित, म्हणे, 'कुंड करोनि अद्भुत, अग्नि सत्वर पाजळा.' १ तत्काल विस्तीर्ण केलें कुंड,

७१

काष्ठपर्वत घातले उदंड, अग्निज्वाला माजल्या प्रचंड, निराळ्या आंसू धांवती २. जगन्माता बोले वचन, 'जरी मी शुद्ध असेन, तरीचें येईन परतोन, पहावया चरण स्वामीचे' ३. सुरासुर वानर ऋक्ष मुनीश्वर, अवघे झाले चिंतातुर, म्हणती 'हा अनर्थ थोर सुखामाजीं ओढवला !'४. रण माजलें देखोनी, वीर निर्भय अंतःकरणीं, तैसी अग्नीसमोर विदेह-नंदिनी, निर्भय मनीं सर्वदा. ५. कुंडासी करोनि प्रदक्षिणा, दृष्टीभरी पाहिलें रघुनंदना, कंठींचा सुमनहार काढोनि जाणा, अग्नीवरी टाकिला. ६. 'सत्य जय सत्य !' म्हणोनी, त्रिवार गर्जे त्रिजगज्जननी, अग्निकुंडीं तये क्षणीं, उडी घातली अकस्मात. ७. मंगलजननीचें हृदयरत्न, अग्नीमाजीं पडतांचि जाण, कन्या गांजली म्हणोन, पृथ्वी कांपे थरथरां. ८. जाहली एकचि आरोळी, शोकार्णवीं पडली कपिमंडळी, सकळ सुरवर व्याकुळीं, प्रळयकाळ भाविती. ९. दशदिशांमाजीं दाटला धूर, कढों लागले समुद्र, वैकुंठ कैलासपदें समग्र, डोलों लागलीं तेधवां. १०. थरथरां कांपे अंबर, नक्षत्रें रिंचवती अपार, सौमित्रिसुग्रीवादिक वानर, नेत्रोदकें ढाळिती. ११. म्हणती अग्निमुखींहूनि पुढती, पुन्हां कैंची देखों सीता सती !' बोलती सर्व कर्मगती, परम दुर्धर वाटतसे. १२. एक घटिकापर्यंत, अग्नीमाजीं जानकी गुप्त, तों मस्तकीं पुष्पें घवघवीत, अकस्मात निघाली ! १३. पहिल्या रूपाहूनि आगळें, शतगुणीं रूप जाहलें, प्रभेनें भूमंडळ भरलें, आश्चर्य झालें ते वेळीं. १४. सीता रामाची चिच्छक्ती, ती गेलीच नाहीं लंकेप्रती, हे खूण साधुसंत जाणती, जे कां वेदांती सज्ञान. १५. असो जानकी देखतां साचार, जाहला एकचि जयजयकार, अष्टादश पद्में वानर, नमस्कार घालिती. १६. मग पुष्पांचे संभार, सीतेवरी टाकिती सुरवर, म्हणती, 'पवित्र सीता सती,' सर्व नमस्कार घालिती. १७. सौमित्रि सुग्रीव बिभीषण, जानकीस घालिती लोटांगण, हनुमंत नमुनियां चरण, आनंदें पूर्ण नाचतसे. १८. असो, श्रीरामाकडे सीता सती, चालली तेव्हां हंसगती, मग उठोनियां रघुपती, उभा ठाकला ते वेळे. १९.

श्रीराममुख विलोकून, सीता करी हास्यवदन, धांवोनि धरिले चरण, जगद्-गुरुचे ते काळीं. २०. मग जानकीस उठवोनी, क्षेम देतसे कोदंडपाणी, मग वामांकावरी घेउनी, रघुनाथ तेव्हां बैसला. २१. नवमेघरंग रघुनाथ, जानकी विद्युल्लता तळपत, सीताराम देखोनि समस्त, जयजयकार करिताती. २२.

श्रीधर--रामविजय.

---

## ३३. उत्तमगुणसंकीर्तन.

### ओंव्या.

विचारेंवीण बोलूं नये, मर्यादेवीण हालूं नये, विवेचनेवीण चालूं नये, कांहीं केल्या. १. जनीं आर्जव तोडूं नये, पापद्रव्य जोडूं नये, पुण्यमार्ग सोडूं नये, कदाकाळीं. २. अतिक्रोध करूं नये, जिवलगासि खेदूं नये, मनीं वीट मानूं नये, शिकवणीचा. ३. क्षणाक्षणा रुसूं नये, लटिका पुरुषार्थ बोलूं नये, केल्यावीण सांगूं नये, आपुला पराक्रम. ४. बोलिला बोल विसरूं नये, प्रसंगीं सामर्थ्य चुकूं नये, केल्यावीण निखंदूं नये, पुढिलासी कदा. ५. आळसें सुख मानूं नये, चहाडी मनासी आणूं नये, शोधिल्याविण करूं नये, कार्य कांहीं. ६. सुखा अंग देऊं नये, प्रयत्न पुरुषें सांडूं नये, कष्ट करितां त्रासूं नये, निरंतर. ७. सभेमध्यें लाजूं नये. बाष्कळपणें बोलूं नये, पैज होड घालूं नये, कांहीं केल्या. ८. कोणाचा उपकार घेऊं नये, घेतला तरी राखूं नये, परपीडा करूं नये, विश्वासघात. ९. व्यापकपण सोडूं नये, पराधीन होऊं नये, आपलें ओझें घालूं नये, कोणा एकासी. १०. तोंडीं शिवी असूं नये, दुसऱ्यासी देखुनी हंसूं नये, उणें अंगीं संचरूं नये, कुळवंताचे. ११. आपुल्याची ग्वाही देऊं नये, आपुली कीर्ति वर्णूं नये, आपुले आपण हांसूं नये, गोष्टी सांगोनी १२. अल्प धनें माजूं नये, देवभक्तीसी लाजूं नये, मर्यादेवीण चालूं नये, पवित्र जनीं. १३. मूर्खाशीं संबंध पाडूं नये, अंधारीं हात घालूं नये, दुश्चितपणें विसरूं नये, वस्तु

आपली. १४. सत्य मार्ग सांडूं नये, असत्यपंथें जाऊं नये, कदा अभिमान घेऊं नये, असत्याचा. १५. अपकीर्ति सांडावी, सत्कीर्ति वाढवावी, विवेकें दृढ धरावी, वाट सत्याची. १६.

रामदास-दासबोध.

---

## ३४. ताटकावध.

विश्वामित्रऋषीनें एकदां एक मोठा यज्ञ करण्याचें मनांत आणिलें. त्या यज्ञाचें रक्षण करण्याकरितां त्यानें दशरथापासून त्याचे पुत्र रामलक्ष्मण मागून घेतले. रामलक्ष्मणांना घेऊन विश्वामित्र आपल्या आश्रमाकडे जात असतां वाटेंत ताटका नांवाची एक भयंकर राक्षसी त्यांना आडवी आली. विश्वामित्राच्या आज्ञेवरून रामचंद्रानें तिचा वध केला. प्रस्तुत उताऱ्यांत रामचंद्र व ताटका यांच्या युद्धाचें वर्णन आहे.

ओंव्या.

आज्ञा देसी स्वामिनाथा, राक्षसी वधीन मी आतां, ऐसें विश्वामित्रें ऐकतां, उल्लासें तत्त्वतां नाचत. १. इसी मारावें रघुनाथा, स्त्री मारूं नये शास्त्रार्थां, दुष्टदमनीं हें वाक्य वृथा, इसी सर्वथा मारावें. २. स्वामी करूं नये गुरुअवज्ञा, हे सकळशास्त्रार्थप्रतिज्ञा, वसिष्ठदशरथाची आज्ञा, तुझी अवज्ञा न करावी. ३. सकळ शास्त्रार्थ आपण, गुरुचरणा येती शरण, गुरुआज्ञा परम प्रमाण, अन्यथा कोण करूं शके ? ४. ऐसें बोलोनि रघुनंदन, नमूनियां सद्गुरुचरण, चाप सज्जुनि संपूर्ण, साटोपें ठाण मांडिलें. ५. ते काळीं श्रीरामरूप, पाहतां काळासि सुटे कंप, वीर्यधैर्याचा साटोप, परम प्रताप युद्धाचा. ६. करितां धनुष्यीं टणत्कार, दुमदुमिले मेरुमंदार, खळबळले सप्तसागर, पाताळीं विखार पळताती. ७. धनुष्यनादाचिया कोटी, न्याहा उठला वैकुंठीं, ध्यानीं दचकला धूर्जटी, हडबड मोठी सुरवरां. ८. नादें कोंदलें अंबर, दिशा झाल्या नादाकार, तेणें ताटिकेचें जिव्हार,

कांपें थरथर सनादें. ९. तेणें गजबज जाली उठी, दोघे कुमार देखे दृष्टीं, गिळावया आवळी चाटी, सक्रोध उठी साटोपें. १०. बिकट देखोनियां हांक, विक्राळ पसरोनियां मुख, धाविन्नली श्रीरामासन्मुख, येरु तो निः- शंक तद्वधार्थी. ११. श्रीराम म्हणे लक्ष्मणा, पाहे भ्यासुर राक्षसी पूर्णा, देखतां प्राणी सांडिती प्राणा, इजसमोर कोणा न राहवे. १२. आतां पाहें माझें विंदान, हस्तलाघवीं अनुसंधान, येके घाई घेईन प्राण, म्हणोनि बाण सोडिला. १३. कानाडी ओढितां आपण, आकर्षिला ताटि- केचा प्राण, हृदयीं आदळला बाण, जिव्हारीं पूर्ण भेदला. १४. बाणाच्या सबळ मेळीं, ताटिका देवोनि आरोळी, नेटें आदळली भूतळीं, न्याहा पाताळीं उठिला. १५. ताटिकेचे शरीरभारें, दुमदुमिलीं गिरिकंदरें, डळ- मळलीं मेरुशिखरें, भयें वनचरें चकित मूर्च्छा. १६. तळीं पाषाण जाले रांगोळी, वृक्ष उपडिले समूळीं, पक्षी भ्रमले अंतराळीं, बैसली टाळी दिग्गजांची. १७. ताटिकापातें भूकंप होत, समुद्रजळ उचंबळत, नरनारी हाहाभूत, असुर कांपत थरथरां. १८. ताटिका पडतांचि सृष्टीं, देवांचीं कोट्यानुकोटी, विमानें दाटली दाटी, पुष्पवृष्टी तिहीं केली. १९. निशाणें त्राहाटिलीं सुरवरीं, शंख दुंदुभि निशाण भेरी, गगन गर्जे जयजयकारी कीर्ति सुरवरीं वानिजे. २०. ताटका वधिली तत्काळीं, कौशिक नाचे आनंदमेळीं, श्रीराग जीवातें ओंवाळी, पिटिली टाळी ऋषिवृंदें. २१.

एकनाथ–भावार्थरामायण.

---

## ३५. देवाजवळ मागणें.

### अभंग.

मायबाप बंधु सोयरा सांगाती, तूंचि माझी प्रीति गणगोत; १
शरण आलीं त्यांचीं वारीलीं दुरितें, तारिले पतित असंख्यात; २
इतर कोण जाणे पावले विश्रांति, न येतां तुजप्रती शरणागत. ३
पापाची वासना नको दावूं डोळां, त्याहूनि आंधळा बराच मी; ४

निंदेचें श्रवण नको माझे कानीं, बधिर करोनी ठेवीं देवा; २
अपवित्र वाणी नको माझे मुखा, त्याजहुनी मुका बराच मी. ३
त्राहे त्राहे त्राहे सोडवीं अनंता, लागों दे ममता तुझे पायीं; १
एकचि मागणें देई तुझी गोडी, नलगे आवडी आणिकांची; २
तुझें नाम गुण वर्णीन पवाडे, आवडीच्या कोडें नाचों रंगीं. ३
करोनीयां कृपा करीं अंगीकार, न लावी उशीर आतां देवा; १
नलगे देवा तुझें आम्हांसी वैकुंठ, सायुज्याचा पट नलगे मज; २
देई तुझें नाम मज सर्वकाळीं, मागणें वनमाळी हेंचि तुज. ३
नरस्तुति आणि कथेचा विकरा, हें नको दातारा घडों देऊं; १
ऐसीये कृपेची भाकीतों करुणा, आहेसी तूं राणा उदारांचा; २
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा, हे नको गोविंदा घडों देऊं; ३
तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर, नको वारंवार पडों देऊं. ४

तुकाराम–गाथा.

---

## ३६. स्फुट पद्यें.

**गीतिच्छंद.**

ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेहबिंदुही फार,
सारज्ञ असूयोज्झित, त्यांला माझा असो नमस्कार. १

**श्लोक.**

वाल्मीकिविप्रोत्तमकाव्यपद्म, श्रीरामलीलामकरंदसद्म;
तेथें मयूरेश्वर भृंग झाला, सेवावया नित्य सुखें रसाला. २

**गीतिच्छंद.**

संसार दोदिसांचा, सत्संग धरी कुलीन तोचि तरे,
घ्यावें बरें म्हणोनी स्वपरमुखीं, हें कुलीनतोचित रे! ३
शशमंडळांत कोल्हा म्हणतो 'मी सिंह'; वल्गना कारितो,
जोंवरि न पाहिला गजमुक्ताफळकवळभक्षिता हरि तो. ४

श्लोक.

पापातें न बसावया स्थळ दिसे, कोण श्रमाला पुसे!
नाहीं आश्रय यास्तव क्षितितळीं चिंता साचिंता वसे!
विप्रातें बहु विघ्न होति, रुसली भीति त्रिलोकीं बरी,
साकेतीं रघुनाथ सानुजसुहृत् राज्यासि जेव्हां करी. ५
सच्चेत:कैरवांतें विकच कारि, जगत्ताप संपूर्ण टाळी,
अज्ञानध्वांत सारें हारि, रसिकचकोरांसि अत्यंत पाळी;
नाना वस्तु प्रकाशी, कविहृदयपयोराशिसंतोषहेतु,
काव्येंदु स्वप्रभेनें खळविरहिजनीं होतसे धूमकेतु. ६

गीतिच्छंद.

ज्ञानेशा! त्वत्कृतितें करिती ज्ञाते समस्तही प्रणती,
ज्ञानेश्वरी भवानी होय महामोहमहिष हे म्हणती. ७
द्विज ‘सावधान’ ऐसें सर्वत्र विवाहमंगलीं म्हणती,
तें एक रामदासें आयकिलें, त्या असो सदा प्रणती. ८
भगवद्भक्ति कराया बहु जडजीवांसि जो तुका शिकवी,
त्याच्या दुसरा धरणीवरि येइल कोण हो तुकासि कवी? ९
वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला,
प्रभुनें भुलवाया मन, वामन हा वेणुसाचि बोलविला. १०
प्रसवे व्याघ्रासि मृगी? काय उकिरड्यांतही हिरा पिकतो?
जरि वाढला कुळींही काकाच्या काक काय रे पिक तो. ११
करिल कसें मांजर? जें दुष्कर हरिहननकाज वाघास
न शकति अग्नि विधु, कसा दिनमणिचा करिल काजवा घास! १२
धवलांबरासि कज्जल, तैसें जें शुचि कुलासि पाप डसे,
तें धूतां श्रम बहु; गुरु भाजति दुःखाग्निमाजिं पापडसे. १३
आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्व काळ, जिला
प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला. १४

धर्मे करोनि भजतां होइल हे विषलताहि सोमलता;
त्यजितां धर्मपथातें धरिते पीयूषवाह्लि सोमलता. १५

व्याघ्रवृकहरिव्याळप्रभृतींचा जो समूह हानिकर,
त्याहूनि कामकोपप्रमुखांचा निपट दुष्ट हा निकर. १६

जी शीता गाधजला सरिता शिरतां निवे करीं तींत,
निवतो प्रवेशतां जन सर्वहि तैसा विवेकरीतींत. १७

हळुहळु झडो अहंता सन्नमनीं वार्धकीं जसी शेंडी,
केंद्र विवेक विषयां, निस्पृहजन वस्तुतें जसा केंडी. १८

रंगावें सद्वचनें मतिनें चूर्णें जसेंहि हळदीनें,
भजन न सोडावें म्यां जेविं कधीं कर्षकें न हळ दीनें. १९

स्पर्शमणि सुवर्ण करी, दे स्पर्शमणित्व तो न लोहातें,
हा साधुसंग करितो साधु असाधूसि, हरुनि मोहातें. २०

रस न समजति, म्हणविति रसिक, म्हणुनि चित्त बहुत हळहळतें;
जें तन्निंदकभाषण होतें कर्णांत तस हळहळ तें. २१

ज्यांसह घडतें दैवें सहज पथीं चालणें पदें सात,
त्यां मित्र साधु म्हणती देतीच व्यसनसागरीं हात. २२

साधुमना न परहिताचरणीं घडल्याहि मरण तळमळवी,
मदकर्दमींहि सन्मति तिळभर डावेंहि चरणतळ मळवी. २३

जेथें इंद्रियलालन, तेथें क्षण भरंवसा न आयूचा,
काळाचा वेग जना दुःसह अभ्रांसि जेविं वायूचा. २४

श्लोक.

रामाचें रचिलें चरित्र मुनिनें वाल्मीकिनें संस्कृतीं,
नाहीं हानि कदापि अन्यकविंहीं तें वर्णितां प्राकृतीं;
मुक्तांचा रचिलाचि हार वहिला जो रेशिमाच्या गुणें,
तो कार्पासगुणेंकरून करितां काय प्रभेला उणें ! २५

'गीर्वाणें राघवाचें यश रसिकजनां लागतें फार मिष्ट,
तैसें न प्राकृतानें' अचतुर म्हणती; मानिती तें न शिष्ट!
पीतां गोक्षीर कार्तस्वरमणिचषकें देतसे जेंवि गोडी,
सारज्ञाला पलाशद्रुमदलपुटकें सेवितां तें न सोडी. २६

गीति.

धन्य श्रीराम पिता, धन्या लक्ष्मी प्रसू जगीं झाली,
आली सत्यवतीची कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली. २७
ज्वरितांसि शर्करा जशि, कटु होय खळांसि सुरसही कविता,
शिष्टा पद्मा सुख दे दुष्टा घूकासि ताप दे सविता. २८
दुर्लभ वस्तु न वांछी, न करी जो नष्ट वस्तुचा शोक,
आपत्तींत न मोहे, त्या पंडित म्हणति जाणते लोक. २९
दुर्जनसहवास सदा तापद, हा काय नरक सामान्य?
होईल यास दाटुनि मानघन प्राज्ञ नर कसा मान्य? ३०
खळ न खळत्व त्यागी जरि सामें गौरवूनि बोळविला,
लकुच कटुचि अमृतकरांकरवींही शर्करेंत घोळविला. ३१
भावि प्रबळ, भ्रमतो सर्वहि, बालिश असो; असो सुकवी,
होणार सत्पथींही दिवसींही डोळसांसिही चुकवी. ३२
भ्रमवी, श्रमवी, मळवी, पळवी, सत्कीर्तिला, दुराग्रह रे,
सेव्य सदुपदेशसुधाग्रह असदुपदेश हा सुराग्रह रे. ३३
चुकल्या जनासि कोणी सांगुनि निजहितपथासि जो लावी,
धनदेंहि उपकृतीसी त्याच्या निजसंपदा न तोलावी. ३४
जाळी ज्वलन, न बोले; न वदेचि जरि प्रकाश करि तरणी,
न वदोनि कुलज नरवर यत्नें स्वयश:प्रकाश करित रणीं. ३५
संस्कारधर्म लोपे दुष्टजनसमागमें उडे शुद्धी,
मग गुणवंताचीही सदधिक्षेपीं प्रवर्तते बुद्धी. ३६

हृदयीं क्षमा असावी, सर्वत्र सदा असो न ये पण ती,
म्हणती क्षमितां दुर्बळ, न क्षमितां कारिति दुर्जन प्रणती. ३७
रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं आरिचीहि न कारिती संत,
पाहों नयेचि अंगीं बळ असतां दीन जंतुचा अंत. ३८
भूतीं दया असों द्या, व्हा इंद्रियषडरिनिग्रहीं धीट,
सोडुनि अन्यपथ, धरा निजधर्माचारमार्ग हा नीट ३९
गति उत्तम होय असें वर्तावें, धर्मनीति रक्षावी,
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति रीति शांति लक्षावी. ४०

मोरोपंत—भारतादि ग्रंथ.

---

## ३७. दुष्यंत व शकुंतला यांची भेट

### ओंव्या.

कौरववंशीं प्रख्यातकीर्ती, दुष्यंतनामा गुणैकमूर्ती, श्रेष्ठ भूपाळ चक्रवर्ती, वीर्यें शौर्यें आगळा. १. प्राची प्रतीची दक्षिणोत्तरां, चारी दिशां चतुःसमुद्रां, आक्रमूनि महीमहीध्रां, सुरेंद्र तैसा भूलोकीं. २. हिंसाकारी अधर्मकारी, अथवा वर्णसंकरकारी, दुष्यंतराज्यीं अनाचारी, स्वप्नींही परी असेना. ३. धर्मरीति धर्मधन, सेवूनि संतुष्ट सर्व जन, स्वस्वकर्मी सकळ वर्ण, विहिताचारें वर्तती. ४. रोग दारिद्र्य कीं बंधन, दुःख दुर्भिक्ष्य, अकालमरण, सर्प वृश्चिक तस्कर जाण, दुष्यंतराज्यीं असेना. ५. स्वकाळीं पर्जन्य वोपी उदका, रत्न धान्य समृद्धि पिका, पृथ्वी पिके हे मांत्रिका, फळे जैशी श्रीविद्या. ६. विष्णूसमान सत्ता-बळ, प्रताप सूर्य तेजाळ, धरातुल्य सहनशीळ, अक्षोभ जैसा सागरू. ७. निपुण शस्त्रास्त्रप्रहरणीं, आरुढो जाणे सर्ववहनीं, ऐसा भूपाळचूडामणी, दुष्यंतराजा भूलोकीं. ८. सप्तसमुद्रींचे लोट, धरामंडळीं एकवट, तैसे सेनेचे संघाट, घेऊनि वना चालिला. ९. वाजी वारण रथ पदाती संख्या करितां न करवे गणती, सेनावसनें सर्व जगती, पांघुरविली समर्थें. १०.

देखे प्रचंड महागिरी, विशाळ पर्वताचिया दरी, जळें तुंबलीं सरितासरीं, समुद्रतुल्य अगाध. ११. नाना वृक्षांची अचाट, डांगें लागलीं घनदाट, माजी निर्झरोदकांचे पाट, सरोवरां धांवती. १२. मस्तकें उचलूनि दिनकर, छाये रक्षिला अंधकार, माजी श्वापदगणांचे भार, सुखावले सुखवस्ती. १३. मृग मारूनि असंख्यात, भक्षूनि भर्जित अभार्जित, पारधी खेळतां झाले श्रांत, ते विश्रांति पावले. १४. अवलोकूनि तें वन, राजा करी पुढारां गमन, तंव देखिलें कश्यपारण्य, सिद्धसाधकीं वसविलें. १५. नदी मालिनी पवित्रजीवनी, वाहे जैशी देवतटिनी, तरंगलिंगें सुफेनसुमनीं, सुपूजिता शोभती. १६. साष्टांग करूनियां नमन, राहवूनि सेना प्रधान, निसंग एकाकी आपण, कश्यपाश्रमीं प्रवेशे. १७. अवलोकूनि कश्यपाश्रम, आंत जों पाहे नृपसत्तम, तंव कण्वऋषीचा आश्रम, अति रमणीय देखिला. १८. आदरें जाऊनि तया निकटीं, आंत पाहे पर्णकुटी, मनुष्यावीण सर्व दृष्टी, गृहसामग्री दिसताहे. १९. मग गर्जून नराधीशें, म्हणितलें 'आश्रमीं कोण असे?' हें परिसोनि इंदिरावेशें, लावण्यकलिका प्रगटली. २०. कनकलतिका सौदामिनी. कीं चंद्रकलिका तनुधारिणी, सुवर्णकेतकीपत्रवर्णी, सुवर्णखाणी हरिणाक्षी. २१. रूपयौवनचातुर्यलता, बाहेर पातली मुनीश्वरदुहिता, अत्यादरें धरित्रीकांता, पवित्रासन ओपिलें. २२. स्वागत वदूनियां वचनीं, अर्घ्यें पाद्यें विधिपूजनीं, राजा तोषवूनि बहुमानी, कुशलवृत्त विचारिलें. २३. 'दर्शनें आनंद जाहला नयना, नामस्मरण करवावें श्रवणा, परिचयज्ञानें अंतःकरणा, आप्तभाव भेटवणें.' २४. ऐकोनि चातुर्याची गोष्टी, राजा चमत्कारला पोटीं, म्हणे, 'हे वयें अति धाकुटी, परि विचारें वृद्ध दिसताहे!' २५. राजा बोले 'या जगता, दुष्यंतनामा चक्रवर्ती, ऐकिला असेल तरी हे मूर्ती, ओळखें दृष्टी सुजाणे. २६. कण्वऋषीचें दर्शन, इच्छूनि येथें समागमन, केव्हां होईल बोल वचन, विलंबें कीं अविलंबें?' २७. शकुंतला म्हणे, 'नृपती! मम पिता विवेकमूर्ती, वनफळें घेऊनि

शीघ्रगती, आतांच येईल आश्रमा. २८. या लागीं नरेंद्रचूडामणी, क्षण एक बसावें या स्थानीं, इच्छित कामना ऋषिदर्शनीं, पूर्ण होईल निर्धारें.' २९.

मुक्तेश्वर—दुष्यन्तशकुंतलाख्यान.

---

## ३८. जनकाच्या घरीं परशुरामाचा सत्कार.

ओंव्या.

सहस्रार्जुन पडला रणक्षेत्रीं, सवेंचि तीन सतकें धरित्री, परशुरामें केली निःक्षेत्री, आज्ञेवरी मातेच्या. १. जनकराजा ब्रह्माधिकारी, परशुराम त्यातें न मारी, येकात्मता प्रीति करी, त्याचे घरीं राहविला २. जनकें परशुरामासी, राहविलें भोजनासी, रामासवें अपार ऋषि, जनकें त्यांसी निमंत्रिलें ३. रामें ठेवूनि धनुष्यबाण, स्वयें केलें संध्यास्नान, भीतरीं करावया भोजन, ऋषिपंक्ति पूर्ण बैसली. ४. ताटें वाढिलीं चोखडीं, अवघ्या रसा एकचि गोडी, जनकें अत्यंत आवडी, केली परवडी भृगुवर्या. ५. तो सेवितांचि रसस्वादू, रसनेमाजीं निजानंदू, उदरीं कोंदला परमानंदू, सबाह्य स्वानंदु रसस्वादीं ६. सकळ साधनेसी वरी लवण, तंव तृप्ती झाली संपूर्ण, श्रीरामाचे पंक्ती जाण, अपूर्णपण असेना. ७. यावरी स्वयें तृप्त जाले, स्वयेंचि संसारा आंचवलें, तृप्तिसुखे सुखी जालें, स्वस्थ राहिले स्वस्थानीं. ८. फळाशा फोडोनियां फोडी, वासना शिरा काढोनियां बुडीं, शांति परिपक पानांची विडी, स्वलीळा तोंडीं घातली ९. जाळोनि अहंकार—कठिनपणा, सोऽहं गाळीव शुद्ध चुना, लावोनी शांति परिपक्क पाना, तांबूल स्वादना सुख वु. १०. सर्व साराचें निजसार, तेंच सेविती खदिरसार, श्रीरंगें रंगाकार, अति पवित्र तांबूल. ११. अर्पिलें सुमन चंदन, दीपावली नीरांजन, यथोक्त करितां पूजन, सुखसंपन्न भार्गव. १२.

एकनाथ—भावार्थरामायण.

---

## ३९. भरत आणि कुशलव.

रावणवधानंतर रामचंद्र अयोध्येस आला व तेथें त्याला राज्याभिषेक झाला. नंतर लोकापवादावरून त्यानें सीतेचा वनांत त्याग केला. त्या वेळीं सीता गरोदर होती. पुढें ती वाल्मीकीच्या आश्रमांत प्रसूत झाली. तिला जुळे मुलगे झाले. तेच कुश आणि लव होत. इकडे अयोध्येंत रामचंद्रानें अश्वमेध सुरू केला व यज्ञाचा घोडा दिग्विजयाकरितां मोकळा सोडला. तो घोडा वाल्मीकीच्या आश्रमांत आल्याबरोबर लवानें धरला. त्यानंतर कुश-लवांचें, शत्रुघ्न व लक्ष्मण यांच्याबरोबर घनघोर युद्ध झालें. त्यांत लक्ष्मण व शत्रुघ्न मूर्च्छित होऊन पडले व त्यांच्या सैन्याची धुळदाण उडाली. हें वर्तमान समजतांच रामानें कुशलवांवर भरताची योजना केली. प्रस्तुत उताऱ्यांत भरत व कुशलव यांचा युद्धप्रसंग वर्णिलेला आहे.

### गीति.

मग जांबवदंगदनलनीलपवननंदनादि वीरमणी,
रमणीयवेषभूषित निघती क्षम सर्व विष्टपाक्रमणीं. १
नरवानरसंकुल बल भूमिव्योमासि वेष्टुनी चाले,
भारार्त शेषमस्तक हाले, मग भूमिकंप बहु झाले. २
क्षरती मदोदकांहीं गंभीरध्वान कज्जलाभ करी,
भूगत घन हे मानुनि, मुग्धाजन फार कौतुकासि करी. ३

### श्लोक.

चापी, रुक्मरथी, प्रचंडमुसली, कांडी, कृपाणी, गदी,
हारी, कीतिक कुंडली, सुकवची, चर्मी, किरीटांगदी,
देवांच्यापरि शोभती भट चलत्क्षोणीध्र तैसे रदी,
झाल्या त्या कटकें तदा क्षितितळीं नामैकशेषा नदी. ४
स्वर्णाचे ध्वज अंबरीं झळकती, दानोदकें वर्षती,
हस्ती गर्जति, धूळिचे व्रज घन व्योमांतरीं दाटती,
झाला कर्दम, दानधर्मसलिलें तीं वाहती, सांचती,
वर्षा मानुनियां शिखी बहुसुखी कांतांसवें नाचती. ५

ऐसा सेनेसमेत त्वरित भरत तो जाय बंधुद्वयातें,
रक्षायातें प्रतापें कुशल कुशलवांलागिं जिंकावयातें,
भेरीध्वानें सुरांला बधिर करुनियां युद्धयज्ञक्षमेला
पावे, जेथें सुमित्रासुत, भटजनही कोटि, कीं, लक्ष, मेला. ६

गीति.

तों पाहुनियां कुशलव म्हणती 'नाहीं रिपू निमाले कीं,
निकट विकटकटकभट प्रकट कटकसेच दुष्ट आले कीं.' ७

श्लोक.

असें ते बोलोनी त्वरित मग दोघे उसळले;
वनीं वाय्वग्नीसे भरतकटकांतीं मिसळले.
महाकांडव्रातेंकरुनि सुटले मार्दत रणीं;
बुडे अब्धीमध्यें तदिषुशिखिसंतप्त तरणी. ८

सूर्यरश्मिसमुदाय आटला, अंधकार मग फार दाटला,
जाहलीं जनविलोचनें वृथा, नासली रणकथा यशःप्रथा. ९

गीति.

नेत्रें असूनि उघडीं, तिमिरीं स्वपरांसि वीर नोळखती,
आकस्मिकलब्धश्रीमदांध अकुलीन नर जसे कुमती. १०

श्लोक.

ताडिलें गजकरीं करवालें, निर्मिलें रण भयंकर बालें,
वाहती बहुतर क्षतजा ते, निर्मिलें लवकरें क्षत ज्यातें. ११
खड्गपात करितां गजदंतीं, शब्द संचरति सर्व दिगंतीं,
पावक प्रगट होउनि भाजी, धांवतां चिरडती गजवाजी. १२
काळसर्परसना तरवारी; तीस कोण जन कातर वारी?
स्पर्शतांचि बहु सत्वर मारी, काय ते प्रगटली नरमारी! १३
'तात! सोदर! सखे! सुत! काका!' यापरी बहुत मारिति हांका.
ऊठती कलितशस्त्र कबंधें, मारिती निजजनांसाचि अंधें. १४

कित्येक शोणिततटिन्युदरांत मेले, जे कातरांतर तमांत पळोन गेले.
एवं तदा क्षितिसुतातनयायुधांनीं, एका दिशांत भरली यमराजधानी. १५
मांसासि भक्षुनि, निषेवुनि शोणितातें,
भूतें 'दिलें' म्हणति, 'भोजन मिष्ट तातें.'
'याच्या नसे' म्हणति तीं 'तुलना यशातें.'
तें ऐकतां, सुख गमे बहु त्या कुशातें. १६
आसूर्योदय यापरी बळ तिहीं संहारितां पाहिलें,
तेव्हां त्या भरतासि कोपशिखिनें उद्दंडसें दाहिलें;
संताडी कुशहृत्स्थळासि अनळज्वाळाकुळेषुव्रजें,
साधूच्या प्रतिपालनीं मृदु, असत्संक्रंदनीं तीव्र जे. १७

गीति.

त्यांचें करुनि निवारण, वारणशत्रुप्रताप कुश बोले,
धरुनि वृथा काम रणीं, कां मरणीं सिद्ध मूढ हे झाले? १८

श्लोक.

सेनालक्ष्मणशत्रुघ्नपंचतामोहहेतु मी,
पतंगदीपकन्यायें मरतां काय हे तुम्ही? १९
म्हणे भरत, 'हे शिशो! त्यज खळा! नमाश्वोत्तमा!
न मानिसि जरी, मनीं धरुनि गर्व लोकाधमा!
यमालयपथीं न हो पथिक, मी करूनि क्षमा
न मारिन, नसो प्रसू तव न तापसी सश्रमा. २०
मदीयबळशोणितेंकरुनि तर्पिली त्वां क्षमा,
स्वबंधुहि विमर्दिले जरि, तथापि केली क्षमा.
त्यजीं मखहयास या, धरुनि अन्यथा मी तुला,
पुरास मग नेइन क्षण न लावतां, रे मुला! २१

गीति.

सोडुनि माझा घोडा, दोघेही हस्त या क्षणीं जोडा;
'शरणागत' म्हणवा रे! याचि उपायें समर्थभय वारे.

'वांचाविलें भरतानें' ऐसें जननीस शीघ्र सांगावें,
पुनरपि असें न करणें, निजजीवनदातृकीर्तिला गावें. २३

श्लोक.

कैकेयीपुत्र बोले खरमृदुल असें जेधवां आत्मतुंडें,
कोपें नेत्रें कुशाचीं तंव दिसति, जशीं खादिरांगारकुंडें.
तोडी निश्वास पादाहत उरग तसा दंतवस्त्रासि खंडी.
कोदंडी चंडकांडी कुशचि पारि गमे पत्र ज्याचें शिखंडी. २४
ताडी सप्तेषुवृंदें कुश कुशल करें शीघ्र रामानुजाला,
पांचां, सातां, शरांहीं इतर भट तयां, सत्तरांहीं नळाला,
वाताच्या नंदनाला खरविशिखशतें, अंगदातें सहस्रें,
नीळातेंही तदर्धें; स्थविर, तिस शतें छिन्न, वाहे महास्त्रें. २५
ज्यांच्या उरीं स्पर्श केला बलाकृष्टशिलीमुखें,
त्यांहीं त्यांहीं भूगतांहीं वीरांहीं वाशिलीं मुखें. २६
षट्चंडकांडप्रखरें लवानें, केलें धनु च्छिन्न तदा लवानें,
ससूत वाजी शुभलक्षणानें, संचूर्णिला तद्रथहि क्षणानें. २७
वक्षःस्थळीं बाण तदा कुशानें, संप्रेरिले युद्धनिरंकुशानें.
संमूढ होऊनि पडे धडाडां, रक्तप्रवाहासि वमे भडाडां. २८
जेव्हां मूर्च्छित देखिला क्षितितळीं भास्वत्कुळाचा टिळा,
क्रोधें पर्वत योजनायत मरुत्पुत्रें समुत्पाटिला,
हुंकारध्वनिकंपितात्रिभुवनें दोघांवरी सोडिला,
त्यांहीं तो त्रसरेणुसंचय वियद्रंगान्तरीं पाडिला. २९
वातोद्भूतमहीध्ररेणुगण तो जेव्हां शिरे खांगणीं,
युद्धालोकनकौतुकागतनभःस्थस्ववंधू तत्क्षणीं;
वक्त्रें झांकिति नेत्र चोळिति किती त्या फुंकिती थुंकिती,
कीती खोकति ओकती किति धुतास्वालंकृती शिंकती, ३०

ऐसें कौतुक निर्मिलें लवयुतें त्या सद्यशःसंचकें,
वामीं मारुति ताडिला मग कुशें बाणांचिया पंचकें,
वज्राच्छिन्ननगेंद्रसा घडघड क्षोणीतळीं आपटे,
कांपे सांद्र विघट्टिता थरथरां भू पृष्ठ जीचें फुटे ३१
ऐसें कुशें कौतुक तेथ केलं, सर्वां भटांचें मग धैर्य गेलें,
धाकें पळाली अवशिष्ट सेना, भ्याडांसि कांहींच पुढें दिसेना.३२

मोरोपंत–कुशलवोपाख्यान.

---

## ४०. श्रीकृष्णाची अग्रपूजा.

धर्मराजानें एकदां राजसूय नांवाचा यज्ञ केला. त्या प्रसंगीं मोठे मोठे राजे धर्मराजाच्या घरीं आलेले होते. तेव्हां अग्रपूजा कोणाची करावी असा प्रश्न उपस्थित झाला. भीष्माचार्यादिकांनीं श्रीकृष्णाची अग्रपूजा करावी असें धर्मराजास सांगितलें. त्यावरून त्यानें श्रीकृष्णाची प्रथम पूजा केली. या पूजेचें वर्णन प्रस्तुत उताऱ्यांत आहे.

### ओंव्या.

हृदयीं जाणोनि कार्यमूळ, आग्रह न करीच गोपाळ, धर्में प्रार्थितां तात्काळ, पूजासनीं आरुढे. १. सोमकांत श्वेतचवाई, शेषाकृती शोभली पायीं, वरी आदरें क्षीराब्धिशायी, धर्मराजें बैसविला. २. चरणक्षालना कनकपात्र, पुढां ओढवी माद्रीपुत्र, गंधपुष्पेंसी स्वतंत्र, भीमार्जुन ठाकले. ३. तळवटीं क्षीरोदक उत्तम, वरी शोभला मेघश्याम, जेवीं कैलासा द्यावया क्षेम, नीलजीमूत पातला. ४. छत्रचामरें उभय व्यजनु, धरिती द्रौपदीचे नंदनु, पादुका घेउनी अभिमन्यु, उभा ठेला जवळिके. ५. वाद्यें लागलीं सुस्वरें, भक्त गर्जती जयजयकारें, भीष्मविदुर प्रेमादरें, उभे ठेले आवडी. ६. वैष्णवकीर्तनाची सरळी, नाचों लागली धुमाळी, विष्णुचरित्रें नामावळी, एकटाळी हरिनामें. ७. देव बैसोनी विमानीं, वर्षाव करिती दिव्य-सुमनीं सनकादिकांचिया नयनीं, आनंदाश्रु लोटले. ८. चरण क्षालितां

धर्मातें, धाविन्नलीं त्रिलोकींचीं तीर्थें, तळीं वोढविती माथें, पवित्रपणा-
लागोनी. ९. जया चरणामृताची गोडी, लागतां लक्ष्मी झाली वेडी,
दिव्यांगनेनें आवडी, जें न सांडी सर्वथा. १०. अरुण संध्याराग दोन्ही,
मिनले बालार्कतेजाकिरणीं, कीं पद्मराग माणिकमणी, एकत्र पायीं पातले.
११. भूमंडळींचीं रातोत्पळें, रंग ओपितां सहपरिमळें, म्हणोनि चरणपद्मीं
पाणितळें, संवाहनितां रंगलीं. १२. चंद्रें शरीर कर्वतीं दिधलें, खंडूनि
केलीं दहा शकलें, पादांगुळीं जडोनि जाळें, नखमणी चंद्रासारिखे. १३.
ध्वज अंकुश वज्रपद्में, ऊर्ध्व रेखा अति उत्तमें, सामुद्रिकें पाहतां उपमे,
ठाव न दिसे द्यावया. १४. खंडी पापांचे पर्वत, तंचि वज्र सुशोभित,
पद्मचिन्हीं पद्मांकित, पद्मा वसे श्रियेसीं. १५. कीं चरणरूप नौका खरी,
हेळां तारी भव दुस्तरीं, ध्वजमंडित गुणसाजिरी, जीवनावरी जगातें. १६.
साधकांतें मनसंघट, लक्षोनि ऊर्ध्व रेखेची वाट, चहूं मूर्तींचे लंघोनि घाट,
निर्गुणब्रह्मीं मिसळती. १७. कीं श्रीकृष्णपादांबुजीं पवित्र, प्रयागराज
तीर्थक्षेत्र, मिनली त्रिवेणी एकत्र, प्रत्यक्ष नयनीं दिसताहे. १८. तळवे
आरक्त प्रवाळवर्णी, तेचि सरस्वती सिंदूरवर्णी, बाकी सोज्वळ देवतटिनी,
भागीरथी खळाळे. १९. तेथें जडले रक्तमणी, ह्याचि तपोधनांच्या श्रेणी,
ज्या देखतां नक्षत्रगणीं, देह धरणीं टाकिजे. २०. सुनीळ कालिंदीचे
ओघ, तेचि जानुद्वय अव्यंग, ध्वज अंकुश चिन्हीं चांग, अक्षयवटसंगमीं.
२१. योगियांचे मनोमराळ, स्वेच्छा क्रीडती सर्वकाळ, भक्त श्रद्धाळु प्रेमळ,
क्षेत्रवासी ते क्षेत्रीं. २२. प्रयागीं मोक्ष पाविजे मरणें, येथें मोक्ष पाविजे
श्रवणें, म्हणोनि कवीचें बोलणें, सांगे योग्य दृष्टांत. २३. इंद्रनील मणी
सुढाळ, तेवीं गुल्फद्वय वर्तुल, जानुजघन सुकुमार सरळ, स्तंभ गरुड पा-
चूचे. २४. मुक्तघालवी मनोहर, परिधान करविला पीतांबर, दुजा वैराणि-
याचा सुंदर, कनकवर्णी विराजे. २५. देखूनि अमृतघनसांवळा, उभय
विद्युल्लतेचा मेळा, त्यागोनि चंचलतेची लीला, निश्चल ठेला हरिरूपीं. २६
मखलेचे माणिकमणी, पंक्तिभोजना बैसले तरणी, मध्यान्हा येत ऊर्ध्व-

किरणीं, तुळोनि पाहे कौस्तुभा. २७. स्थूळ नितंब मध्यासना, देखोनि वैराग्यपंचानना, लाजोनि दुर्गेचिया वाहना, देह दुःखें दीधला. २८. कौस्तुभ सूर्याची नंदिनी, यमुना त्रिवली कृष्णवर्णी, ऊर्ध्वपंथीं हृदय-भुवनीं, भेटों आली दिसताहे. २९. हृदयीं धरोनियां मान, तथापि न सोडावे चरण, यालागीं आपादकंठलग्न, वैजयंती विराजे. ३०. श्रुतिसागरीं रत्नज्योती, कुंडल तळपती मकराकृती, नाना कविगुरु निरोपिती, विनंती सुरासुरांच्या. ३१. वदनचंद्राशीं सख्य परम, करावया कस्तुरीरूपें तम, मळवट झाला अति उत्तम, पुरुषोत्तम निजभाळीं. ३२. अंधकार चंद्रमा तरणी, मेळा अपूर्व एकस्थानीं, मुकुटकुंडलें व्यजनें दोन्हीं, वदनचंद्रीं कवळिले. ३३. अधरबिंब हिरेदशन, शुकनासिक विशाळ नयन, वदन सर्वानंदवर्धन, कोटिमदन सांडणें. ३४. बाहुवटे कीर्तिवदनें, जेथें फांकती प्रकाशकिरणें, करमुद्रिका करकंकणें, अभयदानें झळकती. ३५ यमुना-जळावरी जान्हवीजळ, धांवे जैसें शुद्ध धवळ, कीं नीळ गगनावरी सोज्वळ, पसरे निर्मळ चांदणें. ३६. तैसी पातळ चंदनउटी, तेणें शोभला कृष्ण जगजेठी, जवादी भरूनि पूर्णपुटीं, सुगंधचूर्ण उधळिलें. ३७. दीप कर्पूर नीरांजनें, फळ तांबूल शुद्ध सुमनें, सर्वभावें कुरुनंदनें, सर्वेश्वर पूजिला. ३८. उभयनेत्रीं भरूनि रूप, हृदयमंदिरीं रत्नदीप, निश्चय निर्वात निष्कंप, अखंडित ठेविला. ३९. काया वाचा मन धना, इंद्रियवृत्ती सांडोनि जाणा, पुष्पांजली कृष्णचरणा, धर्मराजें अर्पिल्या. ४०. अर्पूनि साळाहा उपचार, घातला दंडप्राय नमस्कार, मुखें करूनि जयजयकार, कृतकृत्यता मानली. ४१.

मुक्तेश्वर–महाभारत.

## ४१. भरताची बंधुप्रीति.

कैकेयीनें दुराग्रहानें दशरथापासून दोन वर मागून घेतले. एक रामाला १४ वर्षें वनवासाला धाडण्याचा व दुसरा भरताला राज्याभिषेक करविण्याचा. त्याप्रमाणें रामचंद्र, जानकी लक्ष्मण यांसह, वडिलांची आज्ञा घेऊन

वनांत निघून गेला. दशरथ रामविरहानें व्याकुळ होऊन मरण पावला. तेव्हां वसिष्ठानें भरत मातुलगृहीं होता त्याला अयोध्येला आणविलें. तेथें येतांच दशरथाच्या मृत्यूचें कारण त्यास समजलें. त्यानें रामाला वनवासाला धाडल्याबद्दल, आपल्या आईची अतिशय निर्भर्त्सना केली, कौसल्येचें सांत्वन केलें व आपण राज्यावर बसणार नाहीं असें वसिष्ठास सांगितलें. रामचंद्राची भेट घेण्याकरितां तो लागलाच त्याच्या मागोमाग निघाला. वसिष्ठ व राममाताहि त्याच्याबरोबर निघाल्या. शेवटीं रामाची व त्याची भेट झाली. परस्परांस पराकाष्ठेचा आनंद झाला. त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचे पूर लोटले; कंठ दाटून आले व अंगें रोमांचित झालीं! भरतानें अयोध्येला परत येण्याविषयीं रामाला अतिशय आग्रह केला, परंतु 'पित्याची आज्ञा मला मोडवत नाहीं, तेव्हां तूं या संकटांत मला घालूं नको.' असें रामानें त्यास सांगितलें. पण त्याला तें रुचलें नाहीं. त्यानें पुन्हां पुन्हां रामचंद्राची अयोध्येला परत जाण्याविषयीं विनवणी केली. पण रामानें तसें करतां येत नाहीं असें सांगितलें. शेवटीं भरताचा उपाय खुंटला. त्याच्या मनाला अतिशय वाईट वाटलें. त्यानें गंगातटावर मरण्याची तयारी केली! तेव्हां रामाच्या सूचनेवरून वसिष्ठानें भरताला सांगितलें, 'भरता, तूं प्राणत्याग करूं नको. रामाच्या हातून रावणवधाचें कार्य व्हावयाचें आहे. तेथपर्यंत रामाला अयोध्येला येतां येणार नाहीं. या गोष्टीला चौदा वर्षें लागतील. तोंपर्यंत तूं अयोध्येंत असावें. यावर, रामाचा मनोनिग्रह पाहून भरत म्हणाला, 'चौदा वर्षेंपर्यंत मी हा देह कसा तरी धारण करीन. परंतु रामाला एक दिवसाचा जर विलंब लागला तर मी अग्निकाष्ठें भक्षण करीन! अयोध्येच्या राज्याचें मी रक्षण करीन, परंतु मी नृपासनावर बसणार नाहीं. सिंहासनावर रामाच्या पादुका ठेवून रामाच्या नांवानें कारभार पाहीन.' असें म्हणून त्यानें रामाच्या पादुका घेतल्या व रामाची आज्ञा घेऊन अयोध्येस प्रयाण केलें. या उताऱ्यांत भरत वनांत निघाल्यापासून परत रामाच्या पादुका घेऊन अयोध्येस जाईपर्यंतचा कथाभाग आहे.

### श्लोक.

पायीं निघे भरत सानुज रामवाटे, रामाविणें इतर इष्ट न काम वाटे;
माथां जटामुकुट वल्कल नेसला हो! श्रीरामवेष वदनीं प्रभुनामलाहो. १

राम वल्कलजटादिक रीती, वेष तो उभय बंधु करीती,
राम सानुज तसें भरतातें, देखती सकल रामरतातें. २

तों भेटला गुहकनाम किरात वाटे, श्रीरामभक्त परमास तयास वाटे,
गंगातटीं रघुपतीशयनास दावी, ते भक्ति काय म्हणुनी मुखिं हो वदावी ?
दर्भनिर्मित तया शयनातें, देखतां उदक ये नयनातें,
भूतळीं भरत घालुनि घे हो, त्या स्थळींहुनि न चित्त निघे हो. ४
रामवृत्त रघुवंशवरातें, सर्व वर्णुनि गुहाख्य किरातें,
लंघुनी सुरनदी भरतातें, ने ससैन्य रघुराजरतातें. ५
ब्रह्मा रमा वंदिति नित्य ज्यातें, त्या राघवाच्या चरणांबुजातें,
पाहूं त्वरें हे भरता असोसी, वियोग तो प्राणवियोग सोसी. ६
कैकेयीच्या दुष्टभावें जळाला, इच्छी रामाच्या पदाच्या जळाला,
तों स्वामीच्या देखिलें आश्रमातें, कांहीं चित्तें टाकिलें हो श्रमातें.७
पादचिह्नित तये वसुधेतें, देखतां तृषित जेविं सुधेतें,
रामचंद्र पदसारसमुद्रा, वाढवी भरतसौख्यसमुद्रा. ८
तनुवरी गुढियाच उभारिती, कविमुखें किति वर्णिल भारती ?
भरत ये रितिनें अजि लोळला, प्रभुपदाब्जरजीं बहु घोळला ! ९
हा राम राम ! रघुनंदन ! हेंचि वाचे, चित्तांत ते चरण दीसति राघवाचे;
ते रेणु हे मुकुटमंडन जे शिवाचे, ऐसें म्हणे त्यजुनि भाव अहो जिवाचे. १०
भरत पदरजीं त्या घोळला दीर्घकाळ,
त्रिभुवनिंहि सुखाचा होय तेव्हां सुकाळ.
न मिळति पदरेणू जे विरिंच्यादिकांही
सुलभ मज म्हणे हें भाग्य माझेंचि कांहीं ! ११
वामअंकगत भूमिकुमारी, वामबाहु सुरता सुकुमारी,
वल्कलांबर जटा अभिरामा, देखतो भरत त्या रघुरामा १२
दूर्वादलश्यामलदीप्ति देहीं, सेवी पदें लक्ष्मण तो विदेही,
गंगातटीं सेवित मंदवातें, देखे अशा श्रीरघुपुंगवातें. १३
देखोनि ऐशा रघुनंदनातें, धांवे त्वरेनें पदवंदनातें,
अलभ्य जो हर्ष सुरादिकांही, तो होय त्यामाजिंच शोक कांहीं. १४

रडे फुंदफुंदे शिरीं पादपद्मा, धरी, सद्म मानी जया नित्य पद्मा,
बळें क्षेम दे त्यास ओढूनि राम, स्वभक्तप्रिय स्वामि विश्वाभिराम. १५
मांडियेउपरि बैसविला हो, अश्रुनीर पुसि, दे सुखलाहो,
' वांसरा ! न रड, सांग सुवार्ता,' शब्द हा निववि दुःखदवार्ता. १६
तों देखिला गुरु वसिष्ठ तयास वंदी, ब्रह्मण्य देव जडला चरणारविंदीं,
तों माउल्या तिघिहि सत्वर पावल्याहो, भेटोनिया तिघिहि सत्वर सेविल्या हो.
पिता सुखी कीं, म्हणतांचि रामा, रडोनि त्या सांगति सूपरामा,
रडे अहो ! रामहि लोकरीती, स्त्रिया पुन्हां शोक महा करीती. १८
सपिंडिक्रिया राम गंगेतटाकीं, करी आणि तो पिंड गंगेंत टाकी,
रडे, लोकदृष्टीस शोकश्रमातें, प्रभू दाउनी ये पुन्हा आश्रमातें. १९
तों वदे भरत गोष्टि मनाची, प्रार्थना बहुत आगमनाची,
मांडिली परि न राघव मानी, देखतां सुरवरांस विमानीं. २०
क्षणिं फिरे स्वपुरीप्रति राम हा, म्हणुनि आधिं मनीं अमरां महा,
भरतशब्द तदर्थ न ये मना, पुरवणें प्रभुला सुरकामना. २१
" आज्ञा पित्याची मज मोडवेना, वत्सा तुझी गोष्टिहि तोडवेना,
घालूं नको बा मज संकटांत, नको पडूं या सहसा हटांत." २२
असी आयके जेधवां रामवाणी, मुखश्री करी बंधु तो दीनवाणी,
म्हणे, तात ! आज्ञा मृगांकानना रे, मला सांग जाईन मी कानना रे" २३
" बापा ! ऐसें वर्ततां तों विशेषें, आज्ञाभंग प्राप्त दोघां अशेषें,
एवं राज्यातें तुवां रे भजावें, ताताज्ञेनें कानना म्यांच जावें." २४
येना असें भरत देखुनि रामराया, गंगातटीं रचुनि दर्भ, बसे मराया;
पाहे वसिष्ठमुनि वक्त्रसरोरुहातें श्रीराम, आणि खुण दाखवि हो स्वहातें.

कीं सांग गुह्य अवतारचरित्र याला,
जें तारितें चहुं युगांत जगत्त्रयाला;
बोले वसिष्ठ मग सन्निध जाउनीयां,
' कां प्राण टाकिसि ' म्हणे समजावुनीयां. २६

"हा राम मारील दशाननासी, यालागिं जातो प्रभु काननासी;
नको निवारूं भरता ! तयाला, ब्रह्मादिकांच्या पददातयाला. २७
येणार मागुति चतुर्दशवत्सरांतीं,
राहो वनांत तितके दिन आणि राती;
आत्माच तो, तुज वियोग तयासि नाहीं,
येऊनियां करिल जे तव कामनाही." २८
देखोनियां गमननिग्रह राघवाचा,
बोले उभा भरत निश्चयरूप वाचा;
"वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा,
त्यानंतरें त्यजिन, यास निरोप दे हा. २९
वर्षें द्विसप्तभरि काल समाप्त जाला,
त्यानंतरें अजि तुझ्या चरणांबुजाला;
स्पर्शें शिरें न जरि देह तयाच वारीं,
यातें त्यजीनचि विरिंचि जरी निवारी. ३०
वर्षें चतुर्दशहि रक्षिन शासनातें,
अंगीकरीन, न बसेन नृपासनातें;
सिंहासनावरि तुझ्या पदपादुका मी
पूजीन जों तव पदांबुजलाभकामी." ३१
पादुका जडित आणुनि हातें, रामचंद्रचरणांबुरुहातें;
लावुनी निजशिरीं भरतानें, वंदिल्या रघुवरांघ्रिरतानें. ३२
—वामनपंडित.

---

## ४२. सीता शिवधनुष्याचा घोडा करिते.

परशुराम एके वेळीं जनकराजाच्या घरीं पाहुणा गेला. तेव्हां त्याच्या बरोबर शिवधनुष्य होतें. तें त्यानें बाजूला ठेवून दिलें. पुढें जनकाचा पाहुणचार घेतल्यानंतर तो जावयाला निघाला. पण पहातो तों धनुष्य जागेवर नाहीं! तेव्हां परशुराम जनकावर रागावला. जनकाला वाईट वाटलें व मोठी चुटपुट

लागली! परशुरामासारखा कधीं न येणारा पाहुणा दैवयोगानें प्राप्त झाला असतां, त्याची आवडती वस्तु आपल्या घरांतून नाहींशी झाली, या गोष्टीचें त्यास राहून राहून सखेदाश्चर्य वाटलें. पुढें तो धनुष्याचा शोध करूं लागला, तेव्हां सीता धनुष्याचा घोडा करून त्यावर फेरफटका करीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें! त्यानें सीतेला लागलीच उचलून पोटाशीं धरिलें. जनकानें पुनः तें धनुष्य तिला दिलें व त्याच्यावर बसण्याला तिला सांगितलें. सीता लागलीच त्यावर बसली व दौडत दौडत पाहुण्यापुढें येऊन उभी राहिली! परशुराम हें पाहून चकित झाला! मोठ्या मोठ्या वीरांना सुद्धां जें कधीं हलावयाचें नाहीं तें धनुष्य सीतेनें लीलेनें इकडे तिकडे फिरविलें, तेव्हां ही कोणी तरी अलौकिक स्त्री आहे असें त्यानें जाणलें. 'ह्या मुलीला वर कोण योजला आहे?' असें परशुरामानें जनकाला विचारिलें. जनक म्हणाला, 'इचें स्वयंवर करणें आहे.' त्यावर परशुराम म्हणाला, 'तुझी मुलगी ही लोकोत्तर स्त्री आहे. हिला वर कोणी तरी महापुरुषच मिळाला पाहिजे. मी हें शिवधनुष्य येथेंच ठेवून जातों. हें धनुष्य जो उचलील त्याला तूं आपली कन्या अर्पण कर.' असें बोलून परशुराम निघून गेला. ही कथा या उताऱ्यांत आहे.

## ओंव्या.

परशुरामाचा निजमेढा, सीतेनें स्वयें करोनि घोडा, सीताचा करोनि वोढा, बाणाचा गाढा जाणा केला. १. त्या धनुष्यावरी बैसोनी, घोडा नाचवी राजांगणीं, स्वेच्छा क्रीडे राजभुवनीं, राजबिदींतुनि धावडी. २. ठेविलें ठायीं धनुष्यबाण, राम न देखे आपण, मग रायावरी कोपायमान, काय वचन बोलिला. ३. 'माझ्या धनुष्याची चोरी करी, ऐसा बळिया कोण क्षत्री, तुवां लपविलें आहे घरीं, तें झडकरी मज दावीं. ४. पांच शत महाविरीं, धनुष्य नुचले तिळभरीं, त्याची जेणें केली चोरी, तो झडकरी मज दावीं.' ५. ऐकून क्रूर रामवचन, राजा जनक कंपायमान, आजि मज आलें पूर्ण विघ्न, राम क्षेत्रज्ञ कोपला. ६. राजा त्या धनुष्याचा लाग, स्वयें गवसूं लागला चांग, राजांगणीं देखोनि रेघ, तोचि माग घेत आला. ७. तंव धनुष्याचा करोनि घोडा, सीता खेळत देखे पुढा, राजबिदीं घेतला

दवडा बालक्रीडा क्रीडत. ८. राजा म्हणे 'अकेगारी, हा त्वां अन्याय केला भारी,' ते धनुष्य सांडी क्षितिवरी, तें रायातें करीं उचलेना! ९. मग राजा अतिप्रीति करीं, सीतेतें पोटासि धरी, म्हणे 'बैस या घोड्यावरी,' ते हारिखें वरी बैसली. १०. करोनि धनुष्याचा घोडा, नाचवीत तडतडां, आली परशुरामापुढां, देखोनि गाढा तो विस्मित. ११. तो म्हणे 'ही आदि शक्ति, आणिका धनुष्य नुचलें हातीं, ईसी पुरुष होईल पति, आणिकासि प्राप्ति नव्हे इची.' १२. राम रायासी पुसे विचार, 'इसी कोण नेमिला वर?' तो म्हणे, 'नाहीं केला निर्धार, इचें स्वयंवर करणें आहे.' १३. 'स्वयंवरीं हाचि पण, जो धनुष्यासी वाहील गुण, त्यासीच द्यावी हे आपण,' आज्ञा संपूर्ण भार्गवाची. १४. तेणें सीतेच्या स्वयंवरासी, धनुष्य ठेविलें जनकापासी, जेणें धनुष्यें त्रिपुरासी, येके बाणेंसीं छेदिलें. १५. शिवें येणेंचि धनुष्येंसीं, विध्वंसिलें दक्षयागासी, पळवुनी सुरवरऋषी, यज्ञभागासी घेतले. १६. तेंचि शिवचाप घेवोनि करीं, येकवीस वेळां निक्षत्री, परशुरामें केली धरित्री, तें हें स्वयंवरीं ठेविलें चाप. १७. —एकनाथ—भावार्थरामायण.

## ४३. सुदामनगरी.

सुदामा नांवाचा एक ब्राह्मण श्रीकृष्णाचा गुरुबंधु होता. तो दारिद्र्यानें अतिशय गांजला होता. काय करावें हें त्याला सुचेना. एके दिवशीं त्याच्या बायकोनें त्याला म्हटलें, 'अहो श्रीकृष्ण तुमचा बाळपणचा जिवलग मित्र आहे. तो आतां द्वारकेचा राजा आहे. तेव्हां त्याच्याकडे जाऊन पहा. तो मनांत आल्यास आपलें दारिद्र्य एका क्षणांत दूर करील.' हें बायकोचें बोलणें ऐकून त्यानें कृष्णाला जाऊन भेटण्याचा निश्चय केला. सुदामा द्वारकेला निघाला तेव्हां कृष्णाला भेट म्हणून तीन मुठी पोहे त्याच्या बायकोनें त्याच्या पदरांत बांधून दिले. कृष्णानें सुदामजी आपल्या घरीं येतांच त्यास मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. त्याला कुशल प्रश्न विचारिले व त्याचा मोठ्या थाटानें पाहुणचार केला. सुदाम्यानें बरोबरचे पोहे कृष्णाला भेटीदाखल अर्पण केले.

ते खाऊन कृष्णाला जो आनंद झाला तो सांगतां पुरवत नाहीं. त्यानें आपल्या प्रेमळ, जुन्या व अठरा विश्वे दारिद्र्याच्या पाशांत सांपडलेल्या मित्राची झोंपडी एकदम एक प्रतिद्वारका अशी सुवर्णनगरी बनविली. पण ही गोष्ट त्यानें, सुदामजीला, तो त्या नगरीला जाईपर्यंत, समजूं दिली नाहीं. इकडे सुदाम्यानें कृष्णाचा निरोप घेतला. कृष्णानें आपला उत्तम सत्कार केला याबद्दल त्याला परम संतोष वाटला; पण आपल्या बायकामुलांची त्यानें कांहींच तजवीज केली नाहीं यामुळें त्यास अतिशय वाईट वाटलें. घरीं गेल्यावर बायकोला काय सांगावें, मुलें मोठ्या उत्कंठेनें वाट पहात असतील त्यांना काय द्यावें, अशा अनेक कल्पना मनांत येऊन तो फार कष्टी झाला व मार्ग चालूं लागला. पण पुढें बराच चालून गेल्यावर पहातो तों द्वारकेसारखी अत्यंत सुंदर अशी सोन्याची नगरी वसलेली! आपलें पूर्वींचें घर व थला दैन्याचा देखावा त्याला कोठेंच दिसेना. पुढें खरी गोष्ट त्याला समजली तेव्हां त्याचा हर्ष गगनांत मावेना. ही हकीकत सुदामजीनें आपल्या पत्नीला सांगितली आहे. प्रस्तुत उताऱ्यांत सुदामा द्वारकेहून परतल्यापासूनची कथा आहे.

### श्लोक.

"येतां द्वारवतीपुरीहुनि असा मार्गाकडे पाहत,
स्वांतीं श्रीपतिमूर्ति वाहत, निजप्रेमऱ्हदीं नाहत,
आलों स्वीयगृहाचिया निकट मी, जों दृष्टि केली वरी,
तेजःपुंजचि देखिली तंव पुढें तत्काळ हो सुंदरी! १
चकित विस्मित होउनि देखिलें, क्षण मनीं हरिचें पुर लेखिलें,
मग विचार बरा करुनी स्वयें, वळखिलें स्थळ कामिनि! निश्चयें. २
कूजत्पक्षिकुळाकुळें उपवनें, सर्वत्र साब्जें वनें,
क्रीडन्मदसुगंधशीतपवनें तापार्तसंजीवनें,
भास्वत्पावकचंद्रकांतिभवनें स्वर्गप्रभें पावनें
कांते! म्यां अवलोकिलीं सुरनिभ स्त्रीपुंसवृंदावनें. ३
'माझें हें स्थळ निश्चयें, परि असें झालें अकस्मात् कसें?
जेथें पर्णकुटीनिवेशन सदा, तें स्थान देवौकसें,'

ऐसें चिंतित मानसीं प्रियतमे ! होतों उभा विस्मित,
तों प्रत्युद्गमनार्थ नागरिक हे आले पुढें सस्मित. ४
आले देवसमान मानव पुढें, नारीहि देवीप्रभा,
जाणों भूमिवरि स्वयें उतरली साक्षात् सुरांची सभा,
नानावाद्यरवेंकरूनि सहसा व्योम प्रिये ! दाटलें,
मच्चित्तासि पतिव्रते ! शुभमते ! तें स्वप्नसें वाटलें. ५
आला मागधसूतबंदिगण जो, तेणें मला वानिलें,
नानोपायनपाणिनागरजनें भेटोनि सम्मानिलें,
कन्या साक्षतलाजपुष्पनिकरें माझ्या शिरीं वर्षल्या,
तैशा गायकपंक्ति गाउनि पुढें माझ्या पुरीं हर्षल्या. ६
कांते ! अत्युत्सवानें विनवुनि नमुनी जेंवि भूपोत्तमातें,
आले घेऊनि नारीनरजन नगरीमाजि पूजून मातें,
प्रासादद्वारदेशीं चकितचकित मी पावलों आग्रहानें,
होतों संभ्रांत तेव्हां गृहिणि ! बहुतर ग्रस्त जैसा ग्रहानें, ७
तों, पद्मांतुनि पद्मजा जशि निघे दिव्यांगशोभा सती,
येतां बाहिर मंदिरांतुनि तशी झालीस हो ! भासती,
दिव्यस्त्रीप्रतिमद्युतिप्रविलसद्दासीसहस्रस्तुता
तूं नीराजनपात्र घेउनि करीं आलीस आलीयुता. ८
जाये ! त्वां मज रत्नदीपनिकरें ओंवाळुनी आदरें,
हस्तातें धरुनि स्वयें निजकरें रोमांचितें सुंदरें,
गेहीं आणुनि बाष्पपूर्ण नयनें दिव्यासनीं स्थापिलें,
तावत्काळहि मन्मन प्रियतमे ! स्वप्नभ्रमें व्यापिलें. ९
स्फटिमरकताचिया भित्ति तेथें उभ्या कांचनी पुत्रिका,
तत्करीं रत्नदीपप्रभापुंज हे सूर्यसे भ्राजती;
शतामित मणिचे शुभ स्तंभ, मुक्ताफळीं निर्मिलीं दिव्य
विस्तीर्ण चंचद्वितानें गृहाभ्यंतरीं सर्वतः साजती. १०

व्यजनसहित चामरें स्वर्णदंडें नवीं, दान्त पर्यंक, शय्या
मृदु स्वच्छ, ज्यांला पयोराशिचे फेनही लाजती;
कनकविरचितासनें जेंवि भद्रासनें; निर्जरेंद्राचिया
मंदिरींच्या परी दासदासी सुरम्याकृती राजती. ११
यापरि दिव्य समृद्धि विलोकुनि सुंदरि! अंतरिं कौतुक झालें,
कीं मज नित्य दरिद्रतमास कसें सहसा सुखवैभव आलें!
हाचि विचार मनीं करितां, मग संशयजाळ पळांत पळालें,
जों स्वजनामरवृक्षरमावरदर्शनभाग्यनिदान कळालें. १२

मोरोपंत—सुदामचरित्र.

---

## ४४. वैराग्यवचनें.

### श्लोक.

अभिज्ञांस तों ग्रासिलें मत्सरानें, धनाढ्य प्रभु व्यापिले दुर्मदानें;
शिरीं थोर मूर्खांस अज्ञान ओझें; जिरालें निजांगींच पांडित्य माझें. १
कांहीं द्रव्य असेल कीं उकरिली म्यां या भ्रमें ही मही;
राजेही बहु सेविलेचि; गिरिचे म्यां जाळिले धातुही;
रात्रीं मंत्रजपें स्मशान धरिलें; पायोधि उल्लंघिला;
झाली प्राप्त कपर्दिका न मज तों, सोडीं दुराशे! मला. २
म्यां साहिली खलजनोक्ति कठोर पाहीं, पोटांत दुःख वरिचेवरि हांसलोंही,
कीं प्रार्थिलें स्वजठरार्थ मदान्ध लोकां, आशेअशीच मज नाचविशी कितीकां
दिसे ज्या प्राणांची स्थिति जलजपत्रोदक जसें,
तयांसाठीं केलें विविध बहु म्यां पातक असें;
पुढें द्रव्याढ्यांच्या प्रचुरधनलोभास्तव वृथा,
विलज्जें म्यां केली बहुतर मृषात्मस्तुतिकथा. ४
वदना रदनावलिनें त्यजिलें, शिर सर्वहि शुभ्रपणें पिकलें,
उठतां बसतां अणु शक्ति नसे, परि आस निरंतर गाजतसे. ५

आशा थोर नदी, मनोरथ तिचें पानीय, वीची तृषा,
स्त्रीपुत्राद्यनुराग हीं जलचरें जे पूर्ण कूलंकषा,
संसारभ्रम भोंवरा गरगरी, चिंताच जीचीं तटें,
तीतें जे तरले मुनीश, न कधीं ते पावती संकटें. ६
गंगेनें स्वतरंगसुंदरकणीं जीं भोंवतीं शिंपिलीं,
जीं का चारुशिलातलीं बसुनियां विद्याधरीं सेविलीं,
स्थानें काय हिमाद्रिचीं क्षयदशा तीं सर्वही पावलीं ?
कीं पोटें अपमानपूर्वक नरीं अन्यालयीं पोशिलीं ? ७
ते कंद काय अवघेचि गळोनि गेले ?
किंवा प्रवाह नदिचे अतिशुष्क झाले ?
कीं वाण आजि विपिनीं तरुवल्कलांची ?
कां पाहताति वदनें न कळे खळांचीं ? ८
होती वासर दीर्घ जे धनपतिद्वारीं तयां प्रार्थितां,
नानासौख्यभरें क्षणोपम मला जे लोटले नेणतां;
निःसंगत्वपणें धरूनि बसलों हे पर्वताची गुहा,
आतां त्या दिवसांसि हांसत असें ध्यानावसानीं पहा ! ९
गेला तो नृप, ते प्रधान अवघे, ते पंडितांची सभा,
गेली ते नगरी, तशा शशिमुखी ज्या तप्तहेमप्रभा,
गेला तो नृपपुत्र, त्या शुभकथा, म्यां देखिलें सर्व जें,
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें, कालासि त्या वंदिजे. १०
गतीनें सूर्याच्या पलपलपणें माप भरतें,
नसे व्यासंगानें दिवसरजनीज्ञान पुरतें;
जगीं पाहें दुःखें विविध, नुपजे त्रासहि जरा,
कशी या लोकांला बहुत चढली मोहमदिरा ? ११
येतो वासर तोच, तेचि रजनी, व्यापार नानापरी
प्राणी हे करिताति, आयु सरतें हें नेणवे अंतरीं;

तुच्छें चर्वितचर्वणोपमसुखें जीं, तींच तीं भोगितां,
संसारीं विकृतिप्रसंग नुपजे, हे कोण निर्लज्जता! १२
तूं राजा जरि, मी श्रुतिस्मृतिमहाविद्याभिमानी असें,
भाग्यें विश्रुत तूं, मदीय कवितासत्कीर्ति लोकीं वसे,
आहे अंतर फार तूज मज रे! तूं गर्व जे दाविशी.
मीही निस्पृह, भाग्यवंतगणना नाहीं मला फारशी! १३
गगनीं रजनीस शशी विलसे, दिवसा रवि त्या स्थलिं नांदतसे,
उदयास्त अशांस न हे चुकती, स्थिर मानितसे जन हा कुमती! १४
जधीं कांहीं कांहीं 'हरि कवि' असे शब्द शिकलों,
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों,
जधीं 'कांहीं नेणे' म्हणुनि वदले पंडित मला,
तदा माझा गर्वज्वर सकलही हा उतरला. १५
गेला मान जगांत, भाग्य सरलें, भृत्यादिकीं सोडिलें,
झाले याचकही पराङ्मुख घरा, तारुण्यही लोटलें,
सुज्ञांहीं मग युक्त हेंचि करणें, कीं जह्नुकन्यातटीं
सेवावा बरवा निकुंज गिरिचा, किंवा गुहा गोमटी. १६
हिमाचलशिलेवरी सुरनदीतटीं बैसुनी,
त्यजूनि जनसंगती सुदृढबंधपद्मासनीं,
सुखेंकरुनि डोलतां प्रचुरयोगनिद्राभरें
कधीं डवचिती मला हरिणपोत शृंगांकुरें? १७
स्वर्गापासुनि शर्वमस्तकतटीं, तेथूनिया भूधरीं,
ग्रावाग्राहुनि भूतलीं उतरली ते स्वर्णदी सत्वरीं;
गेली तेथुनि अर्णवाप्रति मदें, ते वंद्यही कष्टली,
जे का दुर्मद त्यां अधःपतनता आहे बरी निर्मिली. १८
लक्ष्मीनें जरि तुष्ट तूं, बहुसुखी मी वल्कलानें असें;
दोघांचा परितोष तुल्य असतां आधिक्य कांहीं नसे;
आशा ज्यास, दरिद्र तोचि समजे, नैराश्य पैं बाणतां,

भाग्याचा नर कोणता मग बरें? निर्भाग्य तो कोणता? १९

ज्यांचें पात्र पवित्र पाणियुग हें, भिक्षान्न जे भक्षिती,
ज्यांचें वस्त्र दिशा, जयां मल नसे, शय्या जयांची क्षिती,
ज्यांला दैन्य नसे, विरक्ति वनिता, जे तीसवें नांदती,
ज्यांला कर्मकलाप बाधत नसे, ते धन्य येणें रिती. २०

माते मेदिनि! मारुता स्वजनका! तेजा सख्या सोदरा!
तोया आणि नभा! तुम्हां नमितसें जोडूनि भावें करा;
जालें ज्ञान भवत्कृपेस्तव मला, आतां पहा सत्वरीं,
ब्रह्मीं मी मिळतों, जळीं समरसें वर्षोत्पलांचे परी. २१

जों हे स्वस्थ तनू, जरा वसतसे जों दूर, जों इंद्रियें
शक्तें, कीं सरलें न आयु पुरतें जों, पंडितानें स्वयें
आत्मप्राप्तिसुखार्थ यत्न करणें कीं तोंच हो फारसा,
होतां मंदिर दीप्त कूपखननीं उद्योग तो कायसा? २२

वामनपंडित–वैराग्यशतक.

---

## ४५. पूर्वग्रंथकारांस प्रणामांजलि.

### ओंव्या.

समस्त कवींस नमस्कार, जो जगद्गुरु आचार्य शंकर, जेणें मतें उच्छेदोनि समग्र, शुद्ध मार्ग वाढविला. १. सकळ मतवादी द्ररिद्री, शंकर समर्थ पृथ्वीवरी, संन्यासदीक्षा निर्धारी, स्थापिली जेणें विधियुक्त. २. अवघे मतवादी रजनीचर, शंकर त्यांवरी रघुवीर, कीं कौरव वधावया यादवेंद्र, अति उदित साक्षेपें. ३. तैसा शंकराचार्य सकल, कुमतें छेदी तत्काल, त्या आचार्यांचें पदकमल, श्रीधरभ्रमरें वंदिलें. ४. श्रीधराचार्य टीकाकार, त्यांसी नमस्कारी श्रीधर, मधुसूदनादिक कवींद्र, ग्रंथ अपार जयांचे. ५. जो शृंगारवनींचा विहंगम जाण, तो जयदेव पद्मावतीरमण, त्याची काव्यरचना पाहून, पंडितजन तटस्थ. ६. जो वेदांतक्षीरार्णवींचा मीन, जेणें

ग्रा. क्र. ९३२९

विवेकसिंधु रचिला पूर्ण, तो मुकुंदराज गुणनिधान, तयाचे चरण वंदिले. ७. तारावया जन समग्र, पुन्हां अवतरला रामावतार, गीतार्थ केला साचार, तो ज्ञानेश्वर जगद्गुरु. ८. जो भानुदास कुलभूषण, प्रतिष्ठानवासी परिपूर्ण, त्या एकनाथें ग्रंथ संपूर्ण, बहुसाळ कथियेले. ९. जे चातुर्यराजधानीचे कळस, मुक्तेश्वर मुद्गलदास, ज्यांचे ग्रंथ पाहतां सुरस, ब्रह्मानंद उचंबळे. १०. जैसे चंडांशु व्योमीं, तैसेचि केवळ वामनस्वामी, ज्यांची श्लोकरचना या भूमी,—मंडळावरी अपूर्व. ११. कृष्णदास जयराम, जो शांतिदयेचें निजधाम, ज्याचे ग्रंथ ज्ञानभरित परम, जो निःसीम ब्रह्मचारी. १२. श्रीरामउपासक निर्मळ, जो भक्तसरोवरींचा मराळ, तो रामदास महाराज केवळ, भक्ति प्रबळ लावी जना. ११. ब्रह्मानंदस्वामीचा बंधु सत्य, नाम तयाचें श्रीरंगनाथ, ज्याची कविता समस्त, ऐकतां जन उद्धरले. १४. असो; आतां समस्त कविवर, अवघे ब्रह्मानंदरूप साचार, त्यांसी अनन्यशरण श्रीधर, द्यावा वर ग्रंथासी. १५

श्रीधर—रामविजय.

---

## ४६. दुर्योधनाचा मानीपणा.

भीमानें गदा मारून दुर्योधनाची मांडी मोडून टाकली. त्यामुळें तो समरांगणावर धुळींत तळमळत पडला. त्या वेळीं त्यानें शेवटचे उद्गार काढिले. त्याला मरणाबद्दल मुळींच वाईट वाटलें नाहीं. रणभूमीवर आपणांस मरण प्राप्त झालें यामुळें त्यास उलट मोठा आनंद वाटला. त्यानें आपल्याजवळ असणाऱ्या सूताबरोबर आपल्या मातापितरांस व इष्टमित्रांस सांत्वनपर निरोप पाठविला. अशा रीतीनें दुर्योधन रणभूमीवर मरणोन्मुख पडला असतां त्याचा शोध करीत कृप, अश्वत्थामा आणि भोज असे तिघे त्याच्या जवळ आले. दुर्योधनाची अत्यंत अनुकंपनीय स्थिति पाहून या तिघांना फार खेद वाटला. अश्वत्थाम्यानें दुर्योधनाशीं थोडा वेळ भाषण केलें व त्याच्याविषयीं आपली सहानुभूति व्यक्त केली. दुर्योधनानें त्या तिघांचें समाधान केलें व कृपाचार्यांच्या आग्रहावरून अश्वत्थाम्याला सेनापतीचीं वस्त्रें दिलीं. अश्वत्थाम्यानें पांडवांचा

निःपात करण्याची प्रतिज्ञा केली. यानंतर ते तिघेही दुर्योधनाचा निरोप घेऊन चालते झाले. हा कथाभाग खालच्या उताऱ्यांत आला आहे.

**गीतिच्छंद.**

धृतराष्ट्र म्हणे, 'सूता! भीमानें मस्तकीं दिला पाय,
भग्नोरु पांडवाहित मानी मत्पुत्र बोलिला काय?' १
सूत म्हणे, "काय पुससि! ज्याचें न कधींहि पादतळ मळलें,
तें राजरत्न तैसें जैसें धूळींत याद तळमळलें! २
ज्याच्या अंगीं अयुतद्विपबळ ऐसा समर्थ लोकेश,
जो परशतनियमनपटु नियमी कष्टेंकरूनि तो केश. ३
रडत मजकडे पाहुनि निंदुनि धर्मासि सोडुनि श्वास,
वदला भूप असें कीं न धरावा साधुचाहि विश्वास. ४
भीष्म द्रोण जयद्रथ मद्रप भूरिश्रवा कृपाचार्य
शकुनी अश्वत्थामा कृतवर्मा कर्ण वीरवर आर्य ५
हे सर्व नाथ होते तरिहि अवस्था पहा कसी झाली!
'दुरतिक्रम काळ' असी वृद्धोक्ति, तिची प्रतीति मज आली. ६
एकादश सेनापति मी या कुदशेसि पावलों आजी
काळापुढें तृणचि तो शक्रशतासींहि करिल जो आजी. ७
लंघुनि समय, गदेनें भीमें केलें मदूरुयुगमथन,
असतील वांचले जे त्यांसि करावें असें तुवां कथन. ८
कपटें श्रीभीष्मप्रभु गुरुहि जयद्रथहि पांडुतनयांहीं,
भूरिश्रवाहि कर्णहि मथिला बहु साधु शूरजन यांहीं ९
मोडुनि मदूरु, पाडुनि मज, माझें मर्दिलें शिर पदानें,
यापरिस चित्र दुसरें काय करावें अधार्मिकमदानें. १०
तातातें मातेतें नमुनि असें सांग संजया बा कीं,
केलें राज्य अकंटक पुष्कळ सुख भोगिलें जसें नाकीं. ११
विष्णुपदीं पिंड तसा शत्रुशिरीं पाय देय जो डावा,
तो म्यां दिला अधिक याहुनि जन्मुनि अर्थ काय जोडावा १२

होउनि पराजित परप्रेष्य न मी जाहलों न हें थोडें,
अरिहृतपदोपजीवन खाजाविलें जेविं आपुलें घोडें. १३
आमरण पांडवांशीं माझा निर्विघ्न चालला दावा,
दैवें सुपुरुषपुंगव अभिमानभरें असाचि लादावा. १४
सुक्षत्रियासि जी गति बहुमान्या तीच हे मला घडली,
तनु मनुपूत घृताहुनि मखशिखिकुंडीं तसी रणीं पडली. १५
शस्त्रें विषें वधावा जैसा सुप्त प्रमत्त अनयानें;
वधिला तसा अधर्में हा तेजस्वींद्र पांडुतनयानें, १६
या छळवधें परांचें दुर्यश, माझें जगीं सुयश झालें,
आजन्मसदाचारें यावें तें सुफळ शेवटीं झालें. १७
कृप कृतवर्मा अश्वत्थामा यांतें निरोप सांग असा,
पांडव खळच्छळबळें वध करितिल फार सावधान असा. १८
गुरु सुत बंधु सुहृज्जन गेले स्वर्गासि सर्वही नीट,
मीहि निघालों; आला प्रांतविरस विषय समजतां वीट. १९
व्याकुल होइल माता तातसुनांच्या सदा विलापानें,
शोकें बहु, न विषाच्या बहु ताप त्रास दाविला पानें. २०
पतिबंधुलयें दीना होइल धीरा पर स्वसा माजी,
मज मायसी म्हणे, बा कर गा देउनि परस्व, सामा जी. २१
होईल लक्ष्मणाची बहुधा पृथुलोचना प्रसू नाहीं,
वज्रप्रहार सोसिल कसि ? व्हावी मूर्छिता प्रसूनांहीं २२
जरि काय वाग्विशारद येता चार्वाक, बहु बरें होतें,
करितां अपचिति माझी दुःसाध्यहि कार्य साधिता हो तें" २३
ऐसे विलाप बहुविध केले, सांगों नृपा किती काय,
बहु जन ऐकुनि रडले, पडले शोकांत, बोलिले हाय. २४
सचराचरा धराही त्या समयीं कांपली नरवरा हे,
लोक पळे मृगहि खगहि ऐकुनि तन्निकट तो न रव राहे. २५

अश्वत्थाम्यातें तो युद्धव्यवहार त्या जनें कथिला,
कीं भीमें ऊरुद्वय भंगूनि गदायुधें नृपति मथिला. २६
भोज कृप द्रौणि तिघे आले धांवोनि शोणित वहात,
मनिं म्हणति खळा भीमा, कैसा धरिला न कोणिं तव हात? २७
धांवडिले सूतांहीं त्या वीरांचे महाजवन वाजी,
होते क्षतार्त परि ते दाखविति प्रतिपदीं जव नवा जी. २८
येउनि विलोकिला कुरुराज तिहीं प्रमथितोरु पतित रणीं,
हरिहत गज कीं राहुग्रस्त समस्तग्रहाधिपति तरणी! २९
भूतक्रव्यादांहीं परिवृत सर्वत्र उग्रकृत्यांहीं,
तो दुर्योधन भूपतिसत्तम जैसा धनार्थिभृत्यांहीं. ३०
मोह तिघांसहि झाला त्यां ती कष्टा दशा पहावेना.
सर्वस्वहानि सोसे, प्रभुहानि कुळजमना सहावेना. ३१
उतरुनि रथावरुनि ते बसले कुरुपतिसमीप वीर तिघे,
तन्मति तसी जसी पतिदाहीं दुःसह दशा नवी रति घे. ३२
वसतां समीप आला त्या धीरांलाहि हुंडका राजा,
तो ताप काय सांगों, जोडी कर अग्निकुंडकारा ज्या. ३३
द्रौणि म्हणे, 'हा! किमपि न यश आलें आमुच्या धनुष्यातें,
बहुधा सहाय होउनि यश द्यावें हें नव्हे मनुष्यातें. ३४
नसतें असें तरि तुझी होती राजा, असी दशा कां गा?
लागावी कस्तूरी पुष्कळ, त्या धूळि लागली आंगा. ३५
त्यास क्रव्याद जपति, होते बहु जपत ज्या सदा ज्ञाती,
गेली कोठें गा ती शक्राचीशी तुझी सदाज्ञा ती. ३६
दुःशासनादि सोदर कोठें? कोठें तुझा सखा कर्ण?
कोठें शकुनि जयद्रथ? ज्या भाग्य तुझें जसें झषा अर्ण. ३७
कोठें छत्र तुझें तें? बा केलीं आजि काय तीं चवरें
गमति उतरलीं विधिच्या जीं गगनांतूनि आयतींच वरें. ३८

चपळा श्री हें सत्य, प्रत्यय आला मनास, न च खोटा
रविसा कवि साधुमहित दाटुनि लावील दोष न चखोटा' ३९
नेत्र पुसुनि सर्वांतें भूप म्हणे, 'शोक काय हो याचा,
मर्त्यांचा केव्हां तरि भस्मचि विपदोक काय होयाचा. ४०
तरि होता घात' जरि व्यसनीं सांभाळितों न टेंकेला,
मानी हांसुनि म्हणते मज वीराभिनय या नटें केला. ४१
पडला शात्रवशस्त्रें समरांत स्यमंतपंचकीं काय,
कां करितां शोक, उगे पडलों रोगार्त मंचकीं काय! ४२
पावे अनंतसुकृतें क्षत्रिय समरांत कायहानि बरा,
होइल वांचोनि सुचिर रुचिरगृहीं लाभ काय हा निबरा. ४३
उरलें तेज अधर्मे वधिला धार्मिक पुरें बरें झालें,
आलें मनास माझ्या तीक्ष्णहि परि पथ्य हें जसें आलें. ४४
मेलों बहुभाग्याचा मी निहतज्ञातिबांधव स्पष्ट;
उरतों शोकें झुरतों स्वजनवियोगा असे नसे कष्ट. ४५
धर्मभ्रष्ट न झालों हा कृष्णाचा प्रभाव, न दुज्याचा,
पूर्वज वसिष्ठनामा सन्महितयशा तसाचि यदु ज्याचा. ४६
उरलां प्रलयांत तिघे, झालें प्रिय परम आजि हें माजें,
द्याया अशक्य सदमृतरसपाना मेरुतुल्य हेमा जें. ४७
मज जय जोडुनि द्याया यत्न तुम्हीं साधुनीं भला केला,
दुरतिक्रमा नियति जनकातिला मुनिदृष्टि जसि वलाकेला. ४८
न करावा शोक तुम्हीं अवलोकुनि हे असी दशा माजी,
वेद प्रमाण जरि, तरि म्यां अक्षय लोक जिंकिले आजी.' ४९
ऐसी वदोनि वाणी आणी पाणी नृपाळ नयनांत,
लोळे रजांत निजतो मृदुलपय:फेनशुभ्रशयनांत. ५०
द्रौणि बहु रडोनि म्हणे, 'मज लोकांला न दाखवे वदन,
दे आज्ञा यां सकळां पांचाळांचें करावया कदन. ५१

वधिला कपट करुनि गुरुवर्य त्रैलोक्यमान्य अधमांनीं
ऋजुयोधी तूंहि प्रभु झालासि तसाचि लब्धवध मानीं. ५२
धर्में वधिते तरि मज न तुझ्या बहु शोक बाणता पातें,
देता शिरोनि हृदयीं न असा विषदिग्ध बाण तापातें. ५३
न तसा स्वतातघातें झालों मी तप्त जेविं तव घातें,
शिशुसख्य आमुचें जें जाणे क्षितिवरिल लोक अवघा तें. ५४
कृष्णसमक्ष परांतें प्रेषीन प्रेतराजभवना मी,
अरिलयबळ मच्छस्त्रीं अघलयसामर्थ्य जेंवि भवनामीं. ५५
आहेसि योग्य आज्ञा द्याया, ऋण आजि सर्व वारीन,
त्या तातघातकातें मी सर्व उपाय करुनि मारीन. ५६
गुरुपुत्रपणश्रवणें बहुताचि तो मानिवर्य सुख पावे,
आलें मनास, कोण व्यसनीं न म्हणेल अर्यसु खपावे. ५७
नृप कृपमुखाकडे अवलोकूनि म्हणे, 'अहो उठा तूर्ण,
आचार्य तुम्हीं येथें आणावा कलश करुनि जलपूर्ण. ५८
जलपूर्ण कलश घेउनि येतां त्यांतें म्हणे नृप, 'प्राज्ञा,
अभिषेक द्रौणिशिरीं शीघ्र करीं, म्यां दिली तुला आज्ञा. ५९
मत्प्रिय इच्छित अससिल तरि आग्रह या करूं नको कार्या,
अभिषेक करुनि सेनापति तूर्ण द्रौणिला करीं आर्या. ६०
राजनियोगें विप्रें युद्ध करावें धरूनि चापातें,
वेदज्ञ असें वदती, जाणसि तूंही समग्र बापा तें. ६१
अभिषेकिला कृपानें दुर्योधनचित्तरंजना भाचा,
पावकितें आभिषेची पूर्वी सुत जेंवि कंजनाभाचा. ६२
अभिषिक्त द्रौणि नृपा आलिंगुनियां सुयोधना सिद्ध
होय. निघे गर्जुनि, तृण भस्म कराया शिखी जसा इद्ध. ६३
गेले तिघेहि देउनि आपुलिया लाज तळमळ तपातें,
धूळींत मीनसा बहु होता कुरुराज तळमळत पातें. ६४

मोरोपंत—महाभारत.

---

## ४७. सज्जनप्रशंसा.

### ओंव्या.

आतां वंदीन संतसज्जन, जे परमार्थाचें अधिष्ठान, जयांचेनि गुह्य-ज्ञान, प्रगटे जनीं. १. जेथ आक्षेप आटले, जेथें प्रयत्न पस्तावले, जेथें तर्क मंदावले, तर्कितां निजवस्तूसी. २. वळे, विवेकाची वेगडी, पडे शब्दाची बोबडी, जेथें मनाची तातडी, कामा न ये. ३. तेंचि वस्तु संतसंगें, स्वानुभवें कळों लागे, त्याचा महिमा वचनीं सांगें, ऐसा कवण ? ४. संत आनंदाचें स्थळ, संत सुखाचि केवळ, नानासंतोषाचें मूळ, ते हे संत. ५. संत विश्रांतीची विश्रांती, संत तृप्तीची निजतृप्ती, नातरी भक्तीची फलश्रुति, ते हे संत. ६. संत धर्माचें क्षेत्र, संत स्वरूपाचें सत्पात्र, नातरी पुण्याची पवित्र, पुण्यभूमि. ७. संत समाधीचें मंदिर, संत विवेकाचें भांडार, नातरी बोलिजे माहेर, सायुज्यमुक्तीचें. ८. मोक्ष-श्रिया अलंकृत, ऐसे हे संत श्रीमंत, जीव दरिद्री असंख्यात, नृपति केले. ९. महाराजे चक्रवर्ती, झाले आहेत पुढें होती, परंतु कोणी सायुज्य-मुक्ति, देणार नाहीं. १०. ऐसा संतांचा महिमा, बोलिजे तितुकी उणी उपमा, जयांचेनि मुख्य परमात्मा प्रगट होय.

रामदास—दासबोध.

---

## ४८. संकीर्ण अभंग.

सोईरे धाइरे दिल्याघेतल्याचे, अंत हे काळींचें कोणी नाहीं. १
सख्या गोत्र बहिणी सुखाच्या सांगाती, मोकलोनी देती अंतकाळीं. २
आपुलें शरीर आपणा पारिखें, परावीं होतील नवल काई ? ३
भाव धरी तया तारील पाषाण, दुर्जना सज्जन काय करी ? १
करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ, खापरा परीस काय करी ? २
काय कारलीया साखरेचें आळें, बीज तैसीं फळें येती तया. ३
तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ, कठिण हा खळ तयाहूनी. ४

शूकरासी विष्ठा माने सावकाश, मिष्टान्नाची त्यास काय गोडी ! १
तेविं अभक्तांसी आवडे पाखांड, नलगे त्यां गोड परमार्थ. २
श्वानासी भोजन दिलें पंचामृत, तरी त्याचें चित्त हाडावरी. ३
तुका म्हणे सर्पा पाजिलीया क्षीर, वमितां विखार विष झालें. ४
माणि पडिला दाढेसि मकरतोंडीं, सुखें हस्तेंची काढवेल प्रौढी १
परि मूर्खाचें चित्त बोधवेना, दुधें कूर्मीच्या पाळवेल सेना. २
सकळ पृथ्वी हिंडतां कदाचीतें, ससीसिंगाची प्राप्ति होय तेथें. ३
अतिप्रेत्नें गाळितां वाळुवेतें, दिव्य तेलाची प्राप्ति होय तेथें. ४
अतिक्रोधें खवळला मणी पाहीं, धरूं येतो मस्तकीं पुष्पप्रायी. ५

तुकाराम–गाथा.

## ४९. भक्ताचा टाहो.

### श्लोक.

सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा !
स्वदासवशमानसा ! कलिमलांतका ! कामदा !
वदान्यजनसद्गुरो ! प्रशमितामितासन्मदा !
गदारिदरनंदकांबुजधरा ! नमस्ते सदा. १
व्रजावन करावया बसविलें नखाग्रीं धरा,
सलील तइं मंदराख्यहि नग स्वपृष्ठीं धरा,
वराहतनु घेउनी उचलिली रदाग्रें धरा,
सुदुर्धर तुम्हां कसा पतित हा ? न कां उद्धरा ? २
नतावनधृतव्रत ! ज्वलन तूंचि बाधावनीं,
पदप्रणतसंकटीं प्रजव तूंचि बा ! धावनीं,
दया प्रकट दाखवी कवण सांग त्या वारणीं ?
सतीव्यसनवारणीं ? जयजयार्थ त्या वा रणीं ? ३
मला निरखितां भवच्चरणकन्यका आपगा
म्हणे, 'अगइ ! ऐकिलेंहि न कधीं असें पाप !' गा;

कर श्रवणिं ठेवि ते, नुघडि नेत्र, घे भीतिला,
  न घालिन भिडेस मी जरिहि कार्यलोभी तिला. ४
पटुत्व सकलेंद्रियीं, मनुजता, सुवंशीं जनी,
  द्विजत्वहि दिलें भलें, बहु अलभ्य जें कीं जनीं;
यशःश्रवणकीर्तनीं रुचि दिली, तरी हा 'वरा'
  म्हणे, 'अधिक द्याच कीं,' अखिल याचकीं हावरा! ५
दयाब्द! वळशील तूं तरि न चातकां सेवकां
  उणें किमपि; भाविकां उबगशील तूं देव कां?
अनन्यगतिका जना निरखितांचि सोपद्रवा,
  तुझेंचि करुणार्णवा! मन धरी उमोप द्रवा. ६
कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावा नळीं,
  तयांत अविशुद्ध मी, शलभ जेविं दावानळीं;
व्रणार्त पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे
  स्मरादि रिपु मन्मनीं; अहि न काळ भेका कसे? ७
जिर्णे रस पहावया प्रशिथिलीं रदीं चाविलीं,
  सुवासहि कळावया प्रथम नासिकीं लाविलीं;
तुम्हांसि शबरी तशीं बदरिकाफळें दे, जुनी
  कथा असि, असो, पहा स्वचरितें तुम्हीं मेजुनी. ८
चिकित्सक भला भला म्हणुनि फार वाखाणिला,
  जरी बहुजनामयद्रुम समूळही खाणिला;
तथापि अतिदुःसहस्वगदशत्रुच्या अत्यया
  विना न हृदयीं धरी सरुज पामर प्रत्यया. ९
'भले परिशिले सुरासुरनरीं तसे लक्ष मीं,'
  म्हणोत म्हणणार वा! तुज असा नसेल क्षमी
उरीं भृगुपदाहती मिरवितोसि, अद्यापि ती
  कवी तव यशःकथा नवसुधानवद्या पिती. १०
तुझ्या गुणकथा महासुरभि, त्यांत ही रासभीं
  शिरे विषयवासना, जसि शुका अहीरास भीं;

तशी न इतरांसि मी इस सदंडही हाकिती,
तथापि बहु लाथळी; मग अदंड मी हा किती? ११
कथासुरभि या भल्या स्वजननींहुनी वाटती,
शिशूंस जरठांसही निरखितां रसें दाटती;
दुहोत भुलते सदा तरि न लेशही आटती,
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा बाटती. १२
ध्रुव स्तवनिं आवडी धरि म्हणोन अत्यादरें
तुम्हीं करुनि दाविली शिवुनि गल्ल सत्या दरें.
तसें मज करा, करांबुज धरा शिरीं मावरा!
वराभयपरा! पराक्रमपटो! मना आंवरा. १३
करांबुज असो; नसे उचित त्यास मी पामर,
प्रणाम करिती पदाप्रतिहि सन्मुनी सामर,
पदाब्जरजही जगत्त्रयनमस्क्रियाभाजन,
प्रसादचतुरा! कसा तरि करा बरा हा जन. १४
किती वय! कसें तप प्रखर! काय विश्वास तो!
ध्रुव ध्रुव खरा; स्तवा उचित होय विश्वास तो.
कशी तुळितसां तुम्ही प्रकट मेरुशीं मोहरी?
प्रसाद करितां उणें अधिक नाठवा हो हरी! १५
तुम्हांसमचि हें, गुणें अणु उणें नसे नाम, हा
दिसे अधिकही तसा गुण तुला असेना महा;
सदैव भलत्यासही सुलभ; आणखी गायका
छळी न, न अधोगति क्षणहि ते जगन्नायका! १६
छळाल कृपणासि कां? अजि दयानिधे! कांपिती
भटांसि भट संगरीं; परि न कातरां दापिती;
कराल तितुकी कृपा बहु, अहो शरण्या! तमीं
बुडोनि शरणागत श्रमतसे अरण्यांत मी १७
मुखासि जंव पातलीं 'श्रम' 'अरण्य' ऐसीं पदें
निजस्मृतिस जाहलीं विषय तीं तव श्रीपदें;

गुरूक्तिस करावया सफळ जानकीजीवना !
धरासुरतपःफळें त्वरित धांवलीं जीं वना. १८
तईं प्रभुवरा ! तसे सदय, कां असे आज हो !
विचारुनि पहा बरें निजमनीं महाराज हो !
वनोवनिं फिरा पिशापरि; म्हणा अहोरात्र 'हा !'
नसे कुशल भाषणीं, परि असे कृपापात्र हा. १९
प्रसिद्ध तुमचे महासदय पाय; जीवांकडे
चुकी म्हणुनि होतिल क्षणहि काय जी ! वांकडे ?
न निष्ठुर पिता; म्हणे मनिं 'न हो प्रजा टोणपी ?'
अपथ्यरुचि रुग्ण तो कटुक ओखदें कोण पी ? २०
तुझें यशचि तारितें; परि न केवळा तारवे,
सहाय असिला असे तरिच शत्रुला मारवे;
न भागवत भेटतां न घडतांहि सत्संगती
न अज्ञहृदयें तसीं तव यशोरसीं रंगती. २१
गमो मधुर हें विष स्तवन, सेवितां माजवी,
करी मलिन सद्यशोमुख, हलाहला लाजवी;
हरापरिस तूं बरा, प्रभुवरा, सदा जो पिशी,
असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी ! २२
शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो, चुकतसों तरी करिशि तूंचि संरक्षण;
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि ती;
रुचे विषय; ज्यां मिळे अमृत, ते न मद्या पिती. २३
न जें प्रिय, सदोष तें; प्रिय सदोषही चांगलें;
स्वतोक पितरां रुचे जरिहि कर्दमीं रांगलें;
तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा बरें ?
जरी मळविशी रजोमलिनकाय तूं अंबरें. २४
पिता जरि विटे विटो न जननी कुपुत्रीं विटे,
दयामृतरसार्द्रधी न कुलकजलें त्या किटे;

प्रसादपट झांकिती पारि परागुरूचे थिटे.
म्हणूनि म्हणती भले, 'न ऋण जन्मदेचें फिटे.' २५
प्रभो, शरण आलियावारि न व्हां कधीं वांकडे,
म्हणोनि इतुकेंच हें स्वहितकृत्य जीवांकडे;
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा, खरें;
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें. २६
म्हणा मज उतावीळा, गुणाचि घेतला; घाबरें
असो मन असेंचि बा भजकबर्हिमेघा बरें;
दिसे क्षणिक सर्व हें! भरंवसा घडीचा कसें,
धरील मन? आधिंचे बहु परिश्रमे चाकसें! २७
कृतांतकटकामलध्वज जरा दिसों लागली,
पुर:सरगदांसवें झगडतां तनू भागली;
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा,
न हों जरि उतावीळा, स्वरिपु कापितो हा गळा. २८
सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रिकमळीं दडो, मुरडितां हटानें अडो,
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो! २९
न निश्चय कधीं ढळो, कुजनविघ्नबाधा टळो,
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्तमार्गी वळो;
स्वतत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो,
पुन्हा न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो! ३०
दयामृतघना अहो हरि वळा मयूराकडे,
रडे शिशु तयास घे कळवळोनि माता कडे;
असा अतिथि धार्मिकस्तुतपदा कदा सांपडे?
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासां पडे. ३१

मोरोपंत–केकावलि.

# भाग दुसरा.

## टीपा.

### यांत योजलेल्या सांकेतिक चिह्नांचे अर्थ.

प. = पद्य ;– = म्हणजे; ० = इत्यादि; स० = समास; वृ० = वृत्त; वि० = विशेषण; क्रि० वि० = क्रियाविशेषण; अ० = अव्यय; क्रि० = क्रियापद.

### १. भक्तिपर अभंग. पृ. १–२.

उत्पत्ति–उत्पन्न. श्री–लक्ष्मी, संपत्ति, ऐश्वर्य. श्रीपति–ऐश्वर्यांचा अधिपति; अर्थात् परमेश्वर. अनंत–अंत ज्याला नाहीं तो; अर्थात् ईश्वर. विश्वंभर–जगाचें पोषण करणारा. भार–विश्वास, निष्ठा. सांकडें–संकट. येर–इतर. उबगला–उपेक्षा केली. काई–काय. दर्दुर–बेडूक. संचित–पूर्वपुण्य. अनंत–ईश्वर. श्रीमुख–कांतियुक्त वदन, प्रसन्न वदन.

### २. सह्याद्रि. पृ. २–३.

**प. १** तारापथ–आकाश. विंध्याद्रिव्रत–एकदां विंध्याद्रि हा अतिशय उंच होऊन चंद्रसूर्यादिकांचे मार्ग रोधिता झाला, या पौराणिक कथेला उद्देशून हें वर्णन आहे. रथ–गाडी, मार्ग. भार्गवराम–भृगूचा मुलगा परशुराम. मार्गण–बाण, परशुरामानें बाण सोडून पश्चिमसागराला मागें हटविलें, या कथेला अनुलक्षून येथें वर्णन आहे. जो–समुद्र. मुली–नद्या. **प. २** तटिनी–नदी. अच्छ–स्वच्छ, निर्मळ. स्फटिकभा–स्फटिकासारखें स्वच्छ. शारद–शरदृतूंतील. **प. ३** महीरुह–पर्वत. निःसार–उदकरहित, शुष्क. रुचिरता–सौंदर्य. वनश्री–वनाची लक्ष्मी शोभा, **प. ६.** करवीर–कोल्हापूर. **प. ७** हिमालयसुता–पार्वती. सप्तशृंग–नासिक जिल्ह्यांत वणी तालुक्यांत या नांवाचा उंच डोंगर आहे. **प. ८** वीरसिंह–वीरश्रेष्ठ. शिवा–कोल्हा. ज्या ठिकाणीं पूर्वीं राजवैभव होतें, त्या ठिकाणीं आतां रान माजलें असून तेथें कोल्हेकुई किंवा इतर पशूंचे ध्वनि ऐकूं येतात, असा भाव. या उताऱ्याचें वृत्त शार्दूलविक्रीडित.

### ३. कविवंदन. पृ. ३–५.

**प. १** सृष्टि–रचना. **प. ३** पुरुषार्थ–धर्म, अर्थ, काम व मोक्ष. लाघव.

चातुर्य. प. ४ मुक्त--मोतीं. विधि--शास्त्रनियम. वैरागर--रत्नांची खाण. प. ५ मुमुक्षु--संसारबंधनापासून सुटूं इच्छिणारे. अंजन--दृष्टि साफ करणारें औषध. साधक--ज्ञानेच्छु. सिद्ध--ज्ञानसंपन्न. प. ८ वाढ--उंच, उच्च. प. १० श्रवण--कान. प. ११ व्युत्पन्नाची योग्यता--खरा व्युत्पन्न. विचक्षण--पंडित. प. १२ प्रबंध--रचना, कविता. धाटी--रीती, वर्णरचनेचा प्रकार. मुद्रा--व्यंजनक शब्द. छंद--वृत्त. भेदाभेद--भेद. प. १३ शृंगार--शोभा, लीला. निर्धार--आश्रयस्थान. प. १५ रूपकर्ते--स्वरूप व्यक्त करणारे. प. १६ व्यापार--कर्म, अर्थात् काव्यरचना. प. १९ व्युत्पत्ति--ज्ञान. प. २१ वेदश्रुति--वेद. वेदश्रुति० --ज्यांनीं वेदार्थ प्रतिपादन केला आहे. प. २२ शेखीं--शेवटीं. अतीत--पलीकडील. निश्चय--सिद्धांत. अनुवादणें पूर्वऋषींनीं सांगितलें त्याचें पुनरुच्चारण करणें. प. २३ वोळले--वळले. वोघ--ओघ, प्रवाह. प. २४ मनुष्याकार--माणसाच्या आकाराचीं. प. २५ आदिशक्ति--मूळशक्ति. ठेवणें--स्थान. उणें--कमीपणा. पूर्व--मागील जन्म. संचित सांठविलेलें पुण्य. प. २६ विश्व सर्व. उपेगा उपयोगाला. प. २७ पवाड स्तव, स्तोत्र. वाढ--उंच. भावें--भक्तिपूर्वक.

## ४. अद्भुत किमयागार. पृ.५ ८.

प. १ मल्लिका--मोगरा. कलिका--कळी. विकस्वर--फुललेली, प्रफुल्लित. आमोद--वास. किमया--अद्भुत पदार्थ बनविण्याची कला किंवा शक्ति. प. ३ पुत्तलिका--पुतळी. मसूरदलसी--मसूरीच्या डाळीऐवढी. सूचि--सूय, सुई. वारण--हत्ती. प. ४ तुच्छतुच्छ--फार तुच्छ. प्रवाललतिका--पोंवळ्याची वेल. शुक्ति--शिंप. अग्रय--मुख्य. प. ५ गर्भ--आंतील भाग. सरी--उपमा. कौशेय--रेशमी वस्त्र. पर्णाशन--पान खाणारा किडा. प. ६ खर--तीव्र. चंडांशु--सूर्य. सत्त्व प्राणी. प. ७ गर्ता--खांच. घाणलें--गलिच्छ. पंकिल--गढूळ. थिल्लर--डबकें. कूप--विहीर, आड. शेवाळलें--शेवाळ्यानें भरलेलें. ख--आकाश. प. ८ लतिका--वेल. स्थाणु--खुंट. प. ९ वटधानिका--वटबीज. प. १० पाटल--पांढरा व तांबडा यांचें मिश्रण. हारीत--हिरवें. प. ११ तूवरता--तुरटपणा. वृंत--देंठ. तिक्तता--तिखटपणा. काषायता--कडवटपणा. रुचि--चव. प. १२ अग्नेरापः--अग्नीपासून पाणी. श्रुति--वेदवचन. सौदामिनी--

बीज. प. १३ अनिल--वायु, वारा. अनल--अग्नि. पंचक--पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश या पांच वस्तु. प. १४ गोमय--शेण. मार्जी--आंत. प. १५ सजातीय--एक जातीचे. सिद्धांतिलें--सिद्धांतरूपानें सांगितलें. आचार्य--शंकराचार्य. विपरीत--उलटे. प. १६ जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या आणि उन्मनी अशा जागृतीपासून तों लय होईपर्यंत मनाच्या पांच अवस्था योगशास्त्रांत मानिल्या आहेत. प्रत्यक्ष--अनुभूत. जीव--व्यक्तीमधील चैतन्य. प. १७ नैकरूप--विविधरूप, अनेक--रूप. प. १८ चराचर--स्थावर व जंगम. कलहो--तंटा,वाद. जीव--व्यक्तीचा आत्मा. शिव--सर्वव्यापी आत्मा. अंश--भाग. अंशी--सगळा, पूर्ण. या उताऱ्याचें वृत्त शार्दूलविक्रीडित.

### ५. देवावर निष्ठा. पृ. ८--९.

प. २ नेमस्त--निश्चयानें. प. ८ मानावें--कबूल करावें. भावे--प्रसन्न होतो. प. १० वज्रपंजरू--वज्राचा पिंजरा, अर्थात् भक्कम राहाण्याचें घर. कैवारी--बाजू उचलणारा.

### ६. मैत्रेयमुनीचा कौरवांस शाप. पृ. ९--११.

प. १ अंबिकासुत--धृतराष्ट्र. प. २ काम्यक--अरण्यविशेष. प. ३ उष्ण--ऊन. प. ४ चंपककलिका--चांफ्याची कळी. कोमाइली--कोमेजली. आपाद--पायांपर्यंत, नखशिखान्त. प. ५ द्यूत--जुगार. प. ७ खांडव नांवाचें वन अर्जुनानें अग्नीला अर्पण केलें अशी पौराणिक कथा आहे. वैश्वानर--अग्नि. निर्जर--देव. ईश्वर--राजा. निर्जरेश्वर--इंद्र. कपिवर--मारुति. कपि०--मारुति आहे ध्वजावर ज्याच्या असा मोठा योद्धा अर्जुन त्याला. प. ८ सोमवंश--चंद्रवंश. प. ९ पृथानंदनां--पांडवांना. प. १० कृशान--अग्नि. अंक--मांडी. प. ११ सव्य--उजवा. मेदिनी--जमिनीवर. दशन--दांत. प. १२ मृडानीरमण--पार्वतीपति, शिव. अलोट--उल्लंघन करण्याला कठीण. प. १४ मलिन--पापी. प. १५ जलजासन--कमळासन, ब्रह्मदेव. प. १६ बस्त--बोकड. यथार्थ--खरोखर. भलता--वाटेल तो. प. १८ काया--शरीर.

### ७. जमदग्नीचा कोप व परशुरामाची मातापितरांवरील भक्ति. पृ. ११--१४.

प. १ सहस्रार्जुनासी--सहस्रार्जुन नांवाच्या राक्षसाचा. अतितृषेसि--मोठ्या

ताहानेनें. प. ४ येरी- ती. प. ६ संकोचना-प्रसंग. प. ७ आश्रम--गृहस्था-श्रम. प. ९ प्राङ्मुख--पराङ्मुख. प. १० निमोलें--बिनाकिंमतीचें. नेदूनि--न देऊनि. प. ११ संभ्रम--प्रतिष्ठा, उपयोग. प. १७ क्षोभलेपण--कोप. प. १८ फरशधर -परशुराम. प. १९ प्रसन्नता--प्रसन्नतेनें. प. २२ सावचित्त--सावधान. प. २३ सुरवाड--विपुलता. वाडेंकोडें--तत्काल. प. २४ वरदता--वर. प. २६ वरद--वर देणारा, जनक. तातडी--लवकर. प. २९ निदान--फल. अधःपतन--नाश.

## ८. वासंती आणि रामचंद्र. प. १४--१८.

प. १ रंभा--केळी. व. ति. वृ. प. २ मधु--सुगंध. स्फुट--प्रफुल्लित. शकुंत--पक्षी. वनान्त--वनप्रदेश. मालिनी वृ. प. ३ अंजलि--ओंजळ. शकुनि--पक्षी. मैथिली--सीता. मालिनी वृ. पद श्याम--सांवळा. मिथिलेश--जनक. कांतार--दुर्गम अरण्य. विजन--निर्मनुष्य. निज--स्वकीय जन, भक्त. विश्राम--विसांवा. मोकालिलें--सोडलें. वचनीं राहुनि--आज्ञेंत राहून. काम--हेतु. रामा.--स्त्री. काम- कार्य. प. ४ चंद्रिका--चांदणें. सुधा--अमृत. व. ति. वृ. प. ५ कठिणहृदय--कठोर मनाचा. याहुनी--यापेक्षां मोठी. मालिनी वृ. प. ६ सु--अत्यंत. लोल- चंचल. शरीरलतिका--कोमल देह. व. ति. वृ. प. ७ द्विविध--भिन्न. विकल--व्याकुळ. विधि--नशीब. उच्छेद--नाश. हरिणी वृ. प. ८ देवी--सीता. रूचली--आवडली. शोचली--( तिच्याकरितां ) दुःख केलें. परिचित--ओळखीच्या. राहविती--धरिती, देती. धिर--धीर. हरिणी वृ. प. १० शंकू--शल्य, खिळा. प. ११ शोक--दुःख. क्षोभ--मनोवृत्तीचा खळबळाट. प्रसर--ओघ, वेग. शमन--कमी करणें, दावणें. क्षेत्र--शेत. सिकतासेतु--वाळूचा बंधारा किंवा पूल. तोयपूर--पाण्याचा लोंढा. मन्दाक्रांता वृ. प. १२ कुंज--लतामंडप. गोमटी--सुंदरी, सीता. विलास--क्रीडा. शंका--भीति. प्रणामांजलि केला--नमस्काराकारितां हात जोडले. शा. वि. वृ. प. १३ मं. कां. वृ.

## ९. संतांना दंडवत. पृ. १८-१९.

वानूं--वर्णन करूं. जड--मतिमंद. कैवल्य--मोक्ष. आगर--घर. धणी--मालक. खद्योत--काजवा. चिंतामणि--इष्ट वस्तु देणारें रत्न. हिमकर--चंद्र. छाय--छाया. वोळी--पंक्तीला. उटावें--उटणें.

## १०. तुफान. पृ. १९–२२.

उताऱ्याचें वृत्त मालिनी. **प. १** जवन–जोराचा. पवन–वारा. सायक–बाण. जलनिधि–समुद्र. **प. २** खल–मूर्ख. **प. ३** तुंग–उंच. विकल–म्लान. चिंतारव–काळजीमुळें निघालेला ध्वनि. **प. ४** सिंधु–समुद्र. व्यसन–संकट. विधिलिखित–ब्रह्मदेवाचा लेख. ललाट–कपाळ. **प. ६** वायुदेवा–वायुरूप देवते! श्रीफल–नारळ. **प. ८** काळ–यम. **प. १२** सिंधुपात्र–समुद्राचा विस्तार. **प. १३** नग–पर्वत. मीन–मासे. **प. १५** हल--नांगर. **प. १९.** निबिड–दाट. जलद्--मेघ. पवी--वज्र.

## ११. अन्योक्तिकलाप. पृ. २२--२५.

**प. १** ज्याचे--याचा संबंध ‘ दिवस ’ या शब्दाकडे. वहल--विपुल, दाट, वहलपरिमलीं असा प्रयोग पाहिजे. भृंगांगना--भ्रमरी. स्रग्धरा वृ. **प. २** दव--अरण्य, वन. अनल--अग्नि. दवानल--वणवा. शा. वि. वृ. **प. ३** मुकशी--अंतरतोस. शिखरिणी वृ. **प. ४** जीतें--ज्या गुहेला. धृति--धैर्य. खच--ढीग, सडा. सिंहाच्या गुहेमाजि इत्यादि अन्वय. स्र. वृ. **प. ५** स्वभावें--सहज. खर--तीव्र. नखरें--नखें. धाला--तृप्त झाला. स्र. वृ. **प. ७** शिखी--मोर शा. वि. वृ. **प. ९** मंगलप्रद--शुभ. वनश्री--वनलक्ष्मी. पिक--कोकिला. समसमां--सारख्यासारख्यांचा. शा. वि. वृ. **प. १०** कोक–पक्षिविशेष. यांच्या जोडप्याचा रात्रीं वियोग होऊन त्यांची दिवसा भेट होते असा कविसंकेत आहे. दयितासंगम--स्त्रीची भेट. कर--किरण, हस्त. मित्र--सूर्य, सुहृत्. स्र. वृ. **प. ११** द्विज--पक्षी. शार्दूल--वाघ. शा. वि. **प. १२** वजि–द्वितीया. शशी–चंद्र. स्र. वृ. **प. १३** जलधर--मेघ. नाविक--नावाडी. शा. वि. **प. १४** समन्तात्--सभोंवतीं. पद्मखंडें--कमळाचे ताटवे. चित्तापहारी--मन हरण करणारा. मानस--सरोवरविशेष. पंकिल--चिखलानें भरलेलें, गढूळ. पल्वल--डबकें. हंसाच्या मस्तकीं इत्यादि अन्वय. स्र. वृ. **प. १५** प्राणिमात्र--सगळे जीव. अंबुद--मेघ.

## १२. काय हा संसार! पृ. २६.

**प. १** दुश्चंचल--प्रबळ. **प. २** उद्वेग--खिन्नता आणणारा. **प. ५** विरक्ति--वैराग्य, वीट. **प. ७** गांठीं--पदरीं. **प. ११** अहंभाव--मीपणा, गर्व. **प. १३**

प्रारब्धाचा ठेवा प्रपंचीं रंगला--पूर्वसंचित कर्म संसारांत फलद्रूप झालें. अंतीं वृद्धपणीं देह खंगला इत्यादि अन्वय. **प. १७** तेहीं--त्यांहीं. वोसंडिले--उपेक्षिलें. **प. २३** दुःखाचीं चोरटीं--कठीण समय पाहून दूर पळणारीं.

## १३. अंगदशिष्टाई. पृ. २७--२९.

**प. १** रात्रिंचर--राक्षस. अभिधा--नांव. **प. २** वैदेही--सीता. गीत--गायिलेला, प्रसिद्ध. कल्याणहेतु--हिताला कारण. सद्गी--चांगली वाणी, सदुपदेश. **प. ३** चतुरानन--ब्रह्मदेव. पौत्र--नातू, मुलाचा मुलगा. भूतपति--शिव. श्रुत--वेद, ज्ञान. नयज्ञ -नीतिशास्त्रज्ञ. सुपद--मोठें पद, थोर पदवी. **प. ४** भूसुर--ब्राह्मण. सेतु--बांध, पूल. **प ५** विहित--शास्त्रोक्त. जननीच--लोकांत गौण किंवा हलकी. दशास्य--रावण. जननीचा--जननीच्या, आईच्या. **प. ६** वर--प्रसाद, देणगी. वन्यकुंजर--रानटी हत्ती. द्रु--वृक्ष. कुंज--लतामंडप. रसा--पृथिवी. **प. ७** कैरवपति--चंद्र. **प. ८** वित्तम--ज्ञानिश्रेष्ठ. निरयप्रद--नरक प्राप्त करून देणारा. **प. ९** अंजन--काळोखी. प्रसू--आई. विष्ठा--नरक, मल. **प. १०** मंतु--अपराध **प. ११** अजसूनु--दशरथ. सद्वृत्त--सदाचारसंपन्न. **प. १२** पुलस्त्य--रावणाचा बाप केली--क्रीडा. **प. १३** प्राज्ञ--शाहाणा. निलय--घर. **प. १४** भ्रूलता--भोंवयीं. चापलता--चाप, धनुष्य. जिष्णु--इंद्र. चापलता--चलाखी. **प. १६** लंकाजीवन--लंकेचा आधिपति. **प. १७** धनूरत्न--उत्तम धनुष्य. जयधन--जयरूप संपत्ति. निधन--मृत्यु. **प. १८** राजेंद्र,--राजश्रेष्ठ--रामचंद्र. उपायन--भेट, नजराणा. अंबुज--कमल. **प. १९** अंघ्रि--पाय. रघूत्तम--रामचंद्र. **प. २१** यक्षप -यक्षपति. विधु-चंद्र. ब्रध्न--सूर्य. **प. २२** प्रणत--शरण आलेले. रिपुलोक--शत्रुजन. काल--यम. भ्रष्ट--सन्मार्गापासून पतित. पाश--फांस. **प. २३** धनंजय--अग्नि. पिचविल--फोडील. **प. २४** यति--संन्यासी. दलकुटी--पर्णकुटी. रत्न--जानकी. **प. २५** दलन--नाश. शिरोभंगार्थ--डोकें फोडून घेण्याकरितां करिशील--हत्तीच्याप्रमाणें आहे स्वभाव ज्याचा तो.

## १४. हिमालयपर्वतावरील सृष्टिशोभा. पृ. २९--३३.

पहिल्या सहा श्लोकांचें वृत्त वसंततिलका. सातव्यापासून तों तेविसाव्या श्लोकापर्यंतचें वृत्त मंदाक्रांता; आणि तेथून पुढें बाकीचे श्लोक शार्दूलविक्रीडित वृत्ताचे आहेत. **प. ८** उद्गम--उगम. **प. ९** गवस--सांपडतो.

यवस--जवस. प. १० अविरल--दाट. वेतस--वेत. प. ११ वातावरण--हवा. उदंड--पुष्कळ. प. १२ द्विरद--हत्ती. यूथ--कळप. प्रवर--श्रेष्ठ. ऋक्ष--आस्वल, रीस. प. १३ भी--भीति. वितत--पसरलेले. अनूप--जलप्राय प्रदेश. प. १६ शतदली--सहस्र पानांचीं. पद्मखंडें--कमलांचे ताटवे. प. १७ समशीतोष्ण--सारखी आहे थंडी व उष्णता ज्यांत असे. प. १९ तरुण--मध्यान्हींचा. आदित्य--सूर्य. निपतति--येतात. मधुलता--रसयुक्त किंवा सुंदर लता. मुग्ध--सुंदर. शाखा--कर, शाखा--( खांद्या ) रूप हात. प. २० परभृत--कोकिल. श्येन--ससाणा. कीर--शुक, पोपट. नूत्न--नवीन. प. २१ कंदर--गुहा. स्तनित--गर्जना. चित्रवर्ण--नानाप्रकारच्या रंगांचा. गलत्०--प्रेमयुक्त आसवांचा पूर लोटत असतां. क्रि. वि. प. २२ हिमानी--बर्फाचे ढीग. द्रुत--लवकर. हरित--हिरवी. प. २३ छगल--बकरे. ग्राम्य--खेड्यांतील. आत्मजा--मुलगी. प. २४ तित्तिडिका--चिंच. प. २५ आवास--वस्ती. उद्भिद--वनस्पती. प. २६ भूर्ज--वृक्षविशेष. कस्तूरीमृग--ज्यांच्या नाभींत कस्तूरी सांपडते ते हरिण. आस्पद--स्थान. प. २७ पातविशीर्ण--पडून फांकलेले. तूर्ण--त्वरित. शतधा--शेंकडों प्रकारांनीं किंवा मार्गांनीं. प.२८ भीम--भयंकर. प्रपूरित--भरलेला. आरोहण--चढणें. सोपानमार्ग--जिना, दादर. प. २९ क्षीरविपांडु--दुधाप्रमाणें स्वच्छ. प्रावार--उपरणें, अंगवस्त्र, शेला. प. ३१ आदिम--पहिला. वर्णैकता--एक रंग.

### १५. कीचकवध. पृ. ३३--३५.

प. २ अंतरें--गुप्तरूपें. केशकवळी--केश ओढण्यामध्यें. प. ४ महा--मोठी. मारी--महामारी. अंतरीं--घरांत. प. ५ निघात--ठोसे, धक्के. प. ३ घोंट--चूळ. मित्रावर्ण--अगस्त्य. (मैत्रावरुणि). प. ७ तवकें--क्रोधानें. असुर--हिरण्यकशिपु. प. ८ नाग--हत्ती. नव०--नऊ हजार हत्तींचें बल ज्याला असा. कंठनाळीं--नरडें धरून. प. ९ गजेंद्र--विष्णूनें नक्रापासून सोडविलेला हत्ती. शरभ--सिंहाला मारणारा पक्षी. मृगेंद्र--सिंह. वृत्रासुर--इंद्र. मूळवैरी--स्वभाववैरी, जन्माचे शत्रु. प. १० महामाया--आदिमाया, भवानी. अंधक--राक्षसविशेष. अखया--अक्ष, रावणाचा मुलगा. अशोकवन--लंकेंतील एक उपवन. रावणानें सीतेला येथेंच ठेविलें होतें. प. ११ झुजि-

भले–लढले. किष्किंधातळीं--वालीची राजधानी जी किष्किंधा तिच्यांत. कंदन--मारामारी. प. १२ आंगवण--आंगची शक्ति. शेखीं--शेवटीं. प. १३ गाढे–युद्धपंडित. इडेपाडें--वीरश्रीनें. प. १४ दाटून--येऊन. प. १५ भोवंडोनि--गरगर फिरवून. सव्य--डावा. प. १६ सांडिलें-ठोकिलें. प. १७ कूर्म--कांसव. प. १८ निवटोनि--नाहींसें करून. गोळांगुळ--गोळा. खळाळ--प्रवाह. प. १९ सुरीं--देवांनीं.

## १६. द्वारकावर्णन. पृ. ३५--३७.

प. १ अनर्घ्य--अमोल. रविचंद्रज्वालानलतडिद्वेष्टित असा समास पाहिजे, पण येथें वृत्त जुळविण्याकरितां ओढाताण झाली आहे. अनल--अग्नि. तडित्--वीज. वसती--घरें. सरितापति ( सरित्पति )--समुद्र. दुर्ग--किल्ला. हारी- ओळ, पंक्ति. शिखरिणी वृ० प. २ माणिक्य, पुष्पराग, मरकत, वैडूर्य इत्यादि रत्नें आहेत. गोमेद--एक प्रकारचा तेजस्वी दगड. हा पांढरा, पिवळा, अस्मानी व तांबडा असा चार प्रकारचा आहे. पेरोज--आरबी शब्द आहे. हें वैडूर्यासारखें रत्न आहे. प्राचीप्रस्तर--पाचेचा दगड. वज्रप्रभा--हिऱ्याचें तेज. पोंवळी--वाड्याची भिंत. शा. वि. वृ. प. ३ दिव्य--सुंदर. दाम--माळा. उदर--आंतील भाग. दिव्य०--हा बहुव्रीहि स० असून मंदिरें याचें विशेषण आहे. स्रग्विणी वृ० प. ४ वैश्रवण--कुबेर. अकलंक--निष्पाप. अतुलसाम्यक--अप्रतिम. स्वागता. प. ५ सुरवाडें- श्रेष्ठ. पुष्पित- फुललेलीं. पवमान--वारा. पवमान--वेदमंत्रविशेष. प. ६ भैरव--शिवाचा एक भयंकरस्वरूप अवतार. महासिद्धि--अणिमा, गरिमा इत्यादि आठ मोठ्या सिद्धि. मुद्रा, दिक्पति व मातृका आठ आठ आहेत. नवनिधि--कुबेराचे महापद्म, शंख, मुकुंद इत्यादि नऊ निधि. हंसासन--हंस आहे वाहन जीचें अशी. शारदा--सरस्वती. सुदर्शन--विष्णूचें चक्र. शार्दूलविक्रीडित–वाघासारखी क्रीडा ज्याची असा, (कृष्ण). या पदानें प्रस्तुत श्लोकाचें वृत्तही सूचित झालें. प. ७ त्रिंशत्--तीस. रत्नाकर--समुद्र. विश्वकर्मा--देवांचा सुतार. सप्तति--सत्तर आवर्त--घेरा. शा. वि. वृ. प. ८ चतुरस्र--चौकोनी. गोपुरें--शहराचे दरवाजे. स्वागता वृ. प. ९ वृत्त--छंद. प. १० मुमुक्षु- जन्ममरणापासून सुटूं इच्छिणारा. तडीतापडी -गोसावी, बैरागी. जटिल--जटाधारी. कंद०--कंद आणि मुळें

खाऊन पोट भरणारा साधु. मुनि–मौन धरून ब्रह्मविचार करणारे. मंत्र-आराधन--मंत्राभ्यास. पृथ्वी वृत्त. **प. ११** सप्तमोक्षपुरी--अयोध्या, मथुरा, माया इत्यादि सात मोक्षदायक पुरें. उन्नत--श्रेष्ठ. **प. १४** नाकपाळी--इंद्र. भु. प्र. वृ. **प. १५** गणक--जोशी. मंत्री--सर्पादिकांच्या विषावर मंत्रोपचार करितो तो. धात्री--पृथ्वी. अर्जिती--संपादितात. स्रग्धरा वृ. **प. १६** चतुष्पथ--चवाठे. सरणि--मोठे मार्ग. पुरौकस्--नगरवासी. वेदिका--ओटे. समार्जित–संमार्जित.

## १७. अंतरिक्षप्रवास. पृ. ३७--४३.

**प. १** सांगातें--बरोबर. जनकात्मजा--जानकी. श्रीरामनामा हरी--श्रीरामरूपानें विष्णु; राम हा विष्णूचा एक अवतार आहे. रत्नाकर--समुद्र. पारशून्य--ज्याचें पलीकडचें तीर दिसत नाहीं असा. खालता--खालीं. या व पुढल्या सात श्लोकांचें वृत्त शा. वि. आहे. **प. २** मैथिली--सीता. मलय दक्षिणेकडील एक पर्वत. फेन--फेस. आवालि--रांगा. **प. ३** चंद्रमुखी--चंद्राननें. अंभोभक्षक--उदक पिणारा. वाडव-- अग्निविशेष. हा समुद्राच्या पोटांत राहतो अशी प्रसिद्धि आहे. आनंदन--आनंद देणारा. **प. ४** मातंग--गज, हत्ती. फेनगिरी--फेसाचे पर्वत. युगुल--जोडी. चामरें--चवऱ्या. **प. ५** वेलानिल--कांठावरील वायु. व्रज--समुदाय. फणा--कडा. फणी- साप. **प. ६** सिंधु--समुद्र. वनिते--स्त्रिये. शुक्ति -शिंपा. **प. ७** सैकत वाळवंट. **प. ८** उद्भव--उत्पत्ति. मद--माज. चिकट द्रव्य. उष्णोत्थित-- उन्हानें उत्पन्न झालेला. कणिका--बिंदु. **प. ९** गवाक्षवदनें--खिडक्यांचीं तोंडें. व. ति. वृ. **प. १०** निरस्त--दूर झालेली. या व पुढील तीन श्लोकांचें वृत्त शा. वि. **प. ११** निर्भर--वेग. नूपुर--तोरड्या. **प. १२** निशाचरपति--रावण. आकंपित थोडें डोलविलेले. पल्लवांगुलि--पल्लवरूप बोटें. **प. १४** हिमकर--चंद्र. स्पर्धि--स्पर्धा करणारे चुंबणारे. **प. १५** या व वरच्या श्लोकाचें वृ. स्रग्धरा. सुस्निग्ध--फार गंभीर. आगम--आगमन. व्रज--समुदाय. नीप--कळंबाचीं झाडें. मृदुल--मऊ **प. १६** कंदली--रानकेळी. धूम–धूर. अरुण--लाल. मृगांक--चंद्र. या व पुढल्या श्लोकाचें वृत्त शा. वि. **प. १७** कूळ--बेट. पंपा--सरोवरविशेष. **प. १८** हेमघटित–सोन्याच्या. यान--गमन. वृ. शिखरिणी **प. १९** यापुढील

तीन श्लोकांचें वृ. शा. वि. **प. २१** नहुष--राजाचें नांव महेन्द्र--इंद्र. च्युत--भ्रष्ट. अगस्तीचा उदय झाला म्हणजे सरोवरें व दुसरे जलाशय यांतील उदक निर्मळ होतें अशी समजूत आहे. **प. २२** विमानपथ--आकाश. मनोज्ञ--सुगंध. **प. २३** जलकेलिभू--जळक्रीडेची जागा. प्रथित--प्रसिद्ध. व. ति. वृ. **प. २४** प्रतिशब्द--प्रतिध्वनि. शा. वि **प. २५--२६** ज्वलन--अग्नि. पंचाग्नि--चार बाजूला चार अग्नि व वरती सूर्य असे पांच अग्नि. साधन- योग. सुशिक्षा--सदुपदेश. व. ति. **प. २७** मौनी--मौन धारण करणारा मननशील. प्रत्युक्ति--उत्तर- सत्क्रिया-- मान. येथून पुढील सर्व श्लोकांचें वृत्त शा. वि. **प. २८** होमिले--टाकिले, हनन केले. **प. २९** बहुल--पुष्कळ क्षुद्बाधा--भुकेची पीडा- तपांचा निधि--शरभंगनामक मुनि. **प. ३०** निका-चांगला. **प. ३१** ईषत्–थोडा. पांडु-शुद्ध. वक्त्र-मुख. **प. ३२** शिक्षा–देहदंड. उद्दाम–बंधनरहित, स्वतंत्र. **प. ३३** महासती–अनसूया. सुरनदी–गंगा. **प. ३४** वीरासन–एक प्रकारची योगाची बैठक. शाखी--वृक्ष. वेदी+आसन–वेदीरूप आसन. कंप--हालचाल. शून्य–रहित. **प. ३५** मुक्तायष्टि–मोत्यांची काठी. सरोज–कमल. इंदीवर–निळें कमल. अगरु–चंदन. पत्ररचना--रंगवल्ली, रांगोळी, वेलबुटी. भूची--पृथ्वीची. चांदनी--चंदनचूर्णाची. **प. ३६** स्फुट--स्पष्टपणें. **प. ३७** विभूति -भस्म. जन्हुसुता--गंगा. **प. ३८** गुहाख्य–गुह नांवाचा. सुमन्त–दशरथाचा प्रधान. कैकयकन्या–कैकयी. अजि तुझा इष्टार्थ फला आला–तुझ्या मनाजोगें झालें आतां ! **प. ३९** स्त्रष्टा–ब्रह्मदेव. मानस–सरोवराचें नांव. हें तिबेटांत आहे. पानीयकेलि–जलक्रीडा. अव्यक्त–ब्रह्म. बुद्धि--ज्ञान. **प. ४०** उत्तरकोशल--देशविशेष. पुलिन--वाळवंट. उत्संग--मांडी. **प. ४१** धुनी--नदी. तरंग--लाटा. सुधांशु–चंद्र **प. ४२** रक्त–लाल. अवनी–पृथ्वी. रज–धूळ. संभ्रम–घाई. वायुज–मारुती. नंदिग्राम--अयोध्येजवळचें एक गांव. **प. ४३** अग्रीं--पुढें. भला--साधुवृत्ति, सुशील.

## १८. रुक्मिणी आपल्या लग्नाची गोष्ट सांगते. पृ. ४४–४७.

प. १ कौरव–धर्मराज वगैरे. यादव–कृष्ण वगैरे. कोकिळशुकसारिकांसि लांब पळविती--आपल्या मधुर स्वरानें त्यांस लाजविती, हा भाव.

सती--पतिव्रता. प. २ प्रभु--कृष्ण. अजातरिपु--धर्मराज. भार्या--स्त्री, द्रौपदी. ननांदा--नणंद. द्रौपदी कृष्णानें बहीण मानिली होती. ती रुक्मिणीची नणंद झाली. प.३ वैदर्भी--विदर्भराजकन्या, रुक्मिणी. वत्सल--दयाळु. अंगें--आपण होऊन, स्वेच्छेनें. प. ५ हारि--मनोहर. देहा चालवी--देहाचें रक्षण करी. प ६ परिहार--अडथळा, मनाई. प. ७ नखेन्दु--चंद्रकोरीसारखीं पायांचीं नखें. धरा--जमीन. धरा नखेन्दु खणी--मन चिंतेनें व्यग्र झालें असतां स्त्रियांच्या हातून नकळत कांहीं चिन्तासूचक व्यापार होतात. त्यांपैकींच पदनखाचा संकोच करून जमीन खरवडणें हा होय. प. ८ श्रीकृष्णाला दुहिता द्यावी इत्यादि अन्वय. गुरु--वडील माणसें. विचारणा--विचार. सुहिता--हितकर. प. ९ श्रुत्यर्पण--कान देणें. प १० साजणांमध्यें--सहा भावंडांत. खोटा--कपटी मनाचा. प. ११ मोहरोगवैद्य--भ्रांतिरूप रोगाला दूर करणारा. चैद्य--शिशुपाल. प. १२. क्ष्वेड--विष. पांगूळ--पांगळा. आत्मघातार्चें०--आत्मघाताचे साधकबाधक विचार एका क्षणांत दहादां मनांत येत असा भाव. प. १३ सुदीन--फार नम्र. प. १४ द्रवतां--दयार्द्र झाला असतां. भाव--भक्ति, निष्ठा. प. १६ वृत्त--वृत्तबद्ध श्लोक. प. १७ वेद ज्याचे निश्वास इत्यादि अन्वय. विश्वास--विश्वाला. प. १८ प्रणत--भक्त. क्षिप्र--त्वरित. प. १९ शाल्व--राजाचें नांव. मगधपतिसख--मगधदेशाच्या राजाचा मित्र. मांडलें--सुरू झालें. तद्बलजलनिधींत -त्याच्या सैन्यरूप समुद्रांत. आधि--मानासिक चिंता. प. २० खळदर्पघ्न--दुष्टांचा गर्व हरण करणारा. नतचातक--शरण आलेले चातक. दयासुधा--दयारूप अमृत. जलद--मेघ. प. २१ विलेपन--उटी. हरिद्रा--हळद. सुकृपण--अत्यंत कृपण, हलक्या मनाचा. शुष्कोपचरण--कोरडा सत्कार. दरिद्र--अनाथ. प. २२ ध्वजा झाल्यें--प्रासादशिखरावर पताकेसारखी उभी राहिलें. पुर+ईक्षण+छद्म--नगरदर्शनाचें निमित्त. हरिदिक्--इंद्राची दिशा, पूर्व. मुख--वदन. प. २३ आधिभारभग्न आणि म्हणूनच कष्टी जें मन त्यासी रात्रि यष्टि (आधार) झाली हा अन्वय. प. २५ बोल--दोष. पदपद्म--चरणरूप कमल. चिंतामणि--इष्ट वस्तु देणारें रत्न. मोल--किंमत. प. २६ तों--इतक्यांत. प्रियकंठीं--कृष्णाच्या गळ्यांत. हे--मला रुक्मिणीला. सुखांत पडावी--सुखी करावी. भाव--हेतु.

डावी भुजलता स्फुरली (आणि) ती कृपा करि असा अन्वय. स्त्रियांचा डावा डोळा, डावा हात, वगैरेंचें स्फुरण होणें शकुनशास्त्रांत शुभप्रद मानिलें आहे. प. २७ मनें चिंतेची वाज सोडली--मनानें चिंता सोडिली. माज--कंबर. प्राणांनीं जाण्याकरितां कंबर बांधली होती ती त्यांनीं सोडली. प. २८ बाल--लहान मूल. प. २९ मुखश्री--तोंडाची शोभा, टवटवी. कळवीं--सुचवीं. प ३० उत्तमश्लोक--उत्तम आहे कीर्ति ज्याची असा. प. ३१ ज्यां--चिंता वगैरेंना. पालविलें--बोलाविलें. कृष्ण आल्यामुळें माझी चिंता दूर झाली, पण शिशुपालादिक चिंताग्रस्त झाले असा भाव. प. ३२ अंबा--देवी. प. ३३ धाक--भीति. विरोन गेल्यांचे--गांगरून गेल्यांचे. प. ३४ धात्री--दायी. शिवा--अंबिका, पार्वती. प. ३६ दावा--वैर. कळों नेदावा--कळूं देऊं नये. प. ३७ जोडा--उपमा. भाग--वांटा. कोले--कोल्हे. महाभाग--मोठा ऐश्वर्यशाली. प. ३८ वायसाराति--घुबड. वायस--कावळा. अराति--शत्रु. सारा--उत्तम. प. ३९ मूर्त--प्रत्यक्ष, मूर्तिमान्. शिशिर--हिंवाळा. ऊन--ऊन्ह. प. ४० आलि--सखी. सुमनोमाला--फुलांची माळ. यास वरा इत्यादि अन्वय प. ४१ मुक्ता--मोतीं. प. ४२ श्वगण--कुत्र्यांची टोळी. हरि--सिंह. यदुवीर--कृष्ण.

## १९. वर्षाकाल. पृ. ४७--४८.

प. १ पंचमऋतु--सामान्यपणें वर्षारंभ चैत्रापासून समजतात, परंतु व्यापारी लोक तो कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून मानतात. कार्तिकापासून ऋतु मोजले तर वर्षाकाळ पांचवा ऋतु येतो. हाच या ठिकाणीं इष्ट आहे. प. २ पारधी--व्याध, शिकारी. व्याध नांवाचा एक फार तेजस्वी तारा आहे. याच्या पश्चिमेस एक मोठा तारापुंज आहे. याला ‘ मृग ’ अशी संज्ञा आहे. यांत चार तारे चरणस्थानीं असून चार मुखस्थानीं आहेत. पायांच्या मधोमध उदरस्थानीं तीन ताऱ्यांची एक बारीक रेषा आहे; व तिच्याजवळ बरीच पुसट अशी दुसरी एक रेषा आहे. या रेषांना बाण म्हणतात. व्याधानें मगावर हे बाण सोडले अशी कल्पना आहे. सूर्य मृगनक्षत्रांत आला म्हणजे मृग लागले असें म्हणतात. प. ३ रोहिणी--हें नक्षत्र मृगाच्या थोडें पश्चिमेस आहे. प. ५ शिवपिंडिका--शिवाची पिंडी. प. ६ कपोतक--कबुतरें. दर्दुर--

–बेडूक. महाघोख–मोठा घोष प. ७ सारिता–नदी. संघाट–समुदाय. प. ९ प्रमाण--माप. वोपी--देतो. अयनांशें–उत्तरायण व दक्षिणायन यांनीं. सूर्य उत्तरायणांत बाष्परूपानें आकाशांत उदकाचा संचय करितो, व दक्षिणायना-च्या आरंभीं पर्जन्याच्या रूपानें तें पाणी पृथ्वीवर सोडतो. यावर कवि अशी कल्पना करितो कीं, जणूं काय सूर्य व चंद्र हीं दोन मापें करून सगळ्या जगाला परमेश्वर अयनांशानें पाणी मोजूनच देत आहे!

## २०. श्रीरामराज्याभिषेक. पृ. ४८--५१.

**प. १** अनुज--धाकटा भाऊ, लक्ष्मण. कपिपति--मारुति. उत्तम--श्लोक--पवित्रकीर्ति. यान--विमान. निष्कलंक--निष्पाप. या व पुढल्या श्लोकाचें वृत्त मालिनी. **प. २** सोदर--सख्खा भाऊ. रविशशि गगनीं तों (यावच्चंद्रदिवाकरौ)--जोंपर्यंत चंद्र व सूर्य आकाशांत प्रकाशत आहेत तोंपर्यंत. मोदराशि--मोठा आनंद. वर्ष--वृष्टि वाटे -रस्त्यावर. **प. ३** पक्व--शिजविलेलें. जव--सातू. होमधान्य. व. ति. वृ. **प. ४** ध्वस्त--नष्ट, लज्जित. मालिनी वृत्त. **प. ५** शिखरिणी वृ. **प. ६** वृंद-समुदाय. चित्र--चमत्कारिक. स्वर्णसन्नाह--सोन्याचा साज किंवा सरंजाम ज्यांचा असे. अभिमुख--सामोरे. **प. ८** पद्मा--लक्ष्मी. मालिनी वृ. **प. ९** उपपादि--सांगे. क्षितिसुता--जानकी. **प. ११** जिती--जगतात. सुधाकर--चंद्र. सित--शुभ्र. आतपत्र--छत्र. कृती--धन्य. **प. १२** ऋक्ष--वानर. **प. १३** गुरु--वसिष्ठ, पक्षीं गुरुग्रह. सोम--चंद्र. नटति नाचतात. मालिनी वृ. **प. १४** माउल्या--कौसल्या, कैकेयी आणि सुमित्रा. **प. १५** लाहो--आनंद. धरातनया--जानकी. स्वागता वृ. **प. १६** तनुप्राण-न्यायें--तनु व प्राण यांची जशी घट्ट मिठी आहे, त्याप्रमाणें. माया--प्रेम. मय--युक्त. **प. १७** कोदंडपाणि--चापहस्त. चतुःसिंधुपाणी--चारी समुद्रांचें पाणी. त्रिदशगुरु--देवांचा गुरु. वंशाब्धिचंद्र--वंशरूप समुद्राला आनंदित करणारा. **प. १८** अंबर--वस्त्र. पद--पदवी. कमळासन--ब्रह्मदेव. **प. २०** अग्रज--वडील भाऊ. व. ति. वृ. **प. २१** द्वीप--बेट. **प. २२** काया--देह. **प. २३** एकवधूव्रत--एकपत्नीव्रत. मधुव्रत--भ्रमर. स्फुट--स्पष्ट. **प. २४** व्याज--कपट.

## २१. हंस नलाकडून दमयंतीकडे जातो. पृ. ५१--५३.

प. १ खग--पक्षी, येथें हंस. गोपुर--पुरद्वाराचा वरला भाग. गवाक्ष--झरोका, खिडकी. जवशाली--वेगवान्. वेंघला--चढला. चंद्रशाला--सौध, गच्ची. वितत--विशाल. शाला--भवनें, गृहें. मालिनी वृ. प. २ निडारीं--दृष्टींत. सांद्र--दाट. साई--झाडी. व. ति वृ. प. ३ परिवेष--खळें. व. ति. वृ. प. ४ धरेला--पृथ्वीला. प. ५ कवयिता--कवि. वृ. शिखरिणी. प. ६ हे--दमयंती. तैं... पहिलीच हंसगमना--हंसाप्रमाणें हळू चालणारी होतीच ती पुनः हंस धरण्याकरितां तशी झाली. म्हणजे श्लेषानें हंसाकडे गमन करिती झाली. व. ति. वृ. प. ७ इंद्रदंती--इंद्राचा हत्ती, ऐरावत. प. ९ सुधाकर--चंद्र. प. १० विनोद--थट्टा. विहग--पक्षी. सवाई वृत्त. प. १४ दुसरी--सोबती. वनालि--वनपंक्ति.

## २२. प्रपंचांतील वागणूक. पृ. ५३--५४.

प. २ अरत्रीं परत्रीं--येथें व परलोकीं. प. ३ यथानुशक्ति--यथाशक्ति. सर्वोत्तम--परमेश्वर. प. ५ दुश्चितपणें--गैरसावधपणानें. प. ७ सदैवपणा--भाग्यशालीपणा. नेदी--न दे. व्यवसाय--व्यवहार. प. ९ झिजवावें--झिजावें, उपयोगीं पडावें. प. ११ विरवावें--बोधावें. प. १२ पावन--शुद्ध प. १३ पाखंडी--धर्मभ्रष्ट. प. १४ उदंड--सर्व. प्रत्यय--अनुभव. प. १५ नीच--उणें, मर्मभेदक. पस्तावणें--पश्चात्ताप पावणें, परावे--परके. प. १६ जाणपण--अभिमान. प. १८ उपाधि--यत्न. चेवला--मुकला. समयीं--ऐन वेळेवर. खोटा-- फुकट, निकामी.

## २३. वैराग्यपर अभंग. पृ. ५४--५६.

वरो--चांगलें. उदीम--धंदा. परी--प्रकार. जीवन--पाणी. मासोळी--मासा. गोसावी--संन्यासी, जोगी. योग--देवाचें ज्ञान. तातडी--त्वरा. बिंबुडी--बीमोड. भोज्य--पक्कान्नें. प्रावर्ण--पांघरावयाचें वस्त्र. कर्णमूळीं--कानाच्या मुळाशीं. कानाजवळील केश पांढरे होतात यावर कवि कल्पना करितो कीं, जरा ही मृत्यूची सूचना देण्याकरितां कानाशीं लागली. भोंवता--अवांतर. कारण--कार्य, काम. कळा--धर्म. सूत्रधारी--नाटकी, ईश्वर.

## २४. उज्जयिनी. पृ. ५६–५८.

प. १ सुकृती--धन्य. शिखरिणी वृ. प. २ हर्म्य--श्रीमंतांचे वाडे. प्रासाद--मंदिरें, राजवाडे. चंद्रशाला--सौध, गच्ची. स्रग्धरा वृ. प. ३ यान--वाहन. पौर--पुरवासी, नागरिक. राजपंथ–राजमार्ग, मोठे रस्ते. मन्दाक्रान्ता वृ. प. ४ चक्रांग--चक्रवाक. क्षिप्रा–नदीचें नांव. शा. वि. वृ. प. ५ मानधन--मान आहे धन ज्यांचे असे. प. ६ विक्रम--राजाचें नांव. प. ७ अभिज्ञ--जाणते. वाणीकंठमणी--सरस्वतीच्या गळ्यांतील ताईत. शाकुंतलाचा पिता--कालिदास. संमत--मान्य. प. ८--९ पहिल्या चरणांत मेघदूत काव्याच्या संविधानकाकडे कवीचें लक्ष्य आहे. त्या काव्यांत एका विरही यक्षानें मेघाला दूत कल्पून त्याच्याबरोबर आपल्या प्रियेला निरोप पाठविला आहे. सीतेला पतीचा निरोप--रघुवंशकाव्याच्या चवदाव्या सर्गांत निर्जन वनांत सोडून दिलेल्या सीतेनें लक्ष्मणाबरोबर रामचंद्राला निरोप पाठविला आहे त्याला अनुलक्षून हे शब्द आहेत. रतीचा शोक--कुमारसंभवाच्या चवथ्या सर्गांत मदनाप्रीत्यर्थ रतीनें विलाप केला आहे, तिकडे कवीचें लक्ष्य आहे. वरील तिन्ही कृतींचा जनक कालिदास आहे. प. ११ महाकाल या नांवाचें प्रसिद्ध शिवलिंग उज्जयिनीला आहे. अवंति–उज्जयिनी. भु. प्र. वृ. प. १२ अमूप--पुष्कळ. स्वर्गपंथा पावली--नाहींशी झाली. मालिनी वृ. प. १३ अनुज--धाकटा भाऊ. भर्तृहरि--राजाचें नांव. प. १४ सामंतचक्र--मांडलिक राजांचा समुदाय. आवृत--वेष्टिलेला. प. १५ नामैक्यें--नामसादृश्यानें, एका नांवानें. सुधा हें नांव चुना आणि अमृत या दोन्ही पदार्थांस आहे. पण त्यांची बरोबरी नुसत्या नामसादृश्यानें कधीं तरी होईल काय? असा भाव.

## २५. सत्यभामेचा रुसवा. पृ. ५८--५९.

प. १ विशारद--निपुण. कृष्ण०--हें 'मुनिनारदानें' या पदाचें विशेषण. त्रिजगन्निवास--तीन जगांत आहे वसति ज्याची असा. प. २ बुझावी--समजावी. लीला--चमत्कारिक प्रसंग. प. ४ स्मृति--भान. प. ५ अनादि--आदि ज्याला नाहीं तो. भवशोक--संसारसंबंधीं ताप. किंकरी--दासी. प. ६ शुभांगी–सुंदरी. शिराणी--कौतुक. प. ७ श्रीवत्स--(कृष्णाच्या

वक्षःस्थळावरील) रत्नविशेष. अंक--चिन्ह. प. ८ अंबुजधरा--कृष्णा. पक्षिगमन-पक्षी (गरुड) आहे वाहन ज्याचें असा. दमन-अंतक, नाश करणारा. प. ११ तुतें-तुला. आधि-राग. कैटभ-दैत्यविशेष. अरि-शत्रु. कैटभारि--कृष्ण.

## २६. गृहिणीविरह. पृ. ५९--६१.

या वेंच्याचें वृत्त शिखरिणी. प. १ अमरसदन--स्वर्ग. प. ३ सुदती--शोभन आहेत दंत जीचे अशी, प्रिया. प. ४ विवाहीं पाषाणीं चढलिस--विवाहांत वधूनें सहाणेवर पावलें टाकण्याचा विधि आहे तिकडे येथें कवीचें अक्ष्य आहे. ऐशी शंका मनीं येउनी हृदय शतधा करी असा अन्वय. प. ५ निमाली--नाहींशी झाली. सुषमा--मोठी शोभा. प. ६ विद्युल्लेखा०--विजेच्या तेजाप्रमाणें चंचल. सुरेंद्र--इंद्र. उपभोग--सुखें. अतुल--अप्रतिम. मंत्रभ्रष्ट--सन्मार्गापासून चळलेला. प. ७ ज्या मला. सुरपद--इंद्रपद. संबोधनपद--नांव. दिवस्थ--स्वर्गवासी. प. ८ यांत सुकविता आणि पद्माक्षी (दयिता) यांचें श्लिष्टपदांनीं चमत्कारिक साम्य वर्णिलें आहे. गुण--प्रसाद, ओज व माधुर्य; दयितापक्षीं पातिव्रत्यादि धर्म. दोष--कर्णकटुत्व, क्लिष्टत्व इत्यादि. दयितापक्षीं पतीशीं विरोध, गर्विष्ठपणा इ. अलंकार--यमकानुप्रासादि शब्दालंकार व उपमा, उत्प्रेक्षादि अर्थालंकार; दयितापक्षीं सुवर्ण--मुक्तादिकांचीं भूषणें. पहिला रस--शृंगार. दयितापक्षीं प्रेम. वर्ण--अक्षरें; दयितापक्षीं शब्द. मृदु--रसानुकूल; दयितापक्षीं प्रियाला रंजविणारे. पद्माक्षी--कमलनयना. प. ९ हास्य--याचा रंग कवि शुभ्र मानितात आणि म्हणूनच या ठिकाणीं त्याची सुधेशीं तुलना केली आहे. शिवाय त्यांत माधुर्यही व्यंजित झालें आहे. भक्त इष्ट देवतांवर दुग्धादिकांचा अभिषेक करून मग कमलादिकांनीं त्यांस पूजितात या लौकिक आचाराकडे कवीचें येथें लक्ष्य आहे. मृगाक्षी -या पदानें कटाक्षाचें नीलत्व सुचविलें. मांगल्यप्रदविधि--मंगलविधि, पूजा. विधात्री--करणारी. कुंदरदना--कुंदपुष्पाप्रमाणें आहेत दंत जिचे ती.

## २७. अंतीं एकटाच ! प. ६१.

लेखे--गणना. शाश्वत--कायमचें.

## २८. रजनी आणि उषःकाल. पृ. ६२–६३.

**प. ३.** यक्षिणीपाळे--यक्षिणींचे समुदाय. धुमस--धुडकूस. गदारोळें--मोठ्या आरोळ्यांनीं. भंबाळें -भकभकीत. **प. १०** माद्रीकुमर--नकुलसहदेव. **प. ११** पाठी देऊनी--मागें टाकून, त्याच्याकडे पाठ करून. ध्रुवमंडळ--ध्रुवतारा आणि त्याच्या जवळचे सप्तर्षि वगैरे. अगस्ति--खगोलाच्या दक्षिणार्धांतील एक मोठा तेजस्वी तारा. वामीं--डाव्या बाजूला. कृत्तिका--मृगनक्षत्राच्या पश्चिमेकडील सात नक्षत्रांचा गुच्छ. याम्यदिशा--यमाची दिशा, दक्षिण. **प. १२** विभांडी--मोडी. **प. १३** झडपाआड--चालण्याच्या झपाट्यांत. **प. १९** या पद्यांत अरुणोदय झाला म्हणजे नक्षत्रें लुप्त होतात हें मुक्ताफलें टिपणाऱ्या हंसाच्या गर्भित सादृश्यानें वर्णिलें आहे. **प. २०** सहस्रकर--यांत कर शब्द श्लिष्ट आहे. सूर्य व सहस्रार्जुन. सहस्रार्जुनानें नर्मदेचा प्रवाह एकदा आडविला होता. तिकडे येथें कवीचें लक्ष्य आहे. **प. २१** सोऽहमस्मि--तो मी आहें. ज्ञाते--वेदांती, ब्रह्मनिष्ठ. **प. २२** शाक्त--शक्तीचे उपासक. सौर--सूर्योपासक. गाणपत्य--गणपतीचे उपासक गाणपत. **प. २३** अग्निहोत्री--अग्नीचे उपासक.

## २९. सुभद्राहरण. पृ. ६४–६६.

**प. १** प्रभास--क्षेत्रविशेष. **प. २** हलधर--बलराम. **प. ४** तीर्थस्नायी--तीर्थांत स्नान केलेला. **प. ५** त्रिदंडी--तीन दंड धारण करणारा. नियति--नशीब. **प. ६** कंचा--कोणता. **प. ७** द्वारवती--द्वारका. वार्षिक--वर्षाकालाचें. सपर्यंत--शेवटपर्यंत. **प. ९** ब्रह्मण्य--ब्राह्मणभक्त. **प. १५** पर्व--पर्वणी. **प. १६** शिबिका--पालखी. वृष्णिदारजन--यादवस्त्रिया. **प. १७** सुधाकर--चंद्र. आशयपयोनिधि--मनःसमुद्र. **प. १८** सुचिर--फार वेळ. **प. १९** तूण--भाता. कपटयति--कपटसंन्यासी. **प. २०** अर्जुनमराल--अर्जुनरूप हंस. दुसऱ्या अर्थांत हंसकाकीय कथानकाकडे कवीचें लक्ष्य आहे. **प. २१** आटोप--अवडंबर. **प. २२** वणिक्सार्थ--व्यापाऱ्यांचा तांडा. **प. २४** सत्क्रिय--सदाचारसंपन्न. **प. २५** झटिति--झटकन्. कटक--सैन्य. भट--योद्धे. दस्यु--चोर. **प. २६** प्रस्फुरदधरदल--स्फुरण पावतो आहे ओंठ ज्याचा असा. **प. २७** वत्सा--सुभद्रा. धर्षण--बलात्कारानें नेणें. दंड--शिक्षा.

उत्सव--मौज. **प. २८** पर्व--पर्वणी, पौर्णिमा वगैरे. अर्णव--समुद्र. राग--तांबडा रंग. शरदभ्र शरत्कालांतील मेघ. **प. २९** शोण--लाल. पुढें होणें--पुढें सरणें. **प. ३१** सहभव--स्वाभाविक, स्वभावसिद्ध. दीनसख--गरीबांचा कैवारी. भव्य--कल्याण. **प. ३२** आदान--संकट. **प. ३३** मदंघ्रिच्या--माझ्या पायाच्या. **प. ३४** पारिबर्हे--राजचिन्हें. **प. ३५** भूषा--अलंकार. **प. ३६** तर्णकशत--वत्सशत.

## ३०. शिवधनुर्भंग व सीताविवाह. पृ. ६७--६९.

**प. १** माजीं--कमरेंत. कशी--बांधी. **प. २** निशा०--चंद्राच्या कांतीप्रमाणें दिसणाऱ्या मोत्यांची पंक्ति. **प. ३** उफाळला--उडाला. वेतंड--हत्ती. **प. ४** कोटी--कडा. गुण--दोरी. कानवरी--आकर्ण, कानापर्यंत. दिठी--दृष्टीनें. **प. ५** लीला०--सहज राजांमध्यें शोभणारा. तुकुनि--उचलून. प्रतिनदन--प्रतिध्वनि करणारा. स्रग्धरा वृ. **प. ६** टाळी बसे--कानठाळ्या बसल्या. व. ति. वृ. **प. ७** गौतमपुत्र--शतानंद. गाधेय--विश्वामित्र. व. ति. वृ. **प. ८** कार्मुक--धनुष्य. सुरस--सुंदर. **प. ९** गिरा--वाणी. राजे--शोभे **प. १०** दोर्बल--बाहूंचें सामर्थ्य. भाटिवकी--स्तुतिपाठकता. **प. ११** कडासन--तपस्व्यांचें व्याघ्रचर्माचें आसन. कृष्णाजिन--मृगचर्म. **प. १२** सौधतटीं--माडीवर. संभ्रम--गडबड. दाश०--रामरूपी दयासागराजवळ. **प. १३** सोपानमाला--जिन्याच्या पायऱ्या. **प. १४** देवर--दीर. रंग--सभास्थान. धुनी--नदी. **प. १५** अतुर--आतुर. अपांग--कटाक्ष. योगि०--योग्यांच्या हृदयरूप आकाशांतील चंद्राला. **प. १६** घोसबाळी--कानांतील मोत्यांचा अलंकार. **प. १७** गरल--विष. हृत्सारसा--चित्तकमलास. **प. १९** अळुमाळ--हळूहळू, थोडासा. वेल्हाळ--सुंदरी. मदालसा--आनंदातिशयानें मंद झाली आहे गति जिची अशी. कोल्हाळ--गडबड. अलि०--भ्रमरसमुदायाप्रमाणें कुरळ व कृष्ण आहेत केश जिचे अशी. भव्य०--प्रचंड तमालवृक्षाप्रमाणें नीलवर्ण जो प्रभु त्याच्या.

## ३१. वयाच्या तीन अवस्था. पृ. ६९--७०.

: बारे--पैजा. बालेघोंडी--होळीच्या तिठ्यावरील मोठाले वाटोळे दगड. मुंडासा--पागोटें. श्लेष्मा--कफ. अटोनी वेठोनी--चापून चेपून पट्ट्या बसवून.

## ३२. सीताशुद्धि. पृ. ७०--७२.

प. १ पाजळा--पेटवा. प. २ निराळ--अंतरिक्ष. प. ४ ऋक्ष--वानर-विशेष. प. ५ विदेहनंदिनी--जानकी. प. ८ सीता पृथ्वीच्या पोटांत सांपडली म्हणून सीतेला पृथ्वीची मुलगी असें म्हटलें आहे. प. ११ रिचवती--गळून पडती. प. १२ कर्मगति--कर्माचें फल. प. १४ आगळें--अधिक. प. १५ चिच्छक्ति--चैतन्य. वेदांती--ब्रह्मज्ञानी. प. २१ क्षेम देणें--भेटणें. कोदंडपाणी--धनुष्य आहे हातांत ज्याच्या तो, रामचंद्र. वामांक--डावी मांडी. प. २२ नवमेघरंग--सजल मेघाच्या रंगाचा, नीलवर्ण. तळपत--प्रकाशत होती.

## ३३. उत्तमगुणसंकीर्तन. पृ. ७२--७३.

प. ३ शिकवणी--उपदेश. प. ५ सामर्थ्य चुकूं नये--घाबरून जाऊं नये. निखंदणें--दोष देणें. पुढिलांसि--मागें झाले त्यांना. प. १० व्यापकपण--सगळीकडची माहिती मिळविण्याची प्रवृत्ति. प. १२ ग्वाही--प्रसिद्धि, दवंडी. प. १४ दुश्चितपणें--बेफिकीरपणानें.

## ३४. ताटिकावध. पृ. ७३--७४.

प. २ दमन--संहार. प. ५ साटोपें--वीरश्रीनें. ठाण--आसन. प. ६ साटोप--आडंबर. प. ७ विखार--सर्प. प. ८ न्याहा--हाहाकार. धूर्जटी--शिव. हुडबड--गडबड. प. ९ अंबर--आकाश. जिव्हार--हृदय. सनादें--नादानें. प. ११ येरु--तो. प. १३ विंदान--पराक्रम, करणी. घाईं--घायानें. प. १४ कानाडी--आकर्ण. न्याहा--हाहाकार, ध्वनि. चकितमूर्च्छा--विस्मित आणि मूर्च्छित. प. १६ रांगोळी--चूर्ण. टाळी--कानटाळी. प. १८ हाहाभूत--हाहाकार करूं लागलीं. प. २० त्राहाटिलीं--उभारलीं. प. २१ आनंदभळीं--आनंदाच्या भरांत. वृंद--समुदाय.

## ३५. देवाजवळ मागणें. पृ. ७४--७५.

सांगाती--सोबती. दुरितें--संकटें. त्राहे--रक्षण कर. ममता--प्रेम. आणीक--दुसरें. पवाडे--गुणकीर्ति. सायुज्य--मोक्ष. वनमाळी--वनमाळेनें शोभणारा. विकरा--विक्री. दातारा--दात्या.

## ३६. स्फुट पद्यें. पृ. ७५--७९.

प. १ हृत्--हृदय. कासार--सरोवर. स्नेह--तैल. असूयोज्झित--निर्मत्सर. प. २ काव्यपद्म--काव्यरूप पद्म. मकरंदसद्म--रसाचें घर. प. ३ कुलीनता + उचित--कुलीनपणाला योग्य. प. ४ शश--ससे. मुक्ताफलकवळभक्षिता--मोत्यांचे कवळ म्हणजे घास खाणारा. हरि--सिंह. प. ५ साकेत--अयोध्या. सानुजसुहृत्--भाऊ व मित्र यांसह. प. ६ सत्--साधु. चेतःकैरव--मनोरूपी कमलें. विकच--प्रफुल्लित. ध्वांत--अंधकार. प्रकाशी--उघड करून दाखवितो. पयोराशि--समुद्र. काव्येंदु--चंद्रासारखें आल्हादक काव्य. खळ० --दुष्टविरहिजन. धूमकेतु--शेंडें नक्षत्र, नाशक. स्रग्धरा वृ. प. ७ ज्ञानेश--ज्ञानेश्वर. भवानी--देवी. महामोह--मोठें अज्ञान. महिष--रेडा. प. ८ विवाहमंगल--विवाहरूप मंगलकार्य. प्रणति--नमस्कार. प. ९ जडजीव--मंदबुद्धि प्राणी. तुका--तुकाराम. तुकासि तोलासि. प. १० सूक्ति--सुभाषित. मस्तक हा शब्द संस्कृतांतल्याप्रमाणें पुल्लिंगीं योजिला आहे. वामन--वामनपंडित. वेणुसा--मुरलीसारखा. प. १२ हरिहननकाज--सिंह मारण्याचें काम. विधु--चंद्र. दिनमणि०--काजवा दिनमणीचा घास करील इत्यादि अन्वय. प.१३ धवलांबर--स्वच्छ किंवा शुभ्र वस्त्र. कज्जल--काजळ. पापडसे--पापडासारखे. पुत्र आत्मा आहे अशा अर्थाची श्रुति आहे. सखा--मित्र. प. १२ सोमलता--सोम नांवाचा वेल. पीयूष--अमृत. सोमलता--सोमलपणा. प. १६ वृक--लांडगा. व्याल--सर्प. हानिकर--हानि करणारा. निपट--निःसंशय निकर--समुदाय. प. १७ गाधजला--उथळ. सरिता--नदी. करी--हत्ती. विवेकरीति--विचारमार्ग. प. १८ सन्नमन--चांगल्या लोकांना नमस्कार. वार्धक--म्हातारपण. केंडू--नाहींसें करो. वस्तु--दुसऱ्याची जिन्नस. प. १९ रंगावें--शोभावें. प. २० स्पर्शमणि--परीस. प. २१ हळहळ--हाळाहळ विष. प. २२ सात पावलें एकत्र चालण्यानें मैत्री होते अशा अर्थाचें एक संस्कृत वचन आहे. त्याचाच येथें अनुवाद केला आहे. व्यसन--संकट. प. २३ कर्दम--चिखल. प. २४ लालन--लाड. आयु--आयुष्य. अभ्र--मेघ, ढग. प. २५ मुक्ता--मोतीं. वहिला--सुंदर. गुण--दोर. कार्पास--कापूस. प. २६ गीर्वाण--संस्कृत भाषा. शिष्ट--संभावित, थोर. गोक्षीर--गायीचें दूध. कार्तस्वर

सुवर्ण. मणि--रत्न. चषक--पात्र. सारङ्ग--रसिक. पलाश०--पळसाच्या द्रोणांत. प. २७ प्रसू--माता. पंतांच्या वडिलांचें नांव रामचंद्र व आईचें नांव लक्ष्मी असें होतें. आली--सखी, मैत्रीण. सत्यवती--व्यासाची आई. कीं--कारण. सुतमुखीं--मोरोपंतांच्या तोंडीं. सत्यवती व लक्ष्मी या सख्या होत्या असें म्हणण्याचें कारण असें कीं, दोघींच्याही मुलांनीं भारतकीर्ति गायिली. प. २८ ज्वरित--ताप आलेला माणूस. घूक--घुबड. प. ३० दाटुनि--जाणून बुजून. मानधन--मान आहे धन ज्याचें असा. प. ३१ साम--सामोपचार, समजूत. बोळविला--पाठविला. लकुच--फल. विशेष. प. ३२ भावि--होणारी गोष्ट. सुकवि--शाहणा. प. ३३ सुराग्रह--दारूची मिठी. प. ३४ धनद--कुबेर. संपदा--संपत्ति. प. ३५ ज्वलन--अग्नि. तरणी--सूर्य. प. ३६ सदधिक्षेप--थोरांची निंदा. प. ३७ पण--परंतु. क्षमणें--क्षमा करणें. प. ३८ व्यसन--संकट. जंतु--प्राणी. प. ३९ षडरि--काम-क्रोधादिक सहा शत्रु. विग्रह--युद्ध. नीट--सरळ किंवा तडक.

## ३७. दुष्यंत व शकुंतला यांची भेट. पृ. ७९-८१.

प. १ आगळा--श्रेष्ठ. प. २ महीध्र--पर्वत. प. ७ अक्षोभ--गंभीर, खोल. प. ८ चूडामणि--शिरोभूषण. प. ९ संघाट--समूह. प. १० सेना-वसनें--सेनारूपी वस्त्रानें. प. १२ डांगें--झुडपें. निर्झर--झरा. प. १५ सिद्ध--ज्याला सिद्धि प्राप्त झाली आहे तो. साधक--कार्यसिद्धीसाठीं उद्योग करणारा. प. १६ पवित्रजीवनी--पुण्यजला. देवतटिनी--गंगा, भागीरथी. तरंग--लाटा. सुफेन--उत्तम फेंस. प. २० इंदिरावेशें--लक्ष्मीच्या रूपानें. प. २१ कनकलतिका--सुवर्णाची वेल. सौदामिनी--वीज. प. २२ धरित्रीकांत--राजा. प. २५ चमत्कारला--विस्मय पावला. प. २९ चूडामणि--शिरोरत्न, श्रेष्ठ. निर्धारें--निश्चयानें.

## ३८. जनकाच्या घरीं परशुरामाचा सत्कार. पृ. ८१.

प. १ तीन सप्तकें--एकवीस वेळां. निक्षेत्री--क्षत्रियशून्य. आज्ञेवरी--आज्ञेस्तव. माता--रेणुका. प. २ ब्रह्माधिकारी--ब्रह्मज्ञ. येकात्मता--एक-रूपानें. प. ४ भीतरीं--नंतर. प. ५ चोखडीं--उत्तम. परवडी-पक्वान्नें. प. ८ फोडोनिया फोडी--पुरी फोडी. प. ९ स्वलीला--लीलेनें, विलासानें. प. १० सोऽहम्--तो मी. प. १२ भार्गव--भृगुनंदन, परशुराम.

## ३९. भरत आणि कुशलव. पृ. ८२–८६.

प. १ जांबवद०–जांबवान्, अंगद, नल, नील, हनुमान, इत्यादि वानर. विष्टपाक्रमणीं क्षम--विश्वाला पादाक्रांत करण्याला समर्थ. प. २ संकुल--भरलेले. प. ३ क्षरती–गळतात. मदोदक--हत्तींच्या गंडस्थळांतील मदाचा रस. कज्जलाभ--काजळासारखे. भूगत--पृथ्वीवर उतरलेले. मुग्धाजन--तरुणी. प. ४ चापी--चाप धारण करणारे. रुक्म--सुवर्ण. कांड--धनुष्य. कृपाण--तरवार. गदी--गदा धारण करणारे. चर्म--ढाल. किरीट -मुकुट. अंगद--बाहुभूषण. चलत्क्षोणीध्र–चालते पर्वत. रदी--हत्ती. नामैकशेष--नांवाला मात्र. प. ५ दान--हत्तींच्या गंडस्थळांतील मद. वज्र--लोट. वर्षा--वर्षाकाळ. शिखी–मयूर. प. ६ भेरी–नगारा. ध्वान–शब्द. युद्धयज्ञ–रणयज्ञ. क्षमा--भूमि, प्रदेश. सुमित्रासुत--लक्ष्मण. प. ७ बिकट--भयंकर. प. ८ वाय्वग्नि--वायु आणि अग्नि. कांड--बाण. व्रात--समूह. तदिषु०–त्याच्या बाणापासून निघालेल्या अग्नीनें तापलेला (सूर्य). प. ९ यशःप्रथा--कीर्तीला वाढविणारी. प. १० आकस्मिक०--एकाएकीं मिळालेल्या द्रव्यानें चढून आंधळे झालेले. प. ११ कर--सोंड. करवाल–तरवार. बाल--कुमार. क्षतज--रक्त. लवकर–लवाचा हात. क्षत–जखम. प. १२ दिगंतीं--दूरवर. प. १३ काळ--मृत्यु. रसना--जीभ. कातर--भित्रा. नरमारी--पटकी, जरीमरी. प. १४ सोदर--भाऊ. कलित--धरिली. कबंध--धड. प. १५ बलाढ्य अशा शत्रूला तापविणारा. काम–इच्छा. प. १९ पंचता--मृत्यु. पतंगदीपकन्याय--पतंग आणि दिवा यांचा प्रकार. पतंगानें दिव्यावर झडप घातली म्हणजे दिवा न विझतां पतंग मात्र प्राणाला मुकतो तद्वत्. सेनापंचताहेतु व लक्ष्मणशत्रुघ्नमोहहेतु असा मी इत्यादि अन्वय. तुमी–तुम्ही. प. २० मानिसी--ऐकसी. यमालय--मृत्यूचें घर. पथिक--प्रवासी. प्रसू--जननी, माता. तापसी--बिचारी. सश्रमा--कष्टी. प. २१ तर्पिली–तोषविली, क्षमा--पृथ्वी. मखहय--यज्ञाचा घोडा. अन्यथा--नाहीं तर. समर्थ०–थोरापासून उत्पन्न होणारें संकट. प. २३ जीवनदातृ--प्राणदाता. प. २४ तुंड–तोंड. खदिरांगारकुंडें--खैराच्या निखाऱ्यांचीं कुंडें. पादाहत--पायानें तुडविलेला. उरग--साप. दंतवस्त्र--ओंठ. खंडी--चावतो. कोदंडी–धनुष्य

हातांत घेतलेला. चंडकांडी--फार तीव्र आहेत बाण ज्याचे असा. पत्र--वाहन. शिखंडी--मोर. मोर हें कार्तिकस्वामीचें वाहन आहे. प. २५ सप्तेषुवृंद--सात बाणांचा समुदाय. खरविशिख--तीव्र बाण. तदर्ध--पांचशें. स्थविर--म्हातारा; जांबवान्. महास्त्रें वाहे--मोठ्या अस्त्रांचा मारा सहन केला. बलाकृष्ट--जोरानें जोडलेले शिलीमुख--बाण. भूगत--धुळींत पडलेली. प. २७ षट्+चंड+कांड +प्रकार--सहा तीक्ष्ण बाणांचा समुदाय. ससूत--सारथ्यासह. वाजी--घोडे. प. २८ युद्धनिरंकुश--युद्धांत अकुंठितगति. प. २९ भास्वत्कुळाचा टिळा--सूर्य-वंशाचा मणि किंवा भूषण (भरत). योजनायत--चार कोस लांब. मरुत्पुत्र--मारुति. समुत्पाटिला--उपटिला. हुंकार०--नुसता 'हुं' असा शब्द करून ज्यानें त्रिभुवनाचा थरकांप केला आहे, अशा मारुतीनें. त्रसरेणु--परमाणु. संचय--लोट, गोळा. वियद्गंगान्तरीं--आकाशगंगेंत. प. ३० वातोद्धूत--वाऱ्यानें उधळलेला. महीध्ररेणु--डोंगराची धूळ. खांगण--आकाश. धुत०--आपले अलंकार झाडले ज्यांनीं अशा. प. ३१ सयशःसंचक--उत्तम यश सांचविणारा. पंचक--पंचकडी. वज्रच्छिन्न--वज्रानें फोडलेला. नगेन्द्र--विशाल पर्वत. सांद्रविघट्टित--जिच्यावर जोरानें प्रहार झाला अशी.

## ४०. श्रीकृष्णाची अग्रपूजा. पृ. ८६--८८.

प. २ सोमकांत--चंद्रासारखें सुंदर. चवाई--चवरंग. प. ४ क्षीरोदक--उत्तम रेशमी वस्त्र. जीमूत--मेघ. प. १२ रातोत्पलें--रक्तकमलें. संवाहनितां--मर्दितां. प. १६ हेला--लीलेनें. प. १९ प्रवालवर्णी--पोंवळ्यासारखे लाल. प. २१ जानुद्वय--मांड्या. प. २४ सुढाळ--तेजस्वी. प. २५ वैरणियाचा--पांघरावयाचा. प. ३० वैजयन्ती--विष्णूची माळ. प. ३४ दशन--दांत.

## ४१. भरताची बंधुप्रीति. पृ. ८८--९२.

प. १. रामवाटे--रामाच्या मागून त्याच्या वाटेनें. काम--गोष्ट. लाहो--गजर. प. २ रामरत--रामाच्या ठिकाणीं रममाण. प. ३ परमाप्त--मोठा जवळचा नातेवाईक, हितचिंतक. काय म्हणुनी--किती तरी. प. ४ दर्भ-निर्मित--दर्भांचें बनविलेलें. प. ५ रघुवंशवर--भरत. सुरनदी--भागीरथी. प. ६ रमा--लक्ष्मी. असोसी--उत्कंठा. सोसीं--मानी. प. ७ स्वामी--रामचंद्र. प. ८ सारस--कमल. प. १० मंडन--भूषण. भाव--कल्पना. प.

११ विरिंचि--ब्रह्मदेव. प. १२ वाम--डावा. भूमिकुमारी--जानकी. सुरत--सुंदर. प. १३ श्यामल--नील. विदेही--जीवन्मुक्त. पुंगव--श्रेष्ठ. प. १५ पद्मा नित्य सद्म मानी तया पादपद्मा इत्यादि अन्वय. क्षेम--आलिंगन. जयाअभिराम--सुंदर. प. १६ दुःखदवार्त--दुःखाग्नीनें होरपळलेला. प. १७ ब्रह्मण्य--ब्राह्मणाविषयीं पूज्यबुद्धि बाळगणारा. अरविंद--कमल. सेविल्या--वंदिल्या. प. १८ सूपराम--उत्तम वैराग्य आहे ज्याला असा. लोकरीति--सामान्य लोकांप्रमाणें. प. २१ आधि--मानसिक चिंता. प्रभु--राम. सुरकामना--देवांची रावणवधरूप इच्छा. प. २२ हट्ट--हटवादीपणा, दुराग्रह. प. २३ मृगांकानन--चंद्रमुख. ब. स. कानन--अरण्य. प. २४ अशेषें--घूर्णपणें. प. २५ वक्त्रसरोरुह--मुखकमल. प. २७ दशानन--रावण. पददातयाला--पद देणाराला. प. २९ निश्चयरूप--निश्चित. चतुर्दश--चवदा. प. ३० द्विसप्त--चवदा. वार--दिवस. निवारी--आडवा येईल. प. ३१ शासन--प्रजापालन. कामी--इच्छिणारा. प. ३२ अंबुरुह--कमल. अंघ्रिरत--पायीं रममाण झालेला.

## ४२. सीता शिवधनुष्याचा घोडा करिते. पृ. ९२--९४.

प. १ निजमेढा--धनुष्य. सीद--नांगर. प. २ राजबिंदी--राजमंदिर. प. ४ क्षत्री--क्षत्रिय. प. ५ विर--वीर. प. ६ क्षेत्रज्ञ--ज्ञानी. प. ७ लाग--माग. चांग--चांगला. प. ८ दवडा--दवड, रपेट. प. ९ क्वारी--मुली. प. १० अतिप्रीति--मोठ्या प्रेमानें. करीं--हातांनीं. हरिखें--आनंदानें. प. ११ गाढा--गाडा, फार. प. १२ आदिशक्ति--माया. आदिपुरुष--परमेश्वर. प. १४ गुण वाहील-- दोरी लावील. संपूर्ण--एवढी. प. १५ त्रिपुर--राक्षसविशेष. दक्ष--पार्वतीचा बाप.

## ४३. सुदामनगरी. पृ. ९४--९७.

प. १ द्वारवती--द्वारका. स्वांतीं--मनांत. श्रीपति--कृष्ण. प्रेमऱ्हद--प्रेमाचा डोह. नाहणें--स्नान करणें. तेजःपुंज--प्रकाशाचा गोळा. सुंदरी हो--हे स्त्रिये! प. २ हरीचें पुर--द्वारका. लेखिलें--मानिलें. बरा--नीट. प. ३ कूजत्पक्षि०--गाणाऱ्या पक्ष्यांच्या समुदायानें व्याप्त. साब्ज--कमळांनीं युक्त. वन--उदक. क्रीडन्०--खेळत मजेनें वाहणारा, झुळझुळ येणारा,

सुवासानें भरलेला व गार अशा वाऱ्यानें. तापार्तसंजीवन--उन्हानें त्रस्त झालेल्यांना ताजेतवाने करणारा. भास्वत्०--सूर्य, अग्नि व चंद्र यांच्या सारखीं तेजस्वी घरें. स्वर्गप्रभ--स्वर्गतुल्य तेजस्वी. पावन--पवित्र. सुरनिभ--देवतुल्य. स्त्री०--स्त्रीपुरुषांचे समुदाय. प. ४ पर्णकुटिनिवेशन--पानाच्या झोंपडीचें अस्तित्व. देवौक--देवांचें घर, स्वर्ग. प्रत्युद्गमन--सामोरें होणें. प. ५ व्योम--आकाश. प. ६ मागध०--स्तुतिपाठक, वैतालिक आणि भालदार यांचे समुदाय. उपायनपाणि--नजराणे आहेत हातांत ज्यांच्या असे (नगरजन). सम्मानिले--पूजिले. स+अक्षत+लाज+पुष्प+निकर--तांदूळ व लाह्या यांनीं युक्त अशी फुलांची रास. प. ७ चकित चकित--अत्यंत विस्मित. ग्रस्त--पछाडलेला. ग्रह--भूत, पिशाच. प. ८ पद्मजा--लक्ष्मी. भासती--शोभती. दिव्य०--देवांच्या अप्सरांप्रमाणें लावण्यानें चमकणाऱ्या अशा हजारों दासींनीं स्तविलेली. आलीयुत--सखीसह. प. ९ निकर--समुदाय. स्थापिलें--बसविलें. प. १० या व पुढच्या श्लोकाचें वृत्त दंडक. भित्ति--भिंती. कांचनी--सोन्याची. पुत्तिका--पुतळी, बाहुली. भ्राजती--शोभती, चकाकतात. शतमित--शंभर. शुभ--दिव्य. चंचद्वितानें--किंचित् हालणारीं छतें. सर्वतः--चहूंकडे. प. ११ व्यजन--पंखा. चामरें--चवऱ्या. स्वर्णदंड--सोन्याच्या दांड्यांचीं. दांत--हस्तिदंती. भद्रासनें--सिंहासनें. निर्जरेन्द्र--देवेंद्र. दासदासींपरी इत्यादि अन्वय. राजती--शोभतात. प. १२ याचें वृत्त सवाई. दरिद्रितम--अत्यंत दारिद्री. स्वजनामर०--आपल्या भक्तांना जो प्रत्यक्ष कल्पवृक्ष आहे अशा लक्ष्मीपति कृष्णाचें दर्शन प्राप्त होण्याचा जो सुयोग त्याचें फळ. कळालें--समजलें.

### ४४. वैराग्यवचनें. पृ. ९७--१००

प. १ थोर--मोठें. हें ओझें याचें विशेषण. निजांगींच--माझ्या ठिकाणींच प. २ कीं--म्हणून. मंत्रजपें स्मशान धारिलें--स्मशानांत मंत्रसाधन केलें. पायोधि--समुद्र. कपर्दिका--कवडी. तों--यासाठीं. प. ३ वारिंचेवारि--वरवर. स्वजठरार्थ--आपल्या पोटाकारितां. प. ४ जलजपत्रोदक--कमल पत्रावरील बिंदु. आढ्य--संपन्न. प्रचुर--पुष्कळ. विलज्ज--निर्लज्ज. मृषा--खोटी. प. ५ रदनावली--दंतपंक्ति. माजतसे--वाढतसे. प. ६ पानीय--जळ. वीचि--लाटा.

अनुराग--लोभ. कूलंकषा--तटास फोडून टाकणारी नदी. गरगरी--गरगर फिरतो. प. ७ वाण--तोटा. प. ९ वासर--दिवस. धनपति--श्रीमान्. त्या दिवसासीं--धनपतीपुढें आर्जव करीत होतों तो दिवस. अवसान--शेवट. शशिमुखी--चंद्रमुखी. तप्तहेमप्रभा--तापलेल्या सोन्याप्रमाणें आहे कांति ज्यांची अशा. स्मरणास योग्य रचिलें--नामशेष केलें. प. १२ चर्वितचर्वणोपम--चावलेलें चावण्यासारखें. विकृतिप्रसंग--वीट, कंटाळा. प. १५ द्विप--हत्ती. प. १६ जह्नुकन्या--भागीरथी. निकुंज--गुंफा. गोमटी--सुंदर. प. १७ हिमाचल--हिमालय. सुरनदी--गंगा. पद्मासन--एक योगाचें आसन. पोत--बाल. शृंगांकुरें--शिंगांच्या टोकांनीं. प. १८ शर्व--शंकर. भूधर--पर्वत. ग्रावाग्र--पर्वतशिखर. स्वर्णदी--भागीरथी. अर्णव--समुद्र. प. २० पाणियुग--हातांची अंजुळी. मल--पातक. कर्मकलाप--अनेक कर्में. विरक्ति--वैराग्य. वनिता--स्त्री. प. २१ मेदिनी--पृथ्वी. मारुता--वायो. वर्षोपल--गारा. प. २२ शक्त--समर्थ. दीप्त--पेटलेलें. कूपखनन--आड खणणें.

## ४५. पूर्वग्रंथकारांस प्रणामांजलि. पृ. १००--१०१.

प. ३ रजनीचर--राक्षस. श्रीधर--श्रीमद्भागवताचे प्रसिद्ध टीकाकार. मधुसूदन--श्रीमद्भगवद्गीतेवरील टीकाकार. प. ६ विहंगम--पक्षी. जयदेव--गीतगोविंदकाव्याचा कर्ता. रमण--पति. प. ७ क्षीरार्णव--क्षीरसागर. मीन--मत्स्य. प. ९ प्रतिष्ठान--पैठण. प. १५ साचार--खरोखर.

## ४६. दुर्योधनाचा मानीपणा. पृ. १०१--१०६.

प. १ भग्नोरु--मोडल्या आहेत मांड्या ज्याच्या तो. आहित--शत्रु. प. २ याद--जलचर. प. ३ अयुतद्विपबळ--दहा हजार हत्तींची शक्ति. पर० --शेंकडों शत्रूंना आवरण्याला समर्थ. नियमा--वांधी. प. ६ नाथ--सामर्थ्यवान्. प. ७ आजी--युद्ध. प. ८ समय--युद्धांतील नियम. मदूरुयुगमथन--माझ्या दोन मांड्या मोडणें प. १० चित्र--आश्चर्यकारक. अधार्मिक०--अन्यायानें वागणाराच्या. प. १३ परप्रेष्य--शत्रूचा चाकर. अरिपद०--शत्रूंनीं राज्यपद हरण केल्याचें जिणें. प. १४ सुपुरुष०--चांगल्या पुरुषांमध्यें श्रेष्ठ. प. १५ मनुपूत--मंत्रांनीं पवित्र केलेली. मख०--यज्ञांतील अग्निकुंडांत. प. १९ प्रांत--शेवट. विरस--कंटाळवाणें. प. २१ स्वसा--बहीण. परस्व--दुसऱ्या-

चें धन. प. २२ नाहीं होईल--नाहींशी होईल, प्राणत्याग करील. पृथुलोचना –मोठे आहेत डोळे जिचे अशी. प्रसू--माता. प्रसून--फूल. प.२३ वाग्विशारद--बोलण्यांत कुशल. चार्वाक--नास्तिकमताभिमानी तत्त्ववेत्ता. अपचिति --पापनिवृत्ति. प. २५ धरा–पृथ्वी. ख--आकाश. चराचर--स्थावरजंगम. प. २६ ऊरु--मांडी. गदायुधें--गदा आहे शस्त्र ज्याचें अशा (भीमें). मथिला--मारिला. प. २७ द्रौणि--अश्वत्थामा. प. २८ धावडिले--पिटाळले. महाजवन--मोठे: वेगवान्. वाजी--घोडे. जी--अहो. प. २८ प्रमथितोरु--मोडल्या आहेत मांड्या ज्याच्या तो. हरिहत--सिंहानें मारलेला. राहुग्रस्त–राहूनें गिळिलेला. तरणी--सूर्य. प. २९ क्रव्याद--मांसभक्षक, राक्षस वगैरे. परिवृत--वेढलेला. उग्रकृत्यांहीं -भयंकर आहे कृत्य ज्यांचें अशांनीं. सत्तम--श्रेष्ठ. प. ३२ रति--मदनाची स्त्री. प. ३३ अग्निकुंडकारा--अग्निकुंडांतील ज्वाला. प. ३६ ज्ञाति--बांधव. शक्र–इंद्र. प. ३७ सोदर--बंधु. झष--मासा. अर्ण--उदक. प. ३८ विधिच्या वरें इत्यादि अन्वय. प. ३९ चपला--चंचल. श्री--लक्ष्मी. साधुमहित–साधुमान्य. दाटुनि--समजून उमजून. प. ४० विपदोक--विपत्तींचें घर. होयाचा--व्हावयाचा. प. ४१ टेंकेला–बाजूला. अभिनय--हावभाव. नट--सोंग. प. ४२ शात्रव--शत्रूचें. मंचक--पलंग. प. ४३ सुकृत पुण्य. कायहानि--देहनाश. प. ४८ दुरतिक्रम--लंघन करण्यास अशक्य. नियति--दैव. प. ४९ अक्षयलोक--स्वर्ग. प. ५० मृदुल०--मृदु आणि दुधाच्या फेंसासारखें सफेत आंथरुण त्यावर. कदन--नाश. प. ५२ गुरुवर्य--द्रोण. ऋजुयोधी--धर्मयुद्ध करणारा. लब्धवध--मृत. प. ५३ बाणता--वाटता. पातें--पतनानें. विषदिग्ध--विषानें चोपडलेला. ताप--दुःख. प. ५५ पर--शत्रु. प्रेतराज--यम. भव--शिव. प. ५७ पण--प्रतिज्ञा. वर्य--श्रेष्ठ. व्यसन--संकट. अर्यसु--शत्रूचे प्राण. प. ५८ तूर्ण--त्वरित. प. ६१ नियोग--आज्ञा. प. ६२ भाचा--अश्वत्थामा. कंजनाभ--विष्णु. शिखी--अग्नि. इद्ध--पेटलेला.

## ४७. सज्जनप्रशंसा. पृ १०७.

प. १ अधिष्ठान--घर. जयाचेनि--ज्यांच्याकडून. गुह्यज्ञान--परमेश्वर

ज्ञान. **प. २** आक्षेप--अपवाद. आटलें--संपलें. वस्तु--तत्त्व. **प. ३** कामा न ये--उपयोगीं पडत नाहीं. **प. ७** क्षेत्र--भूमि. **प. ८** समाधि--ब्रह्माचे ठिकाणीं लय. सायुज्य--परमेश्वरापाशीं एकभाव. **प. ९** मोक्षश्रिया--मोक्षलक्ष्मीनें.

## ४८. संकीर्ण अभंग. पृ. १०७--१०८.

अंतकाळींचें हें कोणी नाहीं असा अन्वय. गोत्र--एका गोत्राचीं माणसें. सांगाती--सोबती. मोकलणें--सोडणें. पारिखें--परकें. परावीं--अन्य, परके. कारलीया--कारल्याला. शूकर--डुक्कर. सावकास--प्रीतीनें. माने--आवडे. पाखांड--धर्मबाह्यपणा. विखार--जहाल. प्रौढी--चातुर्यानें. कूर्मी--कांसवी. ससीसिंग--सशाचें शिंग. दिव्य--चांगलें, स्वच्छ. फणी--सर्प. पुष्पप्राय--फुलासारखा.

## ४९. भक्ताचा टाहो. पृ. १०८--११२.

**प. १** सदा०--सज्जनांनीं आश्रित आहे पद ज्याचें अशा. विनोदास्पद--करमणुकीचा विषय. कलिमल--कलिसंबंधीं मल म्ह० पाप. कामद--इष्ट मनोरथ पुरे करणारा. वदान्य--दाते. सद्गुरु--श्रेष्ठ. असन्मद--दुष्टांचा गर्व. अरि--चक्र. दर--शंख. नंदक--विष्णूच्या हातांतील तलवार. अंबुज--कमल. धर--धारण करणारा. नमस्ते--तुला नमस्कार असो. या व पुढच्या सर्व श्लोकांचें वृत्त पृथ्वी. **प. २** व्रजावन--गोकुळाचें रक्षण. नखाग्रीं--करांगुलीवर. धरा--पृथ्वी. गोवर्धन पर्वत कृष्णानें करांगुलीवर धरून पर्जन्या-पासून गोकुळाचें रक्षण केलें या कथेकडे कवीचें लक्ष्य आहे. सलील--लीलेनें. मंदर--पर्वतविशेष. वराहतनु--वराहाचा अवतार. रदाग्रें--दांताच्या टोकानें. वराहावतारीं विष्णूनें दंताग्रानें पृथ्वी उचलून धारिली, या पौराणिक कथेकडे येथें लक्ष्य आहे. **प. ३** नतावनधृतव्रत--शरणागताचें रक्षण करण्याचें स्वीकारलें आहे व्रत ज्यानें असा. ज्वलन--अग्नि. बाधावन--बाधारूप अरण्य. प्रजव--महावेगवान्. धावन--धावून जाणें. प्रकट--प्रसिद्धपणें. वारण--हत्ती, गजेंद्र. सती--द्रौपदी. व्यसन--संकट. वारण--दूर करणें. जयजयार्थ--अर्जुनाला जय मिळावा म्हणून. रण--भारतीय युद्ध. **प. ४** भवचरण०--आपल्या पायांपासून निघालेली ( भागीरथी ) नदी. आपगा--नदी. श्रवण--

कान. कार्यलोभी- मोक्षरूप कार्य प्राप्त करून घेण्याची इच्छा करणारा. प. ५ पटुत्व--काम करण्याचें सामर्थ्य. जनी--जन्म. हावरा--आधाशी. प. ६ दयाब्द--दयेच्या मेघा! वळशील--डोक्यावर येऊन कोसळशील; प्रसन्न होशील. सेवकां चातकां किमपि उणें न इत्यादि अन्वय. उबगणें--उपेक्षा करणें. तूं देव उबगशील का असा अन्वय. अनन्यगतिक--दुसरी नाहीं गति त्यांना असे. सोपद्रव--त्रस्त, दुःखित. अर्णव--समुद्र. उमोप--पुष्कळ. द्रव--दया. प. ७ कळी--कली. यानें नलाच्या शरीरांत प्रवेश करून त्याला द्यूतप्रवृत्त केलें व वनवास भोगावयाला लाविलें अशी कथा आहे. सुनिर्मळ--फार पवित्र, शुद्ध. दावा--वैर. नल--नलराजा. तयांत--तशांत. अविशुद्ध--फार पापी. शलभ--टोळ. दावानल--वणवा. व्रणार्थ--व्रण पाडण्याकरितां. काकसे--कावळ्यासारखे. स्मरादि--काम, क्रोध, लोभ इत्यादि. भेक--बेडूक. अहि भेका काळ ( भक्षक ) कसे न? इत्यादि अन्वय. प. ८ जिनें--ज्या शबरीनें. प्राशिथिल--हलणारे. रद--दांत. नासिक--नाक. शबरी--एक प्रसिद्ध रामोपासक भिल्लीण. बदरिका--बोरी. चरितें--लीला. मेजुनी--विचार करून. प. ९ चिकित्सक--वैद्य. आमयद्रुम--रोगवृक्ष. खणिला-- उपटून टाकला. गद--रोग. अत्यय--नाश. अत्ययाविना इत्यादि अन्वय. सरुज--रोगी. पामर--मूर्ख. प्रत्यय--खात्री, विश्वास. प. १० क्षमी--क्षमाशील, दयाळु. भृगुपदाहति- भृगुनामक ब्राह्मण भक्ताच्या पादप्रहाराचें चिह्न. यशःकथा--थोरवीची गोष्ट. नव + सुधा + अनवद्य--ताज्या अमृताप्रमाणें मधुर. कवीतव यशःकथा पिती इत्यादि अन्वय. प. ११ महासुरभि--मोठ्या कामधेनु. रासभी--गाढवी. विषय--संसारांतील घर, पैका इत्यादि मोहक वस्तु. शुक्रा अहीरास--शुकाचार्यरूप गवळ्यास. भी--भिते. सदंड--हातांत दांडकीं घेतलेले. अदंड--दंडरहित. या पद्यांत दंड म्हणजे निग्रहसामर्थ्य समजावें. प. १२ कथासुरभि--कथारूप कामधेनु. जरठ--वृद्ध. रस--प्रेम. पान्हा. भलते--अनधिकारी, अनोळखी. मल -पाप, पुरीष. सर्वथा--मुळींच. प. १३ ध्रुव--उत्तानपादराजाचा प्रसिद्ध भगवद्भक्त पुत्र. दरें ( पांचजन्यानें ) गल्ल ( गाल ) शिवुनि ( स्पर्श करून ) ( प्रतिज्ञा ) सत्या करुनि दाविली इत्यादि अन्वय. करांबुज--हातांतील कमल. मावरा--लक्ष्मीपते! वर+अभय

+परा--वर आणि अभय देणाऱ्या! **प. १४** सामर--अमरांसह. जगत् तिन्ही लोकांच्या नमस्कारास योग्य. प्रसादचतुर--कृपा करण्याविष कुशल. वरा--कृतार्थ. **प. १५** विश्वास--श्रद्धा, निष्ठा. ध्रुव--शाश्वत, अं नाशी. विश्वास--जगाला. प्रकट--खरोखर. मेरूशीं मोहरी कशी तुळितर असा अन्वय. **प. १६** हा--उत्तरार्धांत सांगितलेला गुण. भलता--अ धिकारी. गायक--नामस्मरण करणारा. अधोगति--नरक, पतन. वाम वतारीं विष्णूनें बळीला अधोगति ( पातालवास ) दिली या गोष्टीकडे ये कवीचें लक्ष्य आहे. 'अधोगति' हा शब्द श्लिष्ट आहे हें उघड आहे. १ १७ कृपण--दीन. अनाथ, भट-योद्धे.कातर--भित्रा.दापिती-दटावतात. शर० शरण आलेल्या भक्तावर प्रसाद करणारा. तम--अज्ञान. अरण्य--संसारह अरण्य. **प. १८** श्रीपादें--कल्याण करणारीं आणि म्हणूनच शोभाशाली अ पदें. गुरूक्ति--दशरथाचें वचन. जानकीजीवन--रामचंद्र. धरासुर--ब्राह्मण भूदेव. धरा०--हें 'श्रीपदें' याचें विशेषण. वनांत धांवली-वनवार पत्करिला. **प. १९** तई--रामावतारीं. पिशापरि--वेडयासारखे. हा--हाय हाय. भाषणकुशल--बोलण्यामध्यें चतुर. हा--कवि मोरोपंत. **प. २०** टोणपी--मूर्ख. अपथ्यरुचि--वावडया पदार्थांची लागली आहे चटक ज्याला तो. रुग्ण--रोगी. कटुक--कडू. ओखदें--औषधें. पी--पिणार. **प. २१** असि--तरवार. भागवत--भगवद्भक्त. यशोरस--यशरूप रस. रंगती--रममाण होतात. **प. २२** स्तवन मधुर गमो ( परी ) हें विष इत्यादि अन्वय. माजवी--माज आणिते. सद्यशोमुख--सत्कीर्तिरूप मुख. हलाहल--विष- विशेष. हर--शिव. हर केवळ हालाहल पिणारा आहे. तूं हालाहालापेक्षां जहाल असें स्तुतिविष प्राशन करणारा आहेस. याकरितां हरापेक्षां तूं वर असा अर्थ. अमृत--मोक्ष. ओपिशी--देतोस. **प. २३** अदयताख्य- अदयता नांवाचा. क्षण--पळभरसुद्धां. शरणागती--शरण येणें. विषय--धन, गृह इत्यादि सांसारिक गोष्टी. **२४** स्वतोक--आपलें मूल. कर्दमीं- चिखलांत. यशोदा--नंदाची बायको, कृष्णाची आई. तदा--कृष्णावतारीं रजोमलिनकाय--धुळीनें मळलें आहे शरीर ज्याचें असा. अंबर--वस्त्र. **प. २५** विटे--विटून जातो, कंटाळतो. दयामृतरसार्द्रधी--दयारूप अमृत

श्री ग्रंथसंग्रहालय

ासानें ओली झाली आहे बुद्धि जिची अशी. कुलकज्जले-कुलाला काळोखी फांसणारा. किटे--विटून जाते. प्रसादपट--कृपारूप वस्त्र. परगुरु विद्या-गुरु किंवा बाप. थिटे--लांडे. ऋण--कर्ज. जन्मदा--जन्म देणारी, माता, आई. प. २६ हें--शरण जाण्याचें. जीव--मोणूस. घनांबु--मेघाचें पाणी. पांखरें ( मुख ) उघडिल्याविना इत्यादि अन्वय. प. २७ बाह--मार. हें--दृश्य जगत्. आधि--मानसिक चिंता. परिभ्रमे--गरगर फिरते. प. २८ कृतांत--यम. कटक--सैन्य. अमल--पांढरी. ध्वज--पताका, निशाण. कृतांत०--यमाच्या सैन्याची पांढरी सफेत पताकाच अशी (जरा). पुरःसर--पुढें येणाऱ्या. गद--रोग. तनु--शरीर. आगळा--अधिक. स्वरिपु--माझा शत्रु, षडरिवर्ग. प. २९ कलंक--मळ, जाडय. विषय--संसारांतील धन, गृह, इतर सुखाचे पदार्थ इत्यादि. सदंघ्रिकमळीं--साधूंच्या चरणकमलीं. दडो--आश्रय घेवो. मुरडणें--दुसरीकडे नेणें. भवच्चरित्र--आपली कथा किंवा गुणवर्णन. प. ३० कुजन--दुर्जन. सदुक्त मार्ग--चांगल्या माणसांनीं उपदेशिलेला मार्ग. दुरभिमान-- वाईट गोष्टीविषयीं आग्रह, हेकेखोरपणा. स्वतत्त्व--आत्मस्वरूप. दुरित--पाप. आत्मबोध--स्वरूपज्ञान. प. ३१ दयामृतघन--दयारूप अमृताचा मेघ. मयूर--मोरोपंत. शिशु--मूल. कडे--कडेवर. अतिथि--पाहुणा, भक्त. असा--माझ्यासारखा, पंतासारखा. धार्मिक-स्तुतपद--साधूंनीं स्तविलीं आहेत पदें ज्याचीं असा. दासां भवार्णवीं उतरितां तुह्मां जड न पडे असा अन्वय. भवार्णव संसाररूप समुद्र. उतरणें--तारून नेणें.

REFBK-0001326

ग्रंथसंग्रहालय
ग्रा. क्र. १३२५

१३२६